2. *Stuart, H.C. and S.S.Stevenson 1963 General facors in the care of evaluation of children. In Text Book of Pediatricts, ed. W.E.Nelson, Philadelphia.*

3. *Tanner, J.M. 1962 Growth at adolescence, Oxford, Black well Scientific publications.*

4. *Tanner,J.M., J.Hiernaux, and S.Jarman 1969 in Human Biology A Guide to Field Methods by Weiner, J.S. and J.A.Lourie Oxform, Blackwell Scientific publication.*

5. *Weiner, J.S. and J.A. Lourie 1969 Human Biology - A Guide to Field Methods. IBP Handbook No.9 Oxford, Blackwell Scientific publication.*

TABLE II

Significance of the difference (t-values) between Baigas and Gonds

Age grouop	Weight	Stature	Sitting height	Leg Length
8.500-9.499	3.95*	6.29*	1.46	2.50*
9.500-10.499	1.09	1.67	0.49	2.65*
10.500-11.499	1.29	3.06*	0.52	2.51*
11.500-12.499	1.40	0.85	0.68	0.71
12.500-13.499	0.59	0.25	0.42	0.00
13.500-14.499	0.57	1.78	2.03	0.87
14.500-15.499	0.89	0.33	1.73	0.40
15.500-16.499	1.67	2.20*	0.95	1.94
16.500-17.499	0.08	0.95	0.35	0.49
17.500-18.499	0.37	1.10	1.54	0.14
18.500-19.499	0.16	1.43	3.47*	0.35
19.500-20.499	0.81	0.89	0.91	2.44*

*** Significant at 5%**

TABLE I

Body Mesasurements of the Baiga (B) and Gond(G) Boys

Age Group	Tribe/N	Weight (Kg) Mean ± SD	Stature (Cm) Mean ± SD	Sitting Height (Cm) mean ± SD	Leg length (cm) Mean ± SD
8.500-9.499	B8	25.6 ± 2.20	128.3 ± 1.60	65.0 ± 2.14	63.2 ± 2.16
	G7	22.7 ± 1.48	134.4 ± 2.03	68.7 ± 2.26	65.7 ± 1.72
9.500-10.499	B7	27.6 ± 3.68	131.07 ± 5.65	67.7 ± 4.68	64.1 ± 1.92
	G10	25.5 ± 4.23	137.6 ± 8.90	68.8 ± 4.46	68.8 ± 5.12
10.500-11.499	B16	27.7 ± 4.38	134.5 ± 5.70	69.2 ± 3.82	65.3 ± 5.18
	G16	30.3 ± 6.72	139.8 ± 3.92	70.1 ± 5.78	69.8 ± 4.94
11.500-12.499	B10	29.4 ± 8.07	139.00 ± 10.71	69.4 ± 5.84	69.6 ± 5.55
	G10	33.8 ± 5.82	142.9 ± 9.75	71.0 ± 4.49	71.9 ± 8.66
12.500-13.499	B10	32..4± 8.05	143.7 ± 9.38	71.1 ± 5.49	72.5 ± 4.69
	G12	34.4 ± 7.65	144.6 ± 7.04	72.1 ± 5.46	72.5 ± 6.81
13.500-14.499	B11	39.8 ± 5.17	150.9 ± 6.69	78.2 ± 4.65	72.7 ± 4.89
	G8	38.1 ± 7.26	146.9 ± 7.04	74.0 ± 4.31	72.9 ± 5.02
14.500-15.499	B6	40.8 ± 5.32	151.3 ± 8.58	78.5 ± 0.93	72.8 ± 8.16
	G8	38.2 ± 7.61	149.9 ± 8.17	75.7 ± 4.46	74.2 ± 3.94
15.500-16.499	B6	41.5 ± 2.76	151.6 ± 9.24	78.7 ± 1.54	72.9 ± 9.70
	G13	45.1 ± 6.60	161.4± 7.93	80.3 ± 5.64	81.0 ± 4.78
16.500-17.499	B6	46.8 ± 1.72	160.1 ± 4.60	80.3 ± 6.50	79.8 ± 5.17
	G21	47.0 ± 9.05	162.3 ± 9.59	81.3 ± 4.62	81.0 ± 5.92
17.500-18.499	B4	47.1 ± 2.66	161.1 ± 8.54	80.7 ± 2.44	80.4 ± 9.35
	G17	48.0 ± 8.23	164.2 ± 7.87	83.1 ± 4.04	88.1 ± 4.79
18.500-19.499	B3	47.7 ± 7.37	162.9 ± 1.10	81.0 ± 0.72	81.9 ± 1.78
	G14	48.4 ± 3.82	164.8 ± 4.38	83.6 ± 2.38	81.3 ± 5.19
19.500-20.499	B3	48.7 ± 2.31	166.8 ± 2.75	81.6 ± 4.22	85.3 ± 1.54
	G14	50.8 ± 8.36	165.4 ± 5.20	83.9 ± 2.46	81.5 ± 4.77

समन्वयातून आदिवासी विकास

शांतिलाल बनसोडे *

आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाव्दारे आदिवासींचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कामकाज चालते. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शिक्षण, रोजगार हमी योजना, सार्वजानिक आरोग्य, कृषी व जलसंधारण विकास योजना, फलोत्पादन, पोषण, सर्व्हेक्षण, जमाबंदी, रस्ते, जलसिंचन, पूरनियंत्रण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामीण विकास, सार्वजानिक वितरण व्यवस्था, ग्रामीण विद्युतीकरण, आश्रमशाळा, शासकीय वसतीगृहे इ.विविध विभागांतर्गत कार्यरत असलेल्या योजना राबविल्या जातात. या सर्व बाबी चांगल्या प्रकारे राबविल्या जाण्यासाठी समन्वय व संनियंत्रण उत्कृष्ट असणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. समन्वयातून एखाद्या गांवाचा विकास कसा होऊ शकतो हयाचे बोलके उदाहरण हया लेखात नमूद केले आहे.

गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यातील मेंढा हया १०० टक्के आदिवासी वस्ती असलेल्या गांवात फक्त माडिया गोंड या जमातीची ३९ कुटुंबे असून या गांवाची लोकसंख्या फक्त २२७ इतकी आहे.

या गांवात श्री.मोहन हिराबाई हिरालाल व श्रीमती सविता तारे या कार्यकर्त्यांनी आदिवासींमध्ये काम करावयाचे ठरविले. तसेच 'सर्च' या संस्थेतील कार्यकर्ते यांनीही या कामास मदत करावयाचे ठरविले. मुख्य प्रश्न आदिवासींना जंगलातील वस्तुंचे संरक्षण व मालकी हक्क देणे,विकासाभिमुख योजनांचा लाभ देणे इ.होते. मेंढा ग्रामस्थानी ग्रामसभेसाठी व युवक व युवतींसाठी श्रमदानाने गोटूल बांधले होते. तेथे ग्रामस्थांच्या सभा होत ते गोटूल वन विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी वनातील लाकडांचा वापर करुन गोटूल बांधले म्हणून ते तोडले होते. त्यामुळे आदिवासी दुखावले होते. तेव्हा ग्रामस्थ एकत्र आले व त्यांनी प्रत्येकाने आपआपल्या घरातील एक मोठे लाकूड जमा करुन २६ जानेवारीस नवीन गोटूल स्वतंत्र उभे केले. तेव्हापासून ग्रामस्थांनी ग्रामस्वराज्य निर्माण करण्याचे ठरविले होते. त्याचाच एक भाग म्हणून सर्व खात्यातील अधिकारी यांची या संबंधीची सभा मेंढा या गांवात आयोजित केली.

मेंढा गांवातच चर्चा संपन्न झाली. या सभेस सर्व ग्रामस्थ व सर्व जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते. ग्रामस्थांनी कंदमुळे देऊन अधिकाऱ्यांचे स्वागत केले.

जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय वन अधिकारी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यांच्या समन्वयातून सुमारे ४ ते ५ तास या गांवात सभा चालली व या चर्चेमधून या गांवाच्या जिव्हाळयाचे व विकासाचे खालील प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली.

या सभेमध्ये जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पातळीवरील सर्व अधिकाऱ्यांना निमंत्रित केले होते. या सभेमध्ये सर्व अधिकाऱ्यांच्या कामामध्ये समन्वय व सुसूत्रता व विकास कामे गतीने व तात्काळ व्हावी या दृष्टीने सविस्तर चर्चा करण्यातआली. या एका दिवसामध्ये चर्चेव्दारे मेंढा या गांवाचे अनेक स्थानिक प्रश्न कायमस्वरुपी मार्गाला लागण्याचे दृष्टीने कार्यवाही सुरु झाली.

१. या ग्रामसभेमध्ये वन विभागाच्या निस्तार हक्कासंबधी चर्चा झाली व जुनी निस्तार पत्रके,त्याचे निकष यातील चर्चेमधून प्रत्येक आदिवासी कुटुंबियास त्याच्या शेता सभोवतालच्या वन उपजांचा वापर विशिष्ट मर्यादेत करण्याची सवलत वन विभागाने देण्यास मान्यता दिली. या एक दिवसाच्या समन्वय चर्चेतून मेंढा या छोटया गांवाचे प्रश्न एक दिवसांच्या समन्वयाने निकाली काढण्यास जिल्हा प्रशासनास खूपच यश मिळाले.

२. या गांवात जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा नव्हती. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष कृती कार्यक्रमात नियम शिथिल करुन प्राथामिक शाळा सुरु करण्याचे निर्देश जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना या सभेत दिले व इ. १ लीचा वर्ग सुरुही झाला.

३. फलोत्पादन विभागाच्या उपसंचालकांनी फलोत्पादन योजनेचा लाभ येथील ग्रामस्थांना दिला. सामाजिक वनीकरण, नालाबडींग, चेकबडींग व कोल्हापूर पध्दतीचा बंधारा गांवठाणात कोठे बांधणे शक्य आहे, याची सभा चालू असताना जागेची

*उपसंचालक (सं.) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१

पाहणी केली व त्यांनी अभिप्राय दिला की. या गांवात लगेच चेकबडींग होऊ शकत नाही. तसेच कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यासाठीही जागा नाही. परंतू लहान लहान पाणी अडविण्याची कामे सुरु करता येईल त्यानुसार गांवातील ३/४ शेतकऱ्यांना हा लाभ देण्याचे निश्चित झाले.

४. रोजगार हमी योजनांची कामे येथील ग्रामस्थांना उपलब्ध झालेली नव्हती. या संदर्भात वन विभागातील अधिकाऱ्यांनी जबाबदारी घेतली व झाडे लावणे, वनाचे संरक्षण करणे या कामासाठी याच गांवातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला.

५. या गांवासाठी धानोरा येथे एकमेव ग्रामीण रुग्णालय होते. ते सुध्दा आदिवासींना दूर वाटत असल्याने या गांवात नियमितपणे नर्स येऊन तपासणी, औषधपाणी व लसीकरण करुन जाण्याची व्यवस्था जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या समन्वय सभेत दिली.

६. जिल्हा कृषी अधिकारी यांनी येथील आदिवासींना कृषी निविष्ठा व बी-बियाणे वगैरे लोकांच्या मागणीनुसार लाभधारकांना उपलब्ध करुन दिले.

७. मेंढा या गांवात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धानोरा यांच्याकडून शिवणक्लास योजना या बैठकीनंतर आठवडयातच सुरु करण्यात आली व महिलांना प्रशिक्षण देण्यात आले व स्वयंपूर्णतेस मदत झाली.

८. रस्ते विकासा संदर्भात धानोरा ते गडचिरोली या रस्त्यावरच हे गांव असल्यामुळे या गांवात फक्त ॲप्रोच रोड करुन देण्यासंबंधी जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता व राज्यस्तरीय कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही सुरु केली.

९. या गांवात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्यवस्थित व चांगला असल्यामुळे त्यासाठी उपाययोजना करण्याची गरज आढळली नाही. परंतू ज्या आदिवासी लाभधारकांना दशलक्ष विहिरींचा लाभ घ्यावयाचा असेल, त्यांचे अर्ज कृषी विकास अधिकाऱ्यांनी भरुन घेऊन निवडक लाभधारकांना मदत केली.

१०. गांवात स्वस्त धान्य पुरवठा नियमित होत नाही, याकरिता या गांवातील लाभधारकांना सोडे अथवा धानोरा या गांवी जावे लागते. शिधापुरवठा अधिकारी यांनी या गांवात एकूण किती युनिट आहेत, याची छाननी केली व या गांवात स्वतंत्र स्वस्त धान्य दुकान सुरु करण्याची कार्यवाही सुरु केली.

११. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या गांवाच्या ग्रामस्थांना सभेत हमी दिली की,गांवातील आदिवासी लाभधारकांना १.५ पॉईंट फिर्टींग नियमानुसार करुन देण्यात येईल.

१२. पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांनी या गांवातील जनावरांना योग्य त्या लसेस व औषधोपचार पुरवठयाचे काम सुरु केले.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद यांनी स्वत: होऊन केलेल्या या नियोजनपूर्वक समन्वय सभेमुळे जिल्हयातील सर्व विभागाचे अधिकारी या गांवात उपस्थित झाले. अन्यथा जिल्हा मुख्यालय व आपआपल्या कार्यालयात बसून विविध प्रस्ताव कार्यालय पातळीवर मंजूर करुन घेणे, गांवकऱ्यांना संबंधित कार्यालयात वारंवार जावे लागणे, कधी कधी जिल्हा नियोजन विकास परिषद व विशेष कार्यकारी समिती येथेही चर्चा होते. अनेक समन्वय सभा मुख्यालयात होतात. परंतू आदिवासींना लाभ मिळण्यास विलंब होतो. या बाबी टाळल्या जाऊन या उत्कृष्ट समन्वय बैठकीतून या गांवाचे प्रश्न सुटण्याची प्रक्रिया सुरु झाली व अशाचप्रकारे काम करण्याची प्रेरणा अधिकाऱ्यांना मिळाली. याच धर्तीवर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी मौशीखांब या गांवी सर्व अंमलबजावणी अधिकाऱ्यांना एकाच एस.टी.बसमधून घेऊन जाऊन एक समन्वय सभा घेतली व या समन्वय बैठकीमध्येही त्या गांवाचे प्रश्न सोडविण्यात यश मिळविले.

अशाप्रकारे समन्वयातून गांवाचा विकास,नियोजन अतिशय चांगल्या पध्दतीने होऊ शकतो, याचे हे उत्कृष्ट उदाहरण घडलेले आहे. या कामी तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.पी.एस.मीना व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, श्री,देवर्षी यांनी हा समन्वय घडवून आणण्यात यश मिळविले व या कामात स्थानिक कार्यकर्ते श्री.मोहन हिराबाई हिरालाल, देवाजी तोफा , फागोजीराव वट्टी, अवसूजी फिरंगे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धानोरा श्री.शांतीलाल बनसोडे यांनी आयोजनाच्या कामात विशेष सहकार्य केले होते.

अशाच प्रकारचा समन्वय आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये विविध प्रकरणात/आदिवासी उपयोजना जिल्हयात घडवून आला तर तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी जिल्हास्तरीय अंमलबजावणी अधिकाऱ्यासह गांवागांवात जाऊन समस्या समजून घेऊन विकासाचे निर्णय घेऊ लागले तर आदिवासींची सर्वांगीण उन्नती होण्याची गती वाढेल.

कातकरींसाठी विटभट्टी - एक वरदान

श्री.एम.के.राव *

अनुसूचित जमातीचा सर्वांगीण विकास होऊन त्यांना मूळ राष्ट्रीय प्रवाहात सामील करण्यासाठी महाराष्ट्र शासन व विशेषत: आदिवासी विकास खाते विविध योजनाव्दारा अविरत प्रयत्न करीत आहे. अनुसूचित जमातीची शैक्षणिक व आर्थिक प्रगती होणे त्याचबरोबर त्यांचा सांस्कृतिक वारसा जपणे असे महत्वपूर्ण ध्येय बाळगून आदिवासी विकास खाते सुधारणांशी, विकासाशी निगडीत कामे करण्यासाठी विविध योजना आखत आहे. अनुसूचित जमातीपैकी काही जमाती या अति मागासलेल्या असल्यामुळे त्यांना आदिम जमाती (प्रिमिटीव्ह ट्राईब्ज) चा दर्जा देऊन त्यांच्या उन्नतीसाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे असे माझ्या येथील कार्यकाळात मला दिसून आले. ठाणे जिल्हयातील आदिम जमातीचा शोध घेता व अभ्यास करता कातकरी जमात ही खूपच मागासलेली, आर्थिक दृष्टया अत्यंत परावलंबी, अशिक्षित ,व्यसनाधीन अशी आढळून आली व या जमातीसाठी काय करता येईल याचा शोध घेणे सुरु झाले.

कातकरी समाजाशी पार्श्वभूमी व सद्याची स्थिती याचा बारकाईने अभ्यास केला असता त्या समाजाची स्थिती पुढीलप्रमाणे आढळून आली. या समाजाचे मागासलेपणाचे एक प्रमुख कारण की, हा समाज अतिदुर्गम भागातील जंगलात वास्तव्य करतो. जेथे ते वास्तव्य करतात, ती जागा देखील गांवापासून/पाडयांपासून दूर असणारी व इतर समाजापासून संपर्कात सर्वसाधारणपणे न येणारी व त्यामुळे सुधारीत समाजाशी संपर्क तर येत नाहीच, परंतू गांवातील इतर वारली/कोकणा समाज सर्व नागरी सुविधा शहरी वातावरण यापासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे व स्थलांतरामुळे मोठया व्यक्ती तसेच बालकांमधील शिक्षणाचे या समाजातील प्रमाण जवळजवळ शून्य इतके आहे. अशिक्षितपणामुळे व इतर समाजाशी संपर्क नसल्यामुळे अंधश्रध्दा व दारुचे व्यसन यामध्ये हा समाज गुरफटलेला आहे. त्यांच्याजवळ शेती नाही . त्यामुळे हा समाज जवळ जवळ उत्क्रांतीच्या प्रथमावस्थेत जीवन जगत आहे.

शेती व शिक्षण नसल्यामुळे हा समाज कसेबसे चार महिने आपल्या झोपडीत काढतो व पावसाळा संपला की कामासाठी शहरी भागाकडे स्थलांतर करतो. मात्र वर्षानुवर्षे एकच प्रकारचे काम केल्यामुळे विटभट्टी, कोळसा तयार करणे व खडी फोडणे या कामात कातकरी वाकबगार झाला आहे. मात्र त्याचा अशिक्षितपणा व व्यसनाधिनता व रोजगारासाठी परावलंबित्व यांचा गैरफायदा व्यापारी वर्ग घेतो. कामगार कायद्याचे काहीही ज्ञान नसल्यामुळे कातकरी समाज विटभट्टीकडे दिवस रात्र राबवून घेतात व अल्पमजूरी देतात.कुठल्याही प्रकारच्या सुविधा देत नाहीत. लहान बालकांना देखील कुठलीही सोय नसते. बालकामगार म्हणून लहान मुलांना देखील विटभट्टीवर काम करावे लागते. मात्र शेवटी कुटुंबे पावसाळा सुरु होण्याच्या वेळेस गांवी परततात तेव्हा त्यांना तुटपुंजी रक्कम मिळते. शिवाय थोडीफार रक्कम मालक अंगावर कर्ज म्हणून देतो व त्यांना पुढील हंगामासाठी बांधून घेतो. अशाप्रकारे जवळ जवळ वेठबिगारी जीवन हे कातकरी जगतात. स्थलांतरामुळे मुले शाळा शिकू शकत नाहीत. स्थलांतर कालावधीत त्यांची घरेदारे इतर लोकांकडून लुटलीजातात, मोडतोड केली जाते व कातकरी समाजाची दैन्यावस्था तशीच्या तशीच राहते.

हे सर्व लक्षात घेऊन कातकरी समाजाची उन्नती कशी करता येईल यासाठीचा सखोल बाबीचा विचार केला असता त्यांच्याकडे कुशलतेने काम करण्याची गुणवत्ता आहे, तीच विचारात घेऊन एखादा प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले आहे व कातकरी विटभट्टीची योजना हा विषय पुढे आला. मात्र विटभट्टी मालकाच्या जवळ जवळ ताब्यात असणाऱ्या त्यांच्या कर्जाच्या जोखाडाखाली बंदिस्त असणारा भितीग्रस्त तसेच अशिक्षित व अंधश्रध्देखाली असणारा कातकरी समाज एकत्रित आणणे ही बाब निश्चितच कठीण होती.

त्यांचेकडून स्वयंरोजगार योजना कार्यान्वित करणे तसेच सावकाराकडून घेतलेल्या कर्जातून मुक्त करुन निर्भयतेचे

---

*प्रकल्प अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू

व विश्वासाचे वातावरण प्रथम तयार करणे आवश्यक होते. प्रकल्प कार्यालयांची ही योजना बाल्यावस्थेत/प्रथमावस्थेत असताना मा.सचिव, सहसचिव, आयुक्त व अपर आयुक्त या सर्वांनी अभिनव अशा या योजनेस संपूर्ण पाठींबा व्यक्त करुन पूर्ण सहकार्य केले. त्यामुळे प्रकल्प कार्यालयास उत्साह मिळाला.

या विटभट्टी प्रकल्पाचे महत्वपूर्ण वैशिष्टय म्हणजे ११ कुटुंबातील २२ लाभार्थ्यांची निवड या योजनेअंतर्गत केली होती. त्यांनी सावकाराकडून जी कर्जे मागील हंगामात घेतली होती ती रुपये २३,०००/- ची परतफेड करण्यासाठी शासनाकडून पूर्ण अनुदान दिले गेले व वेठबिगारीतील सावकारी पाशातून या कुटुंबांना मुक्त करुन निर्भयपणे जगण्यासाठी संधी प्राप्त करुन दिली. माहे मे, १९९५ पर्यंतच्या योजनेचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर पुढील वर्षासाठी भांडवलाची रक्कम बाजूला काढून प्रत्येक कातकरी कुटुंबांला १० ते ११ हजार रुपये मिळणार आहेत व कर्जाचा बोजाही राहणार नाही, हे या योजनेचे लक्ष्य राहणार आहे. जीवनाची स्थिरता आल्यामुळे त्यांची मुले स्थानिक शाळेत प्रवेश घेऊन शिक्षित होणार आहेत. काही विद्यार्थ्यांनी आश्रमशाळेत प्रवेश घेतला आहे व राहिलेल्या विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत पुढील काळात प्रवेश देणार आहे.

आदिवासी विकास खात्याकडून शासन निर्णय क्रटीएसपी-१०९५/१५-ए/३१५६०/का.७, मंत्रालय, मुंबई , दिनांक १३ फेब्रुवारी १९९५ नुसार हालोली कातकरी पाडा येथील कातकरींसाठी स्वयंरोजगार निर्माण करणारी वेठबिगारी व घेतलेले कर्ज यांच्यामधून मुक्तता देणारी व त्यांचे स्थानांतर थांबवून कायम वास्तव्यास संधी देऊन त्यांचे मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त करुन देणारी योजना केंद्रीय सहाय्यातून मंजूर करण्यात आली. तिचा तपशील खालीलप्रमाणे :-

१. कायम स्वरुपी भांडवल	२२,५००/-
२. खेळते भांडवल	
अ. साधन सामुग्री	४५,०००/-
ब. जागासपाटीकरणव पूर्वतयारी	२२,१००/-
क.निरीक्षकांचे मानधन	२,५००/-
ड. घेतलेल्या कामगिरीसाठी अनुदान	२३,०००/-
एकूण	१,१५,३००/-

शासनाकडून मंजूरी प्राप्त व्हायच्या अगोदर शांती सेवा मंडळ, मनोर या स्वयंसेवी संस्थेने पूर्ण पुढाकार घेऊन विटभट्टीचे काम सुरु करुन यशस्वी करुन दाखविले आहे व हलोली येथे व्यापारी तत्वावर विटांचे वितरण सुरु झालेले आहे. अजून पहिले उत्पादन शासनाच्या उपक्रमास म्हणजे गट विकास अधिकारी, पालघर यांना समारंभपूर्वक मा.आयुक्त, आदिवासी विकास यांच्या हस्ते दिनांक ५.२.९५ रोजी वितरीत करण्यात आले.

पिढयानपिढया वेठबिगारीचे जीवन जगणारा कातकरी आज हलोली येथे आनंदाचे क्षण जगत आहे. सावकारी पाशातून बंधमुक्त होऊन मुक्त पक्षाप्रमाणे जीवनाचा आस्वाद घेत आहे. स्वत: जे कष्ट करणार आहेत त्याचा पूर्ण नफा आपणास मिळणार आहे, विटभट्टी आपल्या मालकीची आहे, ही जाणीव त्यांना झाल्यामुळे कातकरी कुटुबांच्या सभासदाच्या चेहऱ्यावरील अवर्णनीय आनंद. आज सर्वच आदिवासी विकास खात्यातील अधिकारी/कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी/कार्यकर्ते यांना पुढील योजना हाती घेण्यास उत्तेजित करीत आहे.

सुगीच्या हंगामातील आदिवासी नृत्ये

डॉ.गोविंद गारे *

मांदोळनृत्य

नाशिक आणि ठाणे जिल्हयातील वारली आणि कोकणा या जमाती मांदळ नृत्य हे एक करमणुकप्रधान नृत्य करतात. मांदळ नृत्य सुगीनंतर केले जाते. या नृत्यात मृदुंगाच्या आकाराची मांदळ नांवाची ढोलकी असते. नृत्यप्रसंगी तिला कपडयाने झाकण्यात येते. मांदळावर टाकलेले हे वस्त्र आवडी निवडी प्रमाणे रंगीबेरंगी व शृंगारलेले असते. आरसे, गोंडे यांनी मांदळ सजवलेला असतो. कोकणा लोकांच्या समजूतीनुसार त्यांच्या भाषेतील मायंदाळ या शब्दापासून मांदोळ हे नांव प्राप्त झाले असावे. मायंदाळ या शब्दाचा अर्थ भरपूर असा आहे. सुगीची समृध्दीसूचक असे हे नृत्य आहे. मनासारखा सुगीचा हंगाम आल्यावर करमणुकीसाठी मांदोळनृत्य केले जाते. मांदोळ नृत्यात मांदोळ हे वाद्य वाजविणारा एक मुख्य सूत्रधार असतो. मांदोळ वाजविण्याची एक विशिष्ट पध्दती आहे. मांदोळाचा धूम आणि पुंडा ढोलकीसारखा वाजवत नाहीत. ढोलकी वादनात पुंडयांवर बोटे टाकून वेगवेगळया लयीत ती वाजविता येते. मांदोळात धूम मुख लेपनाने उतरविलेला असतो. धूम वाद्य सूराप्रमाणे पुंडा ही खालच्या स्वरात लावावा लागतो. मांदोळ वाजविताना पुंडयाऐवजी धुमाला जास्त महत्व असते. मांदोळ वादनात दोन्ही हाताच्या हालचाली एकाच वेळी केल्या जात असल्यामुळे धुम्बाक धुम्बाक अशा स्वरांच्या लयीत मांदोळ वादन चालू राहते. मांदोळ वाजविणाऱ्यास मांदोळया म्हणतात. मांदोळयाचा खास पेहराव असतो. मावळयासारखे दुटांगी अखूड नेसूचे धोतर, बंडी व डोक्यावर फेटा हा त्याचा मुख्य पेहराव . मांदोळयाच्या पायात घुंगरु असतात. तो वाद्यांच्या तालात एकसारखा मागे पुढे सरकत डुलत डुलत नाचत असतो. मांदोळ वादकाचा प्रभाव साधारणत: सूत्रधारासारखा असतो आणि अविर्भाव साधारणत: अंगात देव आलेल्या भगतासारखा असतो. फक्त तो अंगात आलेल्या माणसासारखा घुमत नाही इतकेच. मांदोळयास शुकदेव असेही समजण्यात येते. त्यामुळे नृत्याची सुरवात होण्यापूर्वी मांदोळया जेव्हा नृत्य वेषभूषेत सजून मांदोळयासह रिंगणात येतो, तेव्हा जमलेले लोक त्याचे पायावर डोके ठेवून दर्शन घेतात. मांदोळया नृत्यास उभा राहिल्यानंतर बराच वेळ दुडक्या चालीत फेऱ्या मारीत असतो व वेगवेगळे पावित्रे घेतो. शुकदेव हे इंद्राचे एक नांव. मांदोळ गाण्यात शुक अथवा सुखदेवाचा अनेकवेळा उल्लेख येतो. सुक/शुक हा शुक्राचा अपभ्रंश असावा. नृत्यामधील गाण्यात रंभा, सायरंग असेही शब्द वारंवार येतात. कोकणा जमातीत हे नृत्य, 'इंद्रदरबारातील नृत्य' म्हणून समजले जाते. मांदोळयास जे वस्त्र नेसविलेले असते,त्यालाही कोकणा जमातीचे लोक 'रंभावस्त्र' समजतात.

'मांदोळया' हा शुक म्हणजेच इंद्रही समजला जातो. त्याच्या नृत्यातील प्रमुख पात्रास रंभापात्र म्हणून ओळखतात. सायरंग याचा कोकणा लोकवाङ्मयात शय्यासोबतीची रंगत असा अर्थ आहे. म्हणजेच इंद्र दरबारातील अप्सरानृत्यांच्या संबंधात ज्या आख्यियिका आहेत त्यांचा आधार या नृत्यातील गायनांत घेतलेला दिसतो. नाशिक भागातील मांदोळ नृत्यांत गणवा हे एक पात्र असते. ते ही महत्वाचे पात्र समजले जाते. सोंगाडयाचे काम त्याला करावे लागते. त्याला 'नटवा' असेही समजले जाते. शब्द , हालचाली व पैहराव या मधून विनोद निर्माण करण्यासाठीच हे पात्र असते. त्यामुळे त्याच्या तोंडात विनोदी, नर्मविनोदी व कधीकधी अश्लील शब्ददेखील येतात. त्याचे हावभाव, विनोदी, लज्जादर्शक व प्रसंगी अश्लीलही असतात. गणपती ही ६४ कलांची देवता समजली जाते. मांदोळयातील गणवा यालाही लोक करमणुकीचे अनेक प्रकार अवगत असावे लागतात. तो हरप्रकारे नट असावा लागतो. या पात्रास विनोद करण्याचा,हावभाव करण्याचा मज्जाव नसतो. नाशिक भागातील कोकणांच्या मांदोळ नाचात त्या भागातील कांबडगाणे, भांगसर, थाळगाणे, भवाडा, कथापठण, किर्तने, तमाशा, यापैकी कोणत्याही (कथागाणे) करमणूक प्रकाराचा किंवा अनेक करमणूक प्रकारांचा समावेश केला जातो. त्या भागातील प्रचलित कोणत्याही नृत्यप्रकाराव्दारा ते करमणुकीचे कार्यक्रम नृत्य व कला दाखवितात. त्यांच्या मते मांदोळ या नांवातच या नृत्याचे रहस्य सामावलेले आहे. मांयदाळ याचा अर्थ मोठया मापाचा किंवा भरपूर असा असल्याने नाचात मायंदाळ (अनेक) नृत्यप्रकार समाविष्ट झालेले दिसतात. नृत्यासाठी मुक्त हालचालींची लय मांदोळयाच्या ठेक्याशी सुबध्द व तालबध्द असावी लागते. आदिवासी लोकजीवनाचे दर्शन या नृत्यात घडविण्यासाठी आदिवासींच्या सर्व लोककलांचा या नृत्यप्रकारात आधार घेतलेला दिसतो. मांदोळ नृत्य हे स्त्री-पुरुषाचे प्रहसनयुक्त मुक्त नृत्य आहे. समृध्दी आणि आनंदाचे प्रतिक म्हणून मांदोळ नृत्य केले जाते.

चटकोरा नृत्य

कोरकू आदिवासींचे हे नृत्य. या नृत्यात चटकोरा नांवाचे टाळासारखे वाद्य वापरतात. चटकोरा हे लाकडाचे बनविलेले वाद्य असते. टाळासारख्या त्याला दोऱ्या बांधलेल्या नसतात. हाताच्या मधल्या बोटात व आंगठयामध्ये चटकोरा बसतील अशी छिद्रे त्याला ठेवलेली असतात. चटकोरा चिपळयासारखे आपटून वाजवावे लागते. चटकोऱ्याचे गोल, चौकोनी लांबटे असे वेगवेगळे आकार असतात. डाव्या उजव्या

* अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे विभाग, ठाणे

हातात चटकोरा ठेवून एका रांगेत कोरकू स्त्रिया हे नृत्य करतात. चटकोऱ्याच्या लयबध्द ठेक्यानुसार गोलाकार सरकत सरकत हा नाच केला जातो. आवाजानुसार हाताच्या हालचाली केल्या जातात. कंबरेत वाकून नृत्याला आकार दिला जातो. दोन गट करुन चढाओढीने हालचाल करुनही नृत्य केली जातात. ही बहरदार असतात. या नृत्यात चटकोरा प्रमाणेच तिरकी, थापी आणि दोन झांडा या वाद्यांचाही समावेश असतो. चटकोरा नृत्यातील गाण्याचा एक नमुना :-

आमका चकरिजा रावणा डाअेम जोय
आमका चकरिजा भिवा होय ॥ धृ ० ॥
जगामा ठिकाण जा रावणा टोले जोअे
जगामा ठिकाण जा रावणा टोले ॥ १ ॥
खिलाम मुठुवाजा रावणा टोलेम जोअे
खिला मुठुवा रावणा टोले ॥ २ ॥
घेरतिम असमानजा रावणा टोलेम जोये
घेरति असमान रावणा टोले ॥ ३ ॥
जादुम टोनाजा रावणा टोलेम जोअे
जादू टोना रावणाट टोले ॥ ४ ॥
नालाम खोलाजा रावणा टोलेम जोअे
नाला खोला रावणा टोले ॥ ५ ॥

(गाण्यासाठी कमीत कमी आठजण असावे लागतात. गांवातील रस्त्यात वा मैदानात दोन बाजूस उभे राहून समोरासमोर गातात. गाण्याच्या वेळी ताल धरण्यासाठी त्यांच्या हातात चटकोरा, टिपऱ्या व पायात चाळ बांधतात. 'हे रावणा, आम्ही तुझी सेवा करु, हे भीमा आम्ही तुझी पण सेवा करु. आमच्यासाठी जागेची व्यवस्था करा.' याप्रमाणे खेज, मुठुवा,जमीन, नदीनाले यासाठी जागेची व्यवस्था करण्यास सांगतात.)

भिमनपूजा नृत्य

आयक, भिमन,भिमदेव किंवा भिवसन हा कोलामांचा प्रमुख देव कोलामाबरोबरच राजगोंडही हया देवाची पूजा करतात. ही पूजा प्रत्यक्षात गांवयात्रा असते. कोलामांच्या वर्षप्रथेनुसार त्यांच्या 'सती' चा हा सण डिसेंबर महिन्यात साजरा होतो. भिमदेव पूजन नृत्य हे सामुहिक नृत्य आहे. त्याची सुरवात देवाच्या लाकडी मूर्तीची स्थापना करण्यापासून होते. भिवसन हा गांवाबाहेर किंवा गांवातही शेवटी एका छोटयाश्या घरात कायम प्रस्थापित केलेल्या गांवचा प्रमुख देव म्हणून समजला जातो. या सणाच्या निमित्ताने देवाची नवी प्रतिमा नृत्यानंतर बसविण्यात येते.

मरमी नृत्ये

गडचिरोली जिल्हयातील माडिया गोंड आदिवासी हे नृत्य प्रामुख्याने करतात. मरतकाच्या विधीसाठी केले जाणारे एक एकमेव नृत्य आहे. या नृत्यात फक्त मुली भाग घेतात.नृत्याचा खास पेहराव असतो. पेहराव करुन मुली जोडीजोडीने मृतांची गाणी म्हणत हे नृत्य करतात.

करमा नृत्य

गडचिरोली, भंडारा जिल्हयातील हा एक प्रमुख नृत्यप्रकार. लोकांची सुख-समृध्दी व चांगला हंगाम यासाठी हे नृत्य केले जाते. करमा सणाच्या निमित्ताने हे नृत्य केले जाते. करमा सण साधारणत: भात पिकाच्या लावण्या झाल्यावर ऑगस्ट, सप्टेंबर; महिन्यात साजरा केला जातो. या नृत्यात तरुण मुले-मुलींना चिडविण्यासाठी विविध प्रकारची गाणी म्हणतात. या नृत्यातील गाणी, शृगांरिक प्रेमगीत असतात. त्या गाण्यांचा हा एक नमुना.

रेला रे रेला
नावारे च्याते मरका मरा
मरका मरा वारुन बातारे
आली शृंगार डोळी बाता
रेला रे रेला
नावारे च्याते लिंबू मरा
लिंबू मरा वारुन बातारे
आली शृंगार डोळे बाता
रेला रे रेला
नावारे च्याते सिता मरा
सीता मरा वारुन बातारे
आली शृंगार डोळे बाता
रेला रे रेला
नावारे च्यात शिरी मरा
रेंगा मरा वारुन बातारे
आली शृंगार डोळे बातारे
रेला रे रेला
नावारे ज्वानी मंता हौशा
तुरे हिंद मंता
रेला रे रेला

(हे गाणे प्रेयसी आपल्या प्रियकराला उद्देशून म्हणत आहे- ' ही किती सुंदर आहे. या बागेतील आंब्याचे, लिंबाचे व सीताफळाचे झाड कसे फळांनी बहरलेले आहेत व वाऱ्यावर डोलत आहे. तसेच शेवंती पण बहरलेली आहे.त्यांचा सुगंध वाऱ्यावर डोलत आहे. त्याचप्रमाणे माझ्या जीवनाची बाग बहरलेली आहे. पण हाय रे देवा,अशावेळी तू माझ्याजवळ नाहीस.')

संशोधन सहाय्यकांचे प्रशिक्षण सत्रांतर्गत व्याख्यानावरील सारांश टिप्पणी

श्री.सो.रा.शेवकरी *

प्रास्ताविक

प्रकाल्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कार्यरत संशोधन सहाय्यकांसाठी या संस्थेमध्ये दिनांक ३.४.८५ ते ७.४.९५ या कालावधीत प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. संस्थेचे संचालक आदरणीय मा.डॉ.जैनसाहेब यांनी सदर सत्राचे उद्घाटन केले.

प्रशिक्षण सत्राचे (कार्यशाळेचे) उद्घाटन करताना त्यांनी राज्यातील आदिवासी लोकसंख्या ७३.१८ लाख असून (सन १९९१ जनगणनेप्रमाणे) तिचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ९.२७ टक्के इतके येते. तसेच महाराष्ट्र राज्याची सन १९९५-९६ ची वार्षिक योजना ५५०० कोटी रुपयांची असून त्यामध्ये आदिवासी विकासासाठी ७.५ टक्के इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तथापि, सर्वसाधारणपणे रु.५०० कोटी आदिवासी क्षेत्राच्या विकासाकरिता उपलब्ध होणार आहेत. आदिवासी लोकसंख्या गटाच्या विकासासाठी नियोजन करतांना आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणाऱ्या योजनांवर भर देण्याचे तत्व मान्य झालेले आहे. जिल्हा स्तरीय योजनांवर ९० टक्के खर्च अपेक्षित आहे. तर राज्यस्तरीय योजना/कार्यक्रमाकरिता १० टक्के निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. जिल्हा नियोजनांतर्गत आदिवासीकरिता योजना तयार करताना प्रकल्पामध्ये काम करताना/प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या संशोधन सहाय्यकांवर आता आदिवासी विकास विभागाच्या पुर्नरचनेनंतर मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे. तेव्हा नियोजन प्रक्रियेतील संनियंत्रण (Monitoring) व समन्वय (Co-ordination) हया महत्वाच्या बाबींकडे अधिक लक्ष पुरवावयाचे आहे. केवळ सांख्यिकी माहिती गोळा करुन भागण्यासारखे नसून तिचे संशोधनात्मक दृष्टीकोनातून पृथकरण व विश्लेषणाचे काम संशोधन सहाय्यकांना पार पाडावयाचे आहे. जेथे जेथे त्रुटी/विसंगती आढळतील, तेथे मार्गदर्शन करुन विकासात्मक कामे मार्गी लावायची आहेत. ज्या घटकांसाठी योजना राबविण्यात येत आहेत त्या आदिवासींना त्यांचा खरोखर लाभ होतो किंवा कसे यांची मूल्यमापन पडताळणी करावयाची आहे.

संशोधन सहाय्यकांची नियोजनातील भूमिका

प्रथमत: प्रकल्प कार्यालयातील संशोधन सहाय्यकांना आदिवासी विकास विभागाच्या पुनर्रचनेपूर्वी व नंतर करावयाच्या कामामध्ये काही बदल जाणवतो का ? यांची मा.उपसंचालक (मू. व सं.) श्री.वाणीसाहेब यांनी विचारणा केली.संशोधन सहाय्यकांच्या नियोजनासंबंधीच्या भूमिकेत काही बदल झालेला नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तथापि, नियोजन प्रक्रियेत वापरावयाच्या पध्दतीमध्ये व काम करण्याच्या पध्दतीमध्ये थोडासा बदल झालेला आहे, असे त्यांनी सांगितले. सन १९७७ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्प अधिकाऱ्यांची भूमिका व सोपविलेले काम तसेच संशोधन सहाय्यकांची भूमिका समजावून घेतली गेली नाही असे त्यांनी नमूद केले. Monitering & Co-ordination संनियंत्रण व समन्वय हीच कामे नवीन रचनेमध्ये आता ५० टक्के संबंधित विभागांना माहितीसाठी हात न जोडता करता येण्यासारखी आहेत. योजना तयार करणे, अद्ययावत आकडेवारी गोळा करणे व संशोधनात्मक दृष्टीकोनातून तिचा वापर, कार्यक्रमासाठी निधीचे सुयोग्य वाटप, खर्चावर नियंत्रण, देखरेख, कामाचे वेळापत्रक इ.बाबींच्या माध्यमातून देखरेख व मार्गदर्शन संशोधन सहाय्यकांनी करावयाचे आहे. सदर कामामध्ये परिमाणकार- करित्या Monitoring & Co-ordination ची भूमिका संशोधन सहाय्यकांनी पार पाडावयाची आहे. तांत्रिक आणि प्रशासकीय अधिकार मर्यादा व संबंधित यंत्रणा अधिकारी यांची माहितीही असणे गरजेचे आहे.

संशोधन सहाय्यकांकडे नियोजनाव्यतिरिक्त अन्य अनेक कामे सोपविली जातात अशी माहिती संशोधन सहाय्यकांनी दिल्यावर मा.श्री.वाणीसाहेब, उपसंचालक (मू.व सं.) यांनी प्रकल्प कार्यालयामध्ये आणखी कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देण्याची गरज असल्याचे सांगितले. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने संशोधन सहाय्यकांच्या कामाचे स्वरुप Job-Chart पाठविण्याबाबत संशोधन सहाय्यकांना विनंती केली. दिनांक ४.४.९५ रोजी पहिल्या सत्रामध्ये 'जिल्हा नियोजन प्रक्रिया' या विषयावर श्री पोमणसाहेब जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांनी विस्तृत माहिती दिली.

सन १९९५-९६ करिता राज्याची वार्षिक योजना ५४०० कोटी रुपयांची असून जिल्हा नियोजनासाठी सर्वसाधारणपणे २६ टक्के निधी उपलब्ध करुन दिला जातो. जिल्हयाच्या लोकसंख्येचा निकष वापरुन निधी ठराविक सिलिंग मर्यादेमध्ये जिल्हयाच्या विकास योजनांसाठी नियोजन आराखडे तयार करण्याचे काम जिल्हा नियोजन व विकास मंडळाला करावे

* संशोधन सहाय्यक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे १

लागते. ही एक सल्लागार समिती" Advisary Body" अशा अर्थाने काम करते. जिल्हयाच्या विकासाकरिता आवश्यक त्या योजना प्रस्तावित करण्याचे व मंजूर करुन घेण्याची जबाबदारी यांचेकडे सोपविलेली आहे. जिल्हयाचे पालकमंत्री याचे अध्यक्ष असतात. तर विभागीय महसूल आयुक्त हे त्यांचे उपाध्यक्ष असतात. जिल्हयातील आमदार/खासदार/जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर इ. या नियोजन मंडळाचे सदस्य असतात. जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असून नियोजन मंडळाच्या सर्व कामाची जबाबदारी त्यांचेवर सोपविली आहे. जिल्हयातील विकास आराखडा मे अखेरीस किंवा जूनच्या पहिल्या आठवडयात मंजूरीसाठी ठेवण्यात येतो. वार्षिक योजना तयार करताना कोणत्या विकास कार्यक्रमांना प्राधान्य देऊन निधीची तरतूद करावयाची याचे मार्गदर्शन करुन आदिवासी क्षेत्रासाठी विकास आराखडा तयार करणे. नियोजन करणे या बाबींसाठी सांख्यिकी माहिती (मूलभूत माहिती) संशोधन सहाय्यकांने मिळविण्याचा प्रयत्न करुन आदिवासी विकासाच्या योजना आखाव्यात. आदिवासी क्षेत्रासाठी नियोजन करतांना प्राधान्याने रस्ते (दळणवळण), प्राथमिक शिक्षण, आरोग्य, पाणी-पुरवठा इ.क्षेत्र विभागाकरिता योजनांवर भर देण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. सदर दिवसाच्या दुसऱ्या सत्रामध्ये या संस्थेतील एक्षेविका कक्षातील श्री.एम.आर.गोसावी, सांख्यिकी अधिकारी यांनी 'आदिवासी क्षेत्र संकल्पना ' यावर माहिती दिली. संस्थेतील एक्षेविका कक्षांतर्गत कार्यरत असलेले कक्ष-९, कक्ष-१० व कक्ष-१२ यांचे कामाचे स्वरुप विशद करुन त्यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा पॉकेटस , मिनीमाडा पॉकेटस इ.संकल्पनासाठी शासनाचे निकष समजावून सांगितले. कक्ष-९ ने तयार केलेल्या सांख्यिकी मालिका क्रमांक ३७,३८,३९ याबाबत चर्चा करुन त्यांनी क्षेत्र नियोजनांतर्गत कक्ष क्र.१० ने तयार केलेल्या कामाचा आढावा घेतला. यवतमाळ व भंडारा जिल्हयातील अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्राचे सामिलीकरण करण्याचा (आदिवासी उपयोजना क्षेत्र/माडा-मिनीमाडा या केंद्र शासन मान्य संकल्पनेत) प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

सदर दिवसांच्या तिसऱ्या सत्रामध्ये डॉ.शरद खरे यांनी 'संशोधन आराखडा '(Research Design) या विषयावर विचार व्यक्त करतांना सांगितले की सदर विषयाच्या तात्विक, तांत्रिक तसेच कामकाज स्वरुपातील (The Theoretical Technical & operational aspects) बाबी लक्षात घेऊन संशोधन आराखडा तयार करावा. संशोधन शास्त्र हे नवीन प्रगत झालेले शास्त्र आहे, याचा इतिहास नवीन आहे. नैसर्गिक शास्त्रे व सामाजिक शास्त्रे यांचा फरक स्पष्ट करुन संशोधन आराखडा तयार करतांना समाजशास्त्रामध्येच विशेष वाव असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन आराखडा करण्यामध्ये संशोधन सहाय्यक हे एक महत्वपूर्ण घटक आहे. संशोधन आराखडा एकांगी न करता ती एक संपूर्ण प्रक्रिया गृहित धरुन उदिदष्टये निश्चिती, वापरावयाची पध्दती (निवड), सांख्यिकी माहिती, सदर विषयाचे ज्ञान इ.बाबी हाताशी असणे अगत्याचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

दिनांक ६.४.९५ च्या सुरवातीच्या पहिल्या सत्रामध्ये 'विश्लेषण तंत्रे' (Analysis Techniques) या विषयावर श्री.संदीप देशमुख, मानवशास्त्रज्ञ यांनी आपले विचार व्यक्त केले. सुरुवातीस ज्ञानाचे प्रकार विशद करुन 'सामान्य ज्ञान' (General Knowlege) व 'वैज्ञानिक ज्ञान' यातील फरक स्पष्ट केला. (Disciplinary knowledge) या संकल्पनांतर्गत विविध पायऱ्या व त्यात समाविष्ट होणारी शास्त्रे (Humanitics) नैसर्गिक शास्त्रे, (Physical sciences) भौतिक शास्त्रे आणि (social sciences) समाजशास्त्रे यांच्या विविध पध्दतीबाबत विवेचन केले. वैज्ञानिक ज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करतांना ज्या संज्ञा प्रचलित आहेत व त्यामध्ये सिध्दांत (Theroy) अन्वेषण पध्दती (Methodology) व विषय (Subject matter) आणि या सर्वांना आधारभूत सहाय्यकांकडून होणारी माहिती (Data) यांच्या विविध अंगाची विस्तृत माहिती त्यांनी दिली. सामाजिक माहितीचे स्वरुप (Nature of social data) याबाबत माहिती सांगून ती विश्लेषण करण्याची साधने/तंत्रे (Tools for data analysis) समजावून दिली. त्यामध्ये आलेख स्वरुप-साधने (Graphical devices) यांचा अंतर्भाव होता. उदा. संघटनात्मक / रचनात्मक तक्ता, वर्गीकरण पध्दत, नकाशा-चित्रीकरण इ. सामाजिक शास्त्रातील माहितीचे विश्लेषण हे उदिद्ष्टप्रणित प्रश्न संदर्भाधीन असते.

दुसऱ्या सत्रात पुणे विद्यापीठातील प्रा.डॉ.बी.व्ही.भानु, मानवशास्त्रज्ञ यांनी 'अहवाल लेखन व माहिती सादर करावयाची कौशल्ये' या विषयावर विचार मांडतांना संशोधन म्हणजे काय ? याचा उहापोह केला. त्याची व्याख्या देताना ते म्हणाले की, संशोधन प्रश्नाचे सुव्यवस्थित उत्तर देण्याची पध्दती म्हणजे संशोधन. त्यामध्ये विविक्षित प्रपत्र तयार करावी लागतात. अहवाल लेखनावरील विविध निरनिराळ्या पायऱ्यांचे विश्लेषण त्यांनी केले आणि ढोबळमानाने त्यांची तीन विभागात वर्गवारी केली ती, अशी -१.प्रस्तावना २. पध्दती ३. निष्कर्ष,त्यानंतर प्रत्येक शीर्षाखाली विस्तृत माहिती सांगितली.

सांख्यिकी माहितीच्या आधारे विचार करुन संकलित माहितीचे विश्लेषण करायला हवे. माहिती सादर करणे, विश्लेषण करणे व अहवाल लेखन करणे अगदी कठीण काम आहे. परंतु सरावाने सर्व साध्य होते, पूर्णत्व येते. त्यांनी पुढे आणखी असे सांगितले की, संशोधकांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय कार्यशाळेमध्ये अगदी थोडया वेळात उपस्थितांपुढे त्यांच्या

लेखाचे विवेचन करावे लागते. तेव्हा अशा अनेक पानातील अभ्यास अहवालाचे थोडक्यात 'सार' सांगणे अगदी कठीण काम होऊन बसते. त्यासाठी आवश्यक असलेले कसब /कौशल्य वृध्दींगंत केले पाहिजे. सरते शेवटी त्यांनी दृक-श्राव्य माध्यम व तंत्राचा थोडया वेळात माहिती सादर करण्यामधील महत्वपूर्ण परिणाम -कारक व प्रभावी पध्दतीने उपयोग यांची माहिती दिली. संशोधन कामामध्ये ही खरोखर उपयुक्त तंत्रे आहेत ,असे त्यांनी सांगितले. ओव्हर हेड प्रोजेक्टस (ओएचपी) सुध्दा महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. ही नवीन तंत्रामधील एक हल्ली पडलेली भर आहे. माहितीचे सादरीकरणातील पध्दतीमध्ये ट्रान्स्परसीज, विविध रंगातील पेन यामुळे अधिक फायदा मिळविता येत आहे.

तिसऱ्या सत्रामध्ये 'यशदा,' पुणे येथील व्याख्याते डॉ.एम.एल.संथानम यांनी 'संशोधन व संनियंत्रण तंत्रे' या विषयावर आपले विचार मांडले. 'संनियंत्रण' या संज्ञेची व्याख्या सांगून कार्यक्रम व्यवस्थापनासाठी याची आवश्यकता आहे.कार्यक्रमानुसार त्यांचे तंत्र वेगळे असू शकेल. संनियंत्रणाचे विविध प्रभाग वर्णन करुन सदर संज्ञेचे त्यांनी डब्ल्यूएच या प्रश्नार्थक संज्ञेशी जोडणी केली व संनियंत्रण हे 'काय' (What) शी संबंधित आहे. त्याचा पुर्नतपासणी किंवा सुधारीत बदल यांचेशी संबंध आहे. संनियंत्राची ढोबळ वैशिष्टये त्यांनी विशद केली. शेवटी संनियंत्रण पध्दतीमध्ये सध्या वापरात असलेल्या सर्वसाधारण पध्दतीची माहिती सांगून त्यांनी सुचविले की 'इनपूट' व 'आऊटपूट' संनियंत्रण हे एकप्रभावी साधन या प्रक्रियेमध्ये आढळून येते. 'मूल्यमापन' संबंधी विचार मांडतांना त्यांनी त्याची व्याख्या दोष काढणे अशी केली. परंतू कार्यक्रमाचे मूल्यमापन म्हणजे कार्यक्रमांतर्गत घेंतलेले कष्ट, प्रयत्न, त्याची परिणाम- कारता, कार्यक्षमता व पुरेसापणा याबाबत योग्य निदान करण्याची प्रक्रिया. ही प्रक्रिया सुनियोजित माहिती संकलन, तिचे विश्लेषण (कार्यक्रमाच्या व्यवस्थपनासाठी) यासंबंधी असून तिचे 'लक्ष्य' जाणीव समावेशकता, स्वीकार्यहता, उपलब्धता, सातत्य आणि सेवा खर्च यावर आधारलेली असावी लागते. नंतर त्यांनी मूल्यमापनाचे विविध प्रकार विशद केले. त्यामध्ये कार्यक्रमपूर्व कार्यक्रम चालू असताना कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर,तसेच कार्यक्रमाचा पाठपुरावा करताना यांचा समावेश होतो असे सांगितले. शेवटी मूल्यमापन हे 'का'? (Why) या प्रश्नाशी निगडीत आहे. त्याचा शेवट मूल्यमापन केलेल्या कार्यक्रमाबद्दल हया सूचना तथा शिफारशी यामध्ये व्हायला हव्यात. अभ्यास अहवालातील इतर कोणत्याही भागापेक्षा हा भाग अधिक महत्वपूर्ण व वजनदार स्वरुपाचा आहे.

दिनांक ७.४.९५ च्या पहिल्या सत्रामध्ये 'नमुना निवड पध्दती' या विषयावर डॉ.प्रा.जे.सी. कुरियन यांनी आपले विचार मांडतांना नमुना म्हणजे सर्व भागांचे प्रतिनिधीत्व करणारा एक अंशात्मक भाग असे सांगितले. एखाद्या संपूर्ण भागाबाबतची तपासणी, माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेतील 'नमुना पध्दती' ही एक पध्दती आहे. निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी 'नमुना' आकारमान पुरेसे असले पाहिजे. आपल्याकडे असलेला वेळ, पैसा तसेच उपलब्ध मनुष्यबळ यासंबंधीच्या निर्बंधामुळे संशोधन अभ्यासाकरिता 'नमुना 'निवड करणे गरजेचे भासते. 'आदर्श नमुना' या संबंधी वैशिष्टये विशद करतानां त्यांनी सांगितलेली तो प्रातिनिधीक तसेच स्वतंत्र स्वरुपाचा असावा.तसेच अभ्यासासाठी निवडलेल्या घटकातील एकजिनसी व पुरेश्या प्रमाणात निवडलेला असणे तितकेच महत्वाचे आहे. शेवटी त्यांनी 'नमुना निवड' पध्दतीचे विविध प्रकार विशद केले. त्यामध्येरँडम सॅपलिंग, स्ट्रॅटिफाईड सॅपलिंग, परपसिव्ह सॅपलिंग, कोटा सँपलिंग तसेच मल्टी फेज सॅपलिंग यांचा समावेश होतो. प्रत्येक नमुना निवड पध्दतीची वैशिष्टये सांगून त्याचा संशोधन अभ्यासामध्ये वापर एकजिनसी तसेच विविधांगी घटकामध्ये कसा करावयाचा याची माहिती दिली.

दुसऱ्या सत्रामध्ये प्रा.दयानंदराव यांनी 'समाजशास्त्रातील संज्ञा' या विषयावर विचार मांडतांना सांगितले की, भौतिक शास्त्रे व समाजशास्त्रे यामध्ये भेद आहे. तेव्हा समाजशास्त्रातील संशोधन हे विश्वासार्हता, भविष्य-कालीन संभाव्यता, निवड पध्दती आणि संशोधन चौकशीची शास्त्रीय पध्दती या वेगळया स्वतंत्र कसोटयांना उरतले पाहिजे. शास्त्रीय ज्ञान मिळविण्याच्या वेगवेगळया महत्वाच्या पध्दतीबाबत माहितीपूर्ण चर्चा करुन त्यांनी 'सिध्दांत' तयार करण्याची प्रक्रिया समजावून सांगितले की, प्रत्यक्ष घटना किंवा वस्तुनिष्ठ घटना ही प्राथमिक व मूलभूत साधन सामुग्री आहे. एखाद्या घटनेची निरीक्षणातून मिळविलेली माहिती हीच खरी माहिती होय. वस्तुनिष्ठ घटना व संज्ञा यांच्यातील नातेसंबंध स्पष्ट करीत असताना आपण विविक्षित निवेदन किंवा हायपोथेसिस पर्यंत येऊन पोहोचतो. जेव्हा त्याची सत्यासत्यता पडताळून पाहिली तेव्हा त्याचे 'तत्व' मध्ये रुपांतर होते. अशा तत्वांचा सर्वसाधारणपणे निष्कर्ष वाढण्यासाठी वापर केला की, सिध्दांताचा जन्म होतो. सामाजिक घटना ही एक संमिश्र व गुंतागुंतीची घटना असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. कारण त्यामध्ये अनेक घटकांचा, घटक संचाचा सहभाग असतो. कार्यकारणभाव हे परस्परांवर परिणाम करीत असतात. त्यांच्यामध्ये (कार्य व परिणाम) परस्पर संबंध नाते असते.सामाजिक संशोधनामध्ये चित्रपटामधील चित्रमालिके प्रमाणे संभ्रमात्मक दृष्टीकोन टाळणे जरुरीचे आहे. तसेच घाईघाईने कोणताही निष्कर्ष काढता कामा नये, की जो निरीक्षीय पार्श्वभूमीवर खोटा ठरण्याची शक्यता असते.

वारल्यांचे घर

श्री. उत्तमराव सोनवणे *

सह्याद्रीच्या कुशीत पश्चिम डोंगर उतारापासून समुद्र किनाऱ्यापर्यंतच्या ठाणे जिल्ह्यातील मुख्यत: वाडा, पालघर, डहाणू, तलासरी, मोखाडा या तालुक्यातून प्रामुख्याने व भिवंडी, शहापूर, मुरबाड या तालुक्यात थोडयाफार प्रमाणात वारली या आदिवासींची वस्ती आहे. गुजरात राज्याच्या डांग जिल्ह्यातही वारल्यांची मोठी लोकसंख्या आहे. बलसाड जिल्ह्यातील धरमपूर, अधई, उधवा, ही वारल्यांच्या अधिपत्याखालील संस्थाने होती. नाशिक जिल्ह्यात पेठ, सुरगाणा, तालुक्यात यांची वस्ती बऱ्यापैकी आहे. वारल्यांच्या उत्पत्तीविषयी अनेक मते मांडली गेली आहेत. वरलाटात राहणारे वारली असे सर्वमान्य मत आहे. वारल्यांच्या लोकवाङ्मयाचे विश्लेषण केले असता रामायणापर्यंत त्यांच्या आस्तित्वाचा ठसा शोधता येतो. रामाच्या सैन्यातील वानर म्हणजेच वारली असाही समज वारल्यांचा आहे. विक्रमगडला जोशी नांवाचे डॉक्टर आहेत. होमिओपथी उपचाराबरोबरच या भागाच्या सर्वांग माहिती संकलनाचा त्यांचा आवडता छंद आहे. त्यांच्याशी या विषयावर गप्पा मारणे, हा एक आगळाच आनंद आहे. त्यांच्या मतानुसार वाल्मिकीचे वंशज किंवा शिष्य म्हणजे वारली. शब्दांच्या उच्चारांचा अपभ्रंश होत होत वारली हे जमातीचे नांव प्रचलित झाले आहे. रावणाच्या लंकेबाबत अनेक मतांपैकी धारापूरी हीच लंका व त्यादृष्टीने नालासोपाऱ्याच्या आख्यायिका प्रचलित आहेत. दंडकारण्याच्या कथांना नाशिकची पंचवटी पूरक ठरते.

काही असो, अनेक शतकापासून वारली आदिवासी या भागात वास्तव्यास आहेत. त्यामुळे वारली महाराष्ट्रात गुजराथमार्गे स्थलांतरीत झाले असावेत या मताबाबत केव्हा स्थलांतर झाले ? हा प्रश्न महत्वाचा ठरतो. श्री.कोप्पर यांनी त्यांच्या ट्राय्बल हँडीक्राफ्टस इन गुजरात या पुस्तकात आदिवासींना आक्रमणांच्या भितीपोटी किंवा प्रत्यक्ष आक्रमक टोळ्यांच्या उपद्रवामुळे शेकडोवेळा चुली मोडाव्या लागल्या व शेवटी ते सध्याच्या या डोंगराळ दुर्गम भागात वास्तव्यास आले असे मत नमूद केले. वारल्यांचे स्थलांतर व डॉ.कोप्पर यांचा विचार करता आदिवासी त्यांच्या या भागात सुमारे १० ते १२ हजार वर्षापूर्वी स्थिर झाले असावेत. त्यापूर्वी त्यांची ससेहोलपट कित्येक शतके चालू असेल. त्या जुन्या काळातील आदिवासी जीवनाची कल्पनाच करवत नाही. आजची आदिवासींची भयानक अंधश्रध्दा, अज्ञान, अडाणीपणा ही त्यांची परिस्थितीची देणगी आहे. मातृसत्ताक कुटुंब पध्दतीचे अवशेष घरगडी, वधूमूल्य,आत्याच्या मुलाचे विधीतील प्रमुखत्व,घरघुशी इ. स्वरुपात अद्यापही त्यांच्यात दिसतात.

कितीतरी दिवस, सुरुवातीस वारल्यांचे पूर्वज सह्याद्रीच्या डोंगरात शिकारी श्वापदांसारखे केवळ शिकारीवर जगले असतील. केव्हातरी त्याने थोडीफार शेती केली व निवाऱ्यासाठी घर त्याने बांधले असावे. (दोनेक हजार वर्षापेक्षा जास्त काळ या स्थितीस झाला नसावा असा अंदाज करता येईल.) आणि त्याचवेळी या ऋषी मुनींचे आगमन झाले असावे. गंभीर गडाच्या परिसरात असलेल्या गुहा या पुरातन काळातील ऋषी मुनींच्या तपश्चर्येच्या जागा होत्या. गुंफातील दगडी शिळा ऋषी मुनींच्या पदस्पर्शाने पावन झालेली त्यांची आसने आहेत. कसे असेल वारल्याचे सुरवातीचे घर.? झाडांच्या फांद्या एकत्रित बांधून केलेला थोडासा आडोसा अशाच स्वरुपाचे असावे. ऋषी मुनींच्या आश्रमातील घरासारखे असावे. आश्रमाची वर्णने विचारात घेतल्यास प्राण्याबाबत पूर्ण दक्षता घेण्याची वृत्ती वारल्यांना तेथूनच मिळाली असावी. मेढी गाढून छपराची घरे बांधण्याची कल्पना आदिवासींच्या शोषणास पठारावरच्या बिगर आदिवासींनी सुरुवात केल्याने वाढलेल्या संपर्कानंतरचीच असावी का ? तसे वाटत नाही. वारली आपले पाळीव प्राणी घरातच बांधतो. पाळीव प्राण्यांच्या संरक्षणाबाबत इतकी काळजी तो फार पूर्वीपासूनच घेत होता किंवा घेत असला पाहिजे असेही म्हणता येईल. वारल्यांनी फिरती शेती केली आहे. डोंगर उतारावरच्या नव्या शेताबरोबरच नवी वस्ती. अगदी १०/१५ घरांची वारल्यांनी दर ३/५ वर्षांनी पुन्हा पुन्हा उभारली. या स्थितीत जागा बदल्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने ताकदवान घरे बांधणे वारल्यांना आवश्यक होते. या साऱ्याचा विचार करता वारल्याच्या सध्याच्या घरास खूप जुनी पध्दती म्हणता येईल.

आदिवासी, त्यांचा भाग याबाबत दंतकथा, आख्यायिका यांचा सखोल अभ्यास झाल्यास अनेक बाबींवर उपयुक्त प्रकाश टाकता येईल. तशी संधी अनेक संस्था, विद्यापीठे व्दारा होतकरु संशोधकांसाठी उपलब्धही आहेत. परंतू जाती-जमाती संबंधात सखोल संशोधनात्मक अभ्यासाची सध्यातरी उपेक्षाच होत आहे. त्यामुळे जनगणनेच्या कामाच्या निमित्ताने सुरवातीच्या काळांत ब्रिटीश प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केवळ ते त्यावेळी सेन्सस सुपरिटेंडेंट होते म्हणून जी जाती-जमातीची माहिती संकलित करुन प्रकाशित केली. तीच मानववंशशास्त्रीयदृष्टया महत्वाची समजण्यात येतेय. त्यांनी केलेलं हे काम फार मोठे व महत्वाचे होते. त्याच्या महत्वाला

*अभिरक्षी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे १

बाधा आणण्याचा किंवा गौण लेखण्याचा उद्देश नाही. तर त्यांचे कामही सुरुवात समजून सखोल संशोधन व्हायला हवे होते. त्यामुळे झालाच असता तर जाती-जमातीच्या दावे पडताळणीच्या कामातही फायदा झाला असता व जाती-जमातीच्या संबंधावर उद्‌बोधन होऊन सामाजिक समस्या सुकररित्या सोडविता आल्या असत्या. वारल्यांच्या घराबाबत निश्चित ऐतिहासिक पुराव्याविना निश्चित कालावधीचा वारसा ठरविणे अवघड आहे. परंतू या वसई ते तलासरी या सहयाद्रीच्या पश्चिम घाट उतारावर एकूण नऊ गड आहेत. त्यातील बहुतेक सर्व नैसर्गिक असून पुरातन काळापासून आस्तित्वात आहेत. त्यावरुन व सुरवातीच्या नमूद केलेल्या आख्यायिकावरुन वारल्यांनी स्थायी शेती व वसाहत फार पूर्वीच सुरु केली असावी व त्या अनुषंगाने वारल्यांच्या सध्याच्या घराची पध्दतीही फार जुनी पध्दती आहे,असे म्हणता येईल.

धरती किंवा धरतीची कृपा

वारल्यांचे घर म्हणजे एकप्रकारचे देवत्व निर्मिती असते. मूळच्या नैसर्गिक धर्मात सर्व चराचरात आत्मा, जीव असतो या तत्वावर त्यांच्या पूर्वजांनी हजारो वर्ष श्रध्दायुक्त विश्वास ठेवला होता व आजच्या वारल्यांचही श्रध्दा आहे. त्यामुळे कोणतीही निर्मिती म्हणजे जीव घडविणे ही त्यांची श्रध्दा घरांच्या बाबतही सत्य आहे. त्याची सुरुवात जागेच्या निवडीपासून सुरु होते. गेला जंगलात तोडली झाडं, रोवल्या मेढी टाकले वासे व शाकारले गवताने असे घर वारली बांधत नाही. जागा निवडल्यावर भगताकडून धरतीला कौल लावून जागेच्या शुध्दतेची खात्री केली जाते. भगत त्यासाठी धान्याचा उपयोग करील किंवा छापी लावील. भगताने खात्री दिली नाही तर दुसरी जागा शोधावी लागते. वास्तुविज्ञानही जागेच्या निवडीला महत्व देते, ही बाब नमूद करण्यासारखी आहे. त्यानंतर धरतरीची पूजा केली जाते. ज्या जागेवर आपला नि पुढे काही पिढयांचा संसार उभारला जाणार आहे त्या जागेस श्रध्दापूर्वक सादर होण्याचा हा विधी उपकृतपणे शरण जाणे आहे. हा गुण वारली संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या वारसाची देणगी आहे. तेव्हा वारल्यांना घर म्हणजे नुसत घर नाही तर घरदेवता आहे. आपल्या भाषेत वास्तुदेवता म्हणू हवं तर.

वारल्यांची झोपडी

वारल्यांची झोपडी कारवी कुडाची शेणामातीच्या गाऱ्याने लिंपलेली, गवताने शाकारलेली असते. कारवीची झोपडी इतके अगदी थोडक्यात म्हणता येईल. पण वारल्याच्या दृष्टीने इतका साधा अर्थ नाही. शतकानुशतके उघडया निसर्गात, निसर्ग आणि वारली. समोरासमोर उभे आहेत. निसर्गाने आपल्या लहरीनी या वारल्यांना निर्दयपणे झोपडले आहे. तसेच आईच्या मायेची फुंकर घालून जणू पदराखाली घेऊन जोजावले आहे. किंबहुना काही काळपर्यंत तो निसर्गाचाच भाग होता. त्या वारल्यांना घराचा अर्थ चार कारवीच्या कुडाच्या चार भिंतीइतका वरवरचा नाही. प्रत्येक ठिकाणी देवत्व त्यांनी पाहिलयं. वारल्यांना वैयक्तिक स्वामित्वाची कल्पना आम्ही शिकविली. कदाचित्र इंडियन फॉरेस्ट पॉलिसी आणि ॲक्ट पास झाल्यावर १९ व्या शतकाच्या शेवटी किंवा २० व्या शतकाच्या सुरुवातीस आम्ही काय केले याचा विचारच कोणी केला नाही. राष्ट्रीय वन पॉलिसीने जंगले त्यातील मनुष्य वगळून इतर सर्व बाबीसह राष्ट्रीय संपत्ती जाहीर केली.

जो आदिवासी शतकानुशतके ज्या जंगलात राहत होता, त्याला त्यापासून वंचित केले गेले. जमिन आदिवासींना फार प्रिय. ती त्यांची धरतरी माता आई, त्यामुळेच वैयक्तिक स्वामित्वाची जमीन आदिवासींना नव्हती. सगळया गांवाची जमीन. ज्याला जेथे भावेल तेथे त्याने घर बांधावे. बापाचे घर एका टोकाला तर पोराचे दुसऱ्या बाजूस, असा व्यवहार. धरती माता, तिची वाटणी काय करावी. सगळयांचीच माता. जमिनीवर, मातीवर आदिवासींची असीम श्रध्दा आहे. ही त्यांची माता त्यांचे गांवदेव, (वाघ्या क्षेत्रपाल), १८ जीवती व नारी पिकांची देवी कनसरी हिशोबा-बिशोबा बरमा दगडयादेव, भुत्यासू, नारनदेव, पालघोट (वनदेवता) देवता व समृध्दीची देवता. चव्हाटा, वीर व सुपली आणि पूर्वजांचे मृतात्मके आणि वाघदेव सगळे जंगलात. पिढयानपिढयाचे सख्य. पण तेच आम्ही नाकारले. त्याला जंगलात उपरा केला. वारल्यात एक म्हण आहे. बामन होशील तर लिखून लिखून मरशील. कुणबी होशील तर नांगरुन मरशील इ. पण वारली होशील तर जंगलाचा राजा होशील. केवढा त्यांना जंगलाचा अभिमान. तेव्हा वारल्यांचे घर किंवा झोपडी कारवी कुडांच्या चारी भिंतीपुरतीच मर्यादित नसते. तिचा विस्तार त्याच्या नजरेच्या टप्प्यापर्यंत जंगलात असतो. नदी. नाले त्याच्या आंघोळीच्या जागा, झाडा-झुडपांचा आडोसा, प्रात:विधीसाठी, झाड-झुडूप, कंद याची औषधे व अन्नही त्याच्या उपयोगी पडतात. जंगल आणि परिसर त्याला त्याच्या उदरनिर्वाहाची साधने वारल्यांची झोपडी या अर्थाने विस्तारलेली असते.

वारल्यांच्या झोपडीला अंगण व मागे परसबाग असतेच. अंगणात लाकडी मेंढीचा मंडप असतो. मंडपावर वाळलेले गवत रचून ठेवलेले असते. हिवाळयात शेकोटी मंडपात पेटते. पावसाळयात बेल चढवितात. उन्हाळयात झोपण्यासाठी मंडप. पूर्वी मंडपात सतत लाकूड जळत ठेवलेले असे. आगकाडी मुळे आता त्याची गरज राहिलेली नाही. खेरीज त्याचवेळी हिंस्त्र श्वापदांचा उपद्रव आगीमुळे कमी होत असे. भिंतीशी सरपणा साठवणुकीची जागा उतरत्या छपराने झाकल्यामुळे पावसाळयातही सरपण सुरक्षित राहते. आदिवासींचा भाग मुख्यत: भरपूर पावसाचा आहे.त्यामुळे पावसाळयात सहज व भरपूर येणाऱ्या वेली, भाज्या, भोपळे

इत्यादीसाठी परसबाग बहुतेक असते. परस बागेभोवती कुड घातलेला असतो. घराच्या मागील परसबागेत काकडी, कोहळा, वाल, मिरची, पापडी इ.भाज्या ते घेतातच. घर बांधणीबाबतच्या संकल्पना नागरी, ग्रामीण व जंगल भागात सर्वत्र सारखीच असत्रे सर्वच भागात घर बांधणीसाठी जमीन लागते, पाया घ्यावा लागतो. ओटा बांधावा लागतो, भिंती घालाव्या लागतात व छप्पर घालावे लागते, दरवाजे ठेवावे लागतात, वायुवीजन पहावे लागते आणि या व इतर बाबींसाठी साधने व साहित्य जमवावे लागते. तरीसुध्दा नागरी भागात घर म्हणजे तयार वस्तु, जी आपण पैसा मोजून विकत घेऊ शकतो, अशी घराबाबत धारणा आढळते. आदिवासींचे घर म्हणजे एक कार्यक्रम/कृती असते. ती एकपध्दतशीर व योग्य कृतीने आकारास येणारी घटना आहे. या कृतीमध्ये नियोजन आहे. नियोजनानुसार बांधकाम आहे. त्यांची डागडुजी व जपणूक आहे. गरजेनुसार वाढ करण्याची कुवत त्यानुंसार वाढीव बांधकाम आहे. कारण घर ही आदिवासींसाठी कृती आहे. क्रिया आहे. त्याबाबतचे निर्णय त्याचे स्वत:चे असतात. त्याची ही क्रिया त्याच्या बौध्दीक कुवतीशी , त्याच्या उत्साहाशी, त्याच्या समजूतदारपणाशी, रुढी-परंपरांशी आणि त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या पशुधन व मनुष्य बळाशी निगडीत आहे. वारल्यांचे घर सग्या सोयऱ्यांनी, शेजारी-पाजाऱ्यांनी, गावकऱ्यांनी मदत केल्याखेरीज पुरे होणारच नाही. घरबांधणीमध्ये एकमेकांना ते उत्स्फुर्त मदत करतात. लहान मुलांच्यासाठी ती पर्वणी असते. याचवेळी ती घराबाबत शिक्षण घेतात. सामाजिक ऐकोप्याचे ते उदाहरण असते. तर मुलांना घरबांधणीस लागणाऱ्या दगड-माती, मुरुम, धोंडयाबाबतची माहिती अशावेळी सहज मिळते. घर बांधणीचे शास्त्र त्यांना शिकता येते. निरीक्षण करता येते. प्रसंगी योग्य मार्गदर्शन कसे करावे ते समजते. सर्वात महत्वाचे म्हणजेआदिवासी व त्यांची घराबाबतची मूल्ये व संकल्पना मुलांना समजतात.

नागरी भागात ठेकेदारीव्दारा मजूराकडून घर तयार होते. आदिवासीच्या घर बांधण्याच्या कृतीमुळे त्यांचा व्यक्ती विकास होतो. व्यक्तीमत्व घडणीचा थेट संबंध त्याच्या सामाजिक धारणा व वैशिष्टयपूर्ण संस्कृतीशी निगडीत आहे. नागरी भागात घराचा संबंध थेट आर्थिक बाबींशी निगडीत आहे. आदिवासीच्या घरबांधणीचा संबंध त्याच्या परिसरात उपलब्ध असणाऱ्या घरबांधणीस योग्य व उपयोगी वस्तुंशी आहे. निसर्गाशी निगडीत असा तो विषय असतो. निसर्गातून वस्तु घेऊन त्याचा उपयोग संपल्यानंतर त्या वस्तुचे मातीत रुपांतर होऊन परत निसर्गास समर्पित करण्याशी असतो. त्यांनी त्या संबंधाने वर्धित केलेल्या सामाजिक-मानसिक धारणांशी असतो. या सगळ्याशी निगडीत आदिवासी घर असते.

शासनाने आदिवासींच्या घरांच्या त्यांच्या दृष्टीने केव्हाही प्रश्न नसलेल्या विषयात कल्याणकारी राज्याच्या दृष्टीने सहानुभूतीपूर्वक लक्ष घातले. एकसारख्या आकाराची व प्रकाराची घरे आदिवासींना शासकीय व स्वयंस्फूर्त संस्थामार्फत बांधून देण्याच्या योजना तयार झाल्या आहेत. या योजनांव्दारा मुख्यत: आदिवासी 'दान घेण्यासाठी' अतिशय लायक समजण्यात आला. त्याच्या सहभागाखेरीजचे 'ठेकेदारी पध्दतीने तयार घर' त्याला मिळू लागले. उद्देश कितीही उदात्त असला तरी या मोहक ध्येयामुळे आदिवासीमधली क्रियाशीलता, निर्णयक्षमता, पारंपारिक कौशल्य आणि मुख्यत: आदिवासी संस्कृतीच्या ऱ्हासास कारणीभूत झाले. आदिवासी पध्दतीच्या घराऐवजी शासकीय पध्दतीच्या घराची त्यांच्यावर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सक्ती केली जातेय. नागरी घरामुळे आदिवासी सांस्कृतिक वैशिष्ठयांचा शासकीय योजनेव्दारा माध्यमातून विनाश केला जातोय.

जमीन आणि भावनिक लागेबांधे

घर बांधण्यासाठी सर्वत्र जमीन लागते. मग घर नागरी भागातच बांधा किंवा आदिवासी भागात. आदिवासी मात्र जमीन ही धरतरी माता समजतो. नागरी भागात जमीन ही विक्रीची बाब झाली आहे. परंतू आदिवासी मात्र जमिनीला माता मानतो. आदिवासींच्या मनात जमिनीच्या संदर्भात असलेल्या ममत्वाची भावना हा त्यांच्या सांस्कृतिक संकल्पनांचा गाभा आहे. एवढेच नाही. प्रत्यक्षात आदिवासी जमिनीस 'देवत्व' कल्पूनच जगतो, ही वस्तुस्थिती आहे. आधुनिक विचारसरणीत जमीन ही वैयक्तिक मालमत्ता झाली. औद्योगिक विचारसरणीत ही भांडवली घटक समजली जाते. जमिन ही आदिवासींमध्ये सार्वजानिक मालकीची असते. व्यक्ती समाज आणि सर्व सजीवांची जी जमीन असत्रे स्थिर शेती करण्यापूर्वी आदिवासी स्थलांतरीत शेती करीत असे. ठराविक काळाने ते गांवच बदलत असत. या फिरत्या शेतीसाठी सामुहिकपणे जंगलतोड केली जाई व कुटुबांस उदरनिर्वाहास पुरेशी इतक्याच जमिनीत कुटकी, कोदो. नागली सारख्या तृण धान्याची लागवड केली जाई. जमिन नांगरत नसतच. कारण ते मोठे पाप समजत असत. तेव्हापासून जमिनीच्या सामुदायिक मालकीची संकल्पना आदिवासीत रुजलीय. आजही काही प्रमाणात गांव जमिन सामुहिक मालकीची काही ठिकाणी आहे. असे असले तरी वाढत्या औद्योगिकीकरणामुळे व नवनवीन कायद्यामुळे आदिवासी आणि जमीन यांचे संबंध ताणले गेले आहेत. आदिवासींचा पिढीजात जंगलात असलेला वारसाच नाकारण्यात आला. जंगलात त्याला हक्कच राहिलेले नाहीत. दिल्यात सवलती.

अनेक शतकांपासून दूर दऱ्या डोंगरात दाट जंगलात वास्तव्यास असलेल्या आदिवासी अलिकडच्या काळातच नव्हे, कित्येक पिढयांपासून, जंगलात वास्तव्यास आहेत. अनेक राजवटीतही आदिवासींनी जमीन, पाणी, जंगल, शिकार आणि अनुषंगिक बाबींचा हक्काने वापर करुन घेतला आहे. काळाच्या ओघात निसर्ग आणि आदिवासी यांचे परस्परांवर अवलंबलेले संबंध अतूट झाले. तो रहात असलेल्या जंगलाची निगा राखत

होता. वणव्यात जंगल वाचविण्यासाठी धडपडत होता आणि हे पिढयानपिढयाचे हे नाते आहे. वारसाहक्काने आदिवासींना मिळालेले हक्क आहेत. ते अबाधित करण्याचा प्रयत्न प्रसंगी आवश्यकता असल्यास काही कायदे बदलून केला पाहिजे. नागरी भागात स्मशानतल्या थडग्यावरुन दंगली घडू शकतात. आदिवासींच्या पिढयांनपिढया ज्या जागेत जगल्या, संपल्या, त्या जागाच त्यांना नाकारण्यात आल्या. पूर्वजांची स्मारके त्यांच्या बाबतीत महत्वाची नाहीत काय ? त्यांच्या बाबतीतील धोरणे तपासली तर जंगलांना किती महत्व दिलेय हे दिसून येईल आणि त्या पार्श्वभूमीवर त्याच जंगलात वास्तव्यास असणारा मानव केवळ तो सुरुवातीपासून त्या भागात राहात आलाय. आदिवासींचा वंशज आहे, म्हणून हाकून काढण्याच्या योग्यतेचा आहे अशी तर आमच्या राष्ट्रीय पॉलिसी व वनविषयक कायदे यांची धारणा नाही. असे वाटायला लागते. आता जंगलात त्यांचे काम नाही. आमच्या दृष्टीने आदिवासी विरहित जंगले असावीत व त्यासाठीच आम्ही वेगवेगळे कायदे, पॉलिसीज तयार केल्यात. आदिवासी आणि जमिन हे अतूट नातेच आम्ही खिळखिळे करुन टाकलेय.

परंपरागत श्रध्देने आदिवासींनी जमिनीशी नाते जोडले ते समजून घेण्याची गरज आहे. आदिवासीचे घर म्हणजे नुसते माणसे राहण्याची जागा नाही तर आजूबाजूच्या निसर्गाचा तो भाग असतो. जंगल, नदी, टेकडी व जंगली श्वापदे यांचा घराचाच भाग असतात. चार कुडाच्या भिंती इतका मर्यादित अर्थ त्यांच्या घराचा नसतो.उघडया निसर्गाच्या सहवासात त्याचे वास्तव्य असतेय. ती त्याची संस्कृती असतेय. घराच्या पासच्या नाल्याच्या प्रवाहात न्हाऊन काठावरील झुडपाच्या आड कपडे बदलीत, नदी, नाले, भूमि आणि झाडेझुडपे त्याला अन्न देतात, औषधे देतात, शेत, जंगल, नदी त्याला काम देऊन जीवनाधार पुरवितात. या सगळया बाबी त्याच्या घराच्या संकल्पनेत गृहित असतात. आदिवासी भागात घरे विखुरलेली आढळतात. तसेच काही घरांच्या समूहाचा पाडा ही असतो.भांडकुदळ स्वभाव व अतिरिक्त मद्यपान यामुळे नको ते प्रसंग ओढवण्याची शक्यता लक्षात घेऊन अशाच स्वभाव वैशिष्टयाच्या जमातीची घरे एकमेकांपासून दूर दूर आढळतात. जंगलात किंवा शेतातले एकांडे घरामुळे रहिवाशींना भितीच्या दडपणाखाली राहिल्यासारखे वाटत नाही. आजूबाजूची जशी झाडे-झुडपे इ.तसे ते घर घराचे क्षेत्र, जमातीनिहाय बदलत जाते. वारल्यांचे शेजारी कातकऱ्यांचे घर दोनशे सव्वादोनशे चौरस फुटांचे, ठाकरांचे घर पाच सहाशे चौ.फु.(ठाकर पाळीव जनवारे घरातच बांधतात.) भिल्लांचे घर मात्र आठशे ते सोळाशे चौ.फु. पर्यंत मोठे असते. मावची, आठशे पर्यंत कोकणी ६०० ते ११०० चौ.फु., मल्हार कोळी ६०० ते ९०० चौ.फु.पर्यंतची घरे बांधतात. ढोर कोळी व कातकरी राहती घरे कामाच्या शोधात जाताना सोडून जातात. अशा वेळी घराचे दार लिंपून ते जातात.

वारली घर

आदिवासींमध्ये वारल्यांचे घर सुंदर असते. सुबक असते. आणि तांत्रिकदृष्टयाही योग्य असते. गवताने शाकारलेल्या उतरत्या छपरावरं आता मंगलोरी कौले सहज घालता येतात. वारली घर बांधताना अगोदर लाकडी फ्रेम पूर्ण करतो. खांब रोऊन तुळया, आडे ठोकून आडवे उभे वासे टाकून बांधून पूर्ण करतो. झोपडीचा आकार ठरविताना वारली चौरसाकृती झोपडी कधीही बांधत नाही. लांबी रुंदीत कमीत कमी एक हाताचा फरक ते करतातच. हातभर लांबी म्हणजे सुमारे दीडफूट. प्रत्यक्षात वारल्यांची आयताकृती दिसतातच. वारल्यांच्या घराला ९ खांब असतात. सर्वात महत्वाचा मधला खांब याला 'धारण' म्हणायचे. वारली घरांचे मोजमाप हातावर असते. ७ हात रुंद ९ हात लांब किंवा ९ हात रुंद ११ हात लांब. लांबीरुंदीत हा फरक ठेवावा लागतो. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सम आकडयात लांबी रुंदी धरायची नसते. धारण या मधल्या मुख्य खांबावर दीड/दोन हात लांबीचा लाकडी आधार घालतात. या आधारावर घर आकारते. मधल्या खांबाभोवती घराच्या लांबी रुंदीइतक्या लांबीच्या वासे, तुळया यांचा सांगाडा तयार केला जातो. भिंती कारवीच्या कुडाच्या असतात. त्या आडवाटापर्यंत नेऊन सोडून दिलेल्या असतात. घराचे छप्पर उतरते असून ते बाहेरच्या भिंतीच्या पुढे अडीच/तीन फूट असते. कारवी कूड आणि छप्पर यामध्ये सहा-सात नऊ इंचापर्यंत मोकळा भाग असतो. त्यामुळे घरात सतत हवा खेळती राहते. कारवीचा कूड ६ ते ८ फूटापर्यंत उंच घेता येतो. घरातच जनावरे बांधत असल्याने त्यांच्यासाठी घराच्या मुख्य सांगाडयाच्या पुढे ८/९ फूटावर. सांगाडयावर लाकडी खांब व तुळयाच्या लांबीच्या फळया टाकून हा पोटमाळा धान्य साठवणुकीसाठी व इतर महत्वाच्या वस्तु ठेवण्यासाठी वापरतात. वारल्यांमध्ये घराचे दार दक्षिण दिशेस असणे निषिध्द समजतात. त्यामुळे पूर्व - पश्चिम व उत्तर या दिशांनाच वारली आपल्या घराचे दारे ठेवताना दिसतात. आदिम तत्वानुसार कोणतीही नवीन वस्तु घडविणे व जीव घडविणे समजतात. घर तर अत्यंत जिव्हाळयाचे. घर बांधणीच्या वेळी पाया खोदाईपासून सुरुवात करुन अनेकवेळा पूजाअर्चा केली जाते. जागेची शुध्दी, साहित्याची शुध्दी करण्याची त्यांची प्रथा, भूतप्रेत, चेटूक, करणी यांचा व त्यापासून भोगाव्या लागणाऱ्या त्रासांचा पगडा त्याच्या मनावर असल्याने अशा अनेक पूजाविधीची त्यांना गरज असतेच. स्वयंपाकघर ज्याला ते कोठी म्हणतात त्यांच्या आखणीच्या वेळी चौकट बसविताना मुख्यत: काळजीपूर्वक पूजाविधी केला जातो. मधला खांब पूरताना खडयात कोंबडा, अंडे व नारळ खांबाखाली गाडण्याची प्रथा होती. आढे ठोकताना नारळ, लिंबू , हळद, कुंकू व तांदूळ फडक्यात बांधून आढयाला बांधतात. सर्व पूजाविधी भगतामार्फत होतात. वारल्यांच्या घराला मुख्यत: पुढचे दार व मागचे दार हे दोन दरवाजे असतात. परंतू जनावरे घरातच ठेवावी लागत असल्यास त्यांच्यासाठी

तिसरा दरवाजा असतो. पूर्ण छप्परापर्यंत कुड नसल्याने घरात सतत हवा खेळती राहते. त्यामुळे वारल्यांच्या कारवीच्या कुडाच्या घरास खिडकी नसते.

वारल्यांच्या घराची रचना जरी साधी, सोपी वाटत असली तर त्यांना त्यासाठी भरपूर लाकूड, कारवी व बांबू लागतो. गवताच्या छपरांसाठी दरवर्षी घर शिवण्यासाठी मेहनत व गवत लागे. इतके करुनही पावसाळ्यात घराच्या गळतीचा संभव असे. लाकडाच्या फ्रेमभोवती परंपरा सांभाळून वारली घराची उभारणी होते. सजावट होते. आता छपरावर गवताऐवजी मंगलोरी कौले घालतात. त्यापूर्वी नळीच्या कौलांची आवड होती. परंतू नळीचा कौल तयार करणे मोठया खर्चाचे व जिकीरीचे काम होते. त्यामुळे सरसकट सर्व घरांवर तशी कौले नसत. वारल्यांच्या, घरास लागणारे घर उभारणीचे सर्व साहित्य त्यांच्या परिसरात सहज उपलब्ध आहे. लागते तरी काय त्याच्या घराला ? भाताचे साळवण, छपरासाठी गवत, अंबाडी वाखाच्या दोऱ्या, बांबू कारवी, लाकूड, चिखल, शेण, दगड, लाकडी फळ्या , मुरुम इ.सगळ्या वस्तु त्याच्या परिसरात सहज उपलब्ध.

लाकूड

आदिवासी घरांसाठी तयार झालेल्या लाकडांची निवड करतो. उन्हाळलेल्या वेवळ्या कच्चा लाकडामुळे घराला ऐब लागतो, अशी त्यांची खात्री असते. सागाबरोबरच खैर हेड, इत्यादी जातीचे लाकूड घराला चालते. उतरत्या पावसाळ्यात झाडा तोडून काही काळ पावसातच भिजत राहू देतात. मिठांचा उपयोग यावेळी केल्यास लाकडांवर चांगली प्रक्रिया होते. अशा प्रक्रियेतून तयार झालेले लाकूड कित्येक पिढयांपासून वारल्यांच्या घरावर आहे. लाकूड कमविण्याची आदिवासी पध्दत परंपरागत असून किती सूकं घ्यायचे याचाही त्याचा अंदाज असतो. लग्न झालेल्या मुलाला बाप स्वत:च घर बांधून देत असे. नव्या जमान्यात मुले आपले घर बांधून घेतात.

बांबू

घरांसाठी उपयोगी बांबू सर्वत्र मिळतोच असे नाही. मानवेल जातीचा बांबू टिकाऊ असल्याने तोच घरासाठी वापरतात. बांबूवर सुध्दा लाकडासारखीच तोडल्यानंतर पावसात किंवा वाहत्या पाण्यात ठेऊन नंतर सुकविण्याची प्रक्रिया केली जाते. बऱ्याच घरांचे बांबूसुध्दा तीन चार पिढयांपूर्वीचे आहेत.

अंबाडी दोरी

पावसाळ्यात अंबाडी खूप पिकते. अंबाडीचा लाख तयार करण्यासाठी अंबाडी ३/४ दिवस भिजत घालावी लागते. अंबाडी साधारण ५/६ फूट वाढणारी भाजीवर्गीय वनस्पती आहे. अंबाडी पासून वाख काढण्याची क्रिया कष्टाची असून चिकाटी आवश्यक आहे.

कारवी

कारवी ही ८/९ फूटापर्यंत सरळ वाढणारी जंगली वनस्पती आहे. तिचे खोड सरळसोट वाढते. खोडांची जाडी १ इंचापर्यंत असू शकते. तर वजनाने अतिशय हलके ताप विकारामध्ये कारवीच्या पानांचा काढा उपयोगी आहे. कारवीला ५ वर्षातून एकदा फुले येतात. कारवी टिकाऊ असल्याने घराच्या कुडासाठी वापरतात. परंतू खोड तंतूवर्गीय धाग्यांनी बनविलेले असल्याने पावसाळ्यात जमिनीलगतचा भाग भिजून भिजून ८ ते १० वर्षांनी कुजतो. शेणामातीने लिंपल्यामुळे कूड एकसंध व दणकट होतो.

चिखल, माती व मुरुम

घर बनविण्यासाठी ग्रामीण भागात या तिन्हींचा सर्वत्र उपयोग केला जातो. घरातील जमीन मुरुम टाकून ठोकून ठोकून तयार करावी लागते. कुडाला शेणा मातीच्या गाऱ्याने लिंपावे लागते. मातीपासून गाडगी, मडकी तयार करतात. घर किंवा भांडीकुंडी तयार करण्यासाठी काळी माती उपयोगाची नसते. शेण माती व कुटलेले गवत यांचा गारा करुन दररोज २/३ वेळा खोऱ्याने तोडून आळे करुन पाणी भरुन ८ ते १० दिवस ठेवल्यास अशा गाऱ्यपासून भिंती सिमेंट सारख्या पक्क्या होतात. घरातील जमीन पाणी टाकून ठोकून ठोकून न घेतल्यास मुंग्या, वाळवीचा उपद्रव होतो. खेरीज वावरल्यामुळे ताण पडल्याने उंचसखलपणा वाढतो.

शेणाचा उपयोग मुख्यत: जमीन सारवण्यासाठी होतो. शेणाने सारवलेल्या कनगीतील धान्य किडत नाही. वारल्यांच्या घरातील भुई जमिनीचे सारवण ही एक कलाकृत्ती आहे. पातळ शेणाचे तुळतुळीत जमिनीवर मोठया अर्धगोलाकार पट्टे अनेक सुबक व आकर्षक पध्दतीने या सारवणाव्दारा वारली स्त्री साकारते. शेणाचा कलाकृतीसाठी असा उपयोग जगभरात क्वचितच इतरत्र होत असावा.

घराची जमीन अशी सुंदर नक्षीदार सारवण्याच्या बाजूच्या कारवी कूडाच्या भिंती शेणा मातीच्या गाऱ्याने लिंपलेल्या व शेणा मातीनेच पोतरलेल्या त्यातही कुडाची भिंत कारवीच्या आकारमानानुसार नियमित खडबडीत ओबडधोबड आणि त्याच भिंतीवर तांदूळपिठात लिव्हलेलो 'देवी 'अथवा 'लग्न चौक' वारली घराची शान काही वेगळीच असते. अशा घरांवर नळीची कौले असल्यावर घराच्या सौंदर्यात वाढच होते.

खावटी कर्ज योजना- समस्या व उपाय

श्री.दिगंबर घोडे *

सौ.मंगला घोडे **

प्रास्ताविक

देशाच्या आर्थिक विकासामध्ये समतोल प्रस्थापित करण्यासाठी आदिवासी, गिरीजन व आदिम जमातींना देशाच्या प्रमुख प्रवाहात सामील करुन घेणे हे केंद्र व राज्य शासनाचे प्रमुख उदिद्ष्ट आहे. या दृष्टीकोनातून राज्यातील आदिवासींची विविध मार्गाने होत असलेली आर्थिक पिळवणूक थांबविण्याचे एक प्रभावी साधन म्हणून सन १९७२ साली महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार 'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची' स्थापना करण्यात आली. या माध्यमाव्दारे राज्य शासनाने महामंडळाची प्रमुख अभिकर्ता (Chief Agent) म्हणून नेमणूक केली.

२. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बांधवाकरिता आदिवासी विकास महामंडळामार्फत अनेकविध कल्याणकारी कार्यक्रम राबविले जातात. महामंडळाची एकूण ८ प्रादेशिक कार्यालये व २९ उपप्रादेशिक कार्यालये यांचेमार्फत पुढील योजना राबविल्या जातात.

१.एकाधिकार व आधारभूत किंमत खरेदी योजना
२.वीजपंप/तेलपंप पुरवठा योजना
३.खावटी कर्ज योजना
४.न्युक्लिअस बजेट योजना
५.शासकीय आश्रमशाळांना आवश्यक वस्तुंचा पुरवठा
६.प्राथमिक केंद्रे चालविणे
७.फिरती ग्राहक भांडारे
८.शासकीय आश्रमशाळा पाणीपुरवठा योजना
१०.व्दार वितरण व्यवस्था
११.विशेष वृत्ती कार्यक्रमांतर्गत सार्वजानिक वितरण व्यवस्था
१२.एकलव्य मिनीट्रक योजना इ.

३. **लेखाचे प्रयोजन :**

प्रस्तुत लेखात पुणे जिल्हयातील आंबेगांव, जुन्नर तालुक्यातील आदिवासी सहकारी संस्थामार्फत आदिवासी शेतकऱ्यास पुरविण्यात आलेल्या खावटी कर्ज योजनेचा अभ्यास करण्यात आला आहे. खावटी कर्ज योजना राबविण्यातील अडचणी, समस्या व त्यावर उपाययोजना यांचा अभ्यास करण्यात आला.

४. **नमुना पाहणीसाठी निवडलेले क्षेत्र :-**

खावटी कर्ज योजनेचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आंबेगांव व जुन्नर या सबरिजनल आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या ५ सहकारी संस्थांची निवड करण्यात आली.

५. **लाभार्थी निवड :-**

खावटी कर्ज योजनेअंतर्गत लाभ मिळालेले लाभधारकांची रॅन्डम सॅम्पल पध्दतीने निवड करण्यात आली. प्रश्नावलीच्या माध्यमातून मुलाखात घेऊन व अनौपचारिक चर्चा पध्दतीतून माहिती मिळविण्यात आली.

६. **खावटी कर्ज योजनेचे स्वरुप :-**

आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्याकडून होणारी आदिवासी बांधवाची पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा १९७६ अन्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात खाजगी सावकारी करण्यास प्रतिबंध केला. मात्र असे करताना आदिवासी शेतकरी शेतमजूर यांची ऐन पावसाळ्यात अडचण येऊ नये यासाठी खावटी कर्ज वाटपाची योजना सुरु केली. यासाठी शासनाने महामंडळास सन १९९२ पर्यंत रु.४.६२ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. महामंडळ ही योजना १९७८ पासून १९८७-८८ पर्यंत आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे सहकार्याने राबवित होते. सन १९८८-८९ पासून सदरहू योजना आदिवासी विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने राबविली जात आहे.

सन १९९२ च्या पावसाळ्यापासून सर्वांना सरसकट प्रत्येकी रु.४,००/- कर्ज वाटपाचा अत्यंत महत्वाचा निर्णय शासनाने घेऊन आदिवासींना दिलासा दिलेला आहे. कर्ज वाटपाचे प्रमाण ९० टक्के भाग धान्य रुपाने व १० टक्के भाग रोख स्वरुपात देण्यात येतो.

७. **योजनेचे वाटप, वसूली व थकबाकी :-**

सन १९८८-८९ ते १९९२-९३ या पाच वर्षात वाटप वसूली व येणे थकबाकी, कर्जाचा तपशील खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

---

* विभागीय उप निबंधक, सह.संस्था, नाशिक

**संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे

तक्ता क्र.१

अ.क.	वर्ष	कर्जवाटप		३०.९.९३ अखेर वसूल कर्ज रुपये	३.९.९३ अखेर येणे बाकी रुपये	वसूलीची टक्केवारी
		लाभार्थी संख्या	रक्कम			
१	१९८८-८९	१३,६५१	२०,०७,६५४	५,३७,३१७	१४,७०,३३८	२६,५०%
२	१९८९-९०	६२,५०६	८५,५५,३३९	११,९८,७७५	७३,५६,५६४	१४.०१%
३	१९९०-९१	४१,४५७	६२,३९,०७४	९,५७,७०५	५२,८१,३६९	१५.३५%
४	१९९१-९२	४३,२४१	८२,०८,५१०	३०,४१,९५७	५१,६६,५५३	३७.०५%
५	१९९२-९३	१,०३,०२७	४,०९,२४,३५७	६०,२८,००१	३,४८,९६,३५६	१४.७२
६	१९९२	७८,०४८	३,१०,३९,३७१	६०,२३,७९६	२,५०,१५,५७५	२०.२०%
७	१९९३	२४,९७९	९८,८४,९८६	४,२०५	९८,८०,७८१	३.००%
अनु.क्र. १ ते ५ ची बेरीज		२,६३,८८२	६,५९,३४,९३४	१,१७,६३,७५५	५,४१,७१,१८०	१७.८४%

उपरोक्त तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, १९८८-८९ मध्ये योजना सुरु झाल्यापासून वसूलीचे प्रमाण कमी आहे. १९९१-९२ मध्ये हे प्रमाण थोडेसे वाढलेले आहे. वसूलीची टक्केवारी अत्यंत कमी असण्याची कारणे काय आहेत हे जाणून घेतले असता शासकीय कर्ज आहे, ते फेडले नाही तरी भविष्यात कर्ज माफ होईल, कर्ज फेडले नाही तरी पुढच्या वर्षी परत खावटी कर्ज मिळतेच मग कशासाठी कर्ज फेडायचे अशी भावना शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झाल्यामुळेही आदिवासी शेतकरी कर्ज फेडण्याकडे दुर्लक्ष करतो.सावकाराइतकी प्रभावी

वसूलीची यंत्रणा

वसूलीची यंत्रणा नसल्यानेही महामंडळाची वसूली कमी होते. लाभधारक सावकाराचे कर्ज फेडणयास प्रथम प्राधान्य देतो. पर्यायाने शासनाच्या कर्जफेडीकडे दुर्लक्ष केले जाते.

८. खावटी कर्जाचे वाटप

लाभार्थ्यास खावटी कर्ज कोणत्या महिन्यात दिले जाते, हे कर्ज वाटपाचे निकष काय याचे वर्गीकरण खालील तक्त्यात दर्शविले आहे.

तक्ता क्र.२

अ.क्र	लाभार्थीचे नांव	व्यवसाय	कुटुंबातील व्यक्तींची संख्या			जमिन धारणा				कर्ज वाटपाचा महिना
			१ ते ५	६ ते १०	१० च्या पुढे	१ ते २	२ ते ५	५ ते १०	१० च्या पुढे	
१	त्रिबक इष्टे	शेती	-	९	-	-	-	-	१५	जुलै
२	किसन इष्टे	शेती	४	-	-	२	-	-	-	जुलै
३	लिबाजी इष्टे	शेती	-	-	१२	-	५	-	-	जुलै
४	चद्रभागा मुठे	शेती	४	-	-	१	-	-	-	जुलै
५	लाह्या मोरमारे	शेती	५	-	-	१	-	-	-	ऑगस्ट
६	ठकसेन मोरमारे	शेती	-	७	-	१	-	-	-	ऑगस्ट
७	बाबू साबळे	शेती	४	-	-	१	-	-	-	ऑगस्ट
८	तान्होजी बागल	शेती	५	-	-	१	-	-	-	सप्टेबर
९	मारुती भवारी	शेती	४	-	-	१	-	-	-	सप्टेबर
१०	तुकाराम बगाडे	शेती	५	-	-	१	-	-	-	सप्टेबर
एकूण		शेती	७	२	१	८	१	-	१	सप्टेबर

उपरोक्त तक्त्यावरुन लाभधारकांचा प्रमुख व्यवसाय शेती असून त्यातील ९० टक्के लाभधारक अल्पभूधारक असल्याचे दिसून येते. उर्वरित १० टक्के लाभधारकांचे शेतीचे धारण क्षेत्र मोठे असले तरी खडकाळ जमिनीची उत्पादन क्षमता कमी असल्याने उत्पन्नानुसार हे लाभधारक दारिद्रयरेषेखालील गटात येतात.

४० टक्के लाभधारकांना खावटी कर्जाचे वाटप जुलै महिन्यामध्ये झाल्याचे दिसून येते. उर्वरित ६० टक्के लाभधारकांना खावटी कर्ज वाटप निश्चित केलेल्या वेळेपेक्षा खूपच उशिरा झाले आहे. याची कारणे जाणून घेतली असता धान्य उशिरा येणे, वाहतूकीची सोय नसणे पावसाळयामध्ये सोसायटी कार्यालयापासून घरापर्यंत धान्य वाहून नेण्याची अडचण असणे या कारणामुळे वाटप उशिरा होत असल्याचे दिसते.

९. निरिक्षणात्मक मुद्दे :-

लाभधारकांच्या मुलाखाती, सहकारी सोसायटयांचे सचिव यांच्या मुलाखाती व क्षेत्रीय पाहणीमध्ये आढळून आलेल्या ठळक बाबी सारांशरुपाने खालीलप्रमाणे होय.

१. १०० टक्के लाभार्थींचा मुख्य व्यवसाय शेती व शेतमजूरी हा आहे. त्यांना शेती व्यतिरिक्त उत्पन्नाचे अन्य जोड साधन नाही. ७० टक्के लाभार्थी कुटुबांचे आकारमान लहान आहे. (१ ते ५ व्यक्ती) २० टक्के लाभार्थी कुटुबांचे आकारमान मध्यम आहे. (६ ते १०) व १० टक्के लाभार्थी कुटुंबांचे आकारमान मोठे आहे.

२. लाभार्थीस ४००/- रु. कर्जामध्ये रु.३६७.६० किंमतीचे ७० किलो गहू व ३२.८० पैसे रोख रक्कम देण्यात येते.

किंमतीचा विचार लक्षात घेता महामंडळामार्फत पुरविण्यात येणाऱ्या गव्हाची किंमत बाजारभावापेक्षा जास्त असल्याचे लाभधारकांनी मुलाखतीमध्ये सांगितले. याच किंमतीमध्ये लाभधारकांना ८० किलोपेक्षा जास्त गहू बाजारामध्ये विकत मिळतो.

३. १ ते ५ आकारमानाच्या कुटुंबांला कमीत कमी ८ किलो गहू एका आठवडयास लागतो, असे गृहित धरले तर १२० दिवसांतील (४ महिन्यातील) १७ आठवडयांना किमान १३६ किलो (१७ X ८= १३६ किलो) गव्हाची गरज आहे. तुलनेने आदिवासी विकास महामंडळामार्फत दिली जाणारी खावटी योजना अत्यंत तुटपुंजी आहे.

४. लाभधारकांना मिळणारी 'खावटी कर्ज' योजना पावसाळ्यातील ४ महिन्यांकरिता (जून ते सप्टेंबर) देण्यात येते. तथापि, ऑगस्ट, सप्टेंबर, महिन्यातही (तक्ता क्र.२) योजनेचा लाभ देण्यात येतो. पर्यायाने आदिवासी क्षेत्रातील अतिवृष्टीमुळे डोंगर दऱ्याखोऱ्यातील वास्तव्यामुळे व सोसायटीच्या ऑफिसपासून घराचे अंतर जास्त असल्याने लाभधारकांना खावटी घरी घेऊन जाणे शक्य होत नाही. पर्यायाने मिळणारा गहू पावसाळ्यात उपजिविका भागविण्याइतपतही नसतो.

५. खावटी कर्ज मंजूर झालेला लाभधारक निश्चितपणे तोच आहे. याबाबतची निश्चिती सोसायटीच्या सेक्रेटरीला नसल्याने चुकीच्या व्यक्तीला व कधी कधी नेमक्या व्यक्तीला लाभ घेण्यामध्ये अडचण निर्माण होते.

६. सोसायटी ऑफिसमध्ये धान्य साठवणुकीसाठी गोदामाची सोय नसल्याने अथवा जागेच्या टंचाईमुळे धान्य आल्यापासून ते लाभधारकाने लाभ घेईपर्यंतच्या कालावधीत धान्य खराब होते. उपरोक्त मुद्दा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जर लाभधारक धान्य घेण्यास पुढे आला नाही तर पावसाळ्यामध्ये धान्याची नासाडी होते.

७. शासनाकडून मिळणारी खावटी योजना अत्यंत तुटपुंजी व खूप उशिरा मिळते. यासाठी वारंवार तालुक्याच्या गांवी. सोसायटी ऑफिसमध्ये चकरा माराव्या लागतात. याउलट सावकाराकडून मिळणारे कर्ज तुलनेने जास्त, यासाठी त्रासही कमी व पाहिजे तितक्या लवकर व आदिवासींची गरज ओळखून मिळत असल्याने आपोआपच आदिवासी शेतकरी सावकरांकडे कर्ज काढण्यास प्रवृत्त होतो. पर्यायाने संस्थेची वसूलीही कमी होते.

८. महामंडळाकडून या योजनेअंतर्गत फक्त गहू पुरविण्यात येतो. गव्हाचे अन्नात रुपांतर करण्यासाठी पुढे तेलाचीही गरज भासते. लाभधारक एवढा खर्च करण्याच्या स्थितीत नसतो. त्यामुळे मिळालेला गहू दुकानदाराला विकून त्या किंमतीत बाजरी/ज्वारी विकत घेतो.गहू विकून बाजरी/ज्वारी जास्त प्रमाणात मिळते.

९. खावटी कर्जाचे वसूलीचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

सूचना तथा शिफारशी

१. खावटी कर्ज योजनेतून संस्थेचा नाममात्र फायदा व सभासदांचे हित झाले पाहिजे यासाठी खावटी कर्जाचे प्रमाण वाढविले पाहिजे. सदर कर्जाची रक्कम रु.४००/- वरुन रु.१०००/- पर्यंत आणावी. त्यामध्ये रु.६००/- धान्य व रु.४००/- मधून तेल, मीठ, मिरची या आवश्यक जिनसा सभासदास खरेदी करता येतील. यातून सभासदाच्या गरजा योग्य प्रकारे भागविल्या जाऊन सभासद सावकार व. व्यापारी वर्गाकडे जाणार नाही. आपला उत्पादित माल योग्य भाव मिळणेसाठी संस्थेकडे अथवा महामंडळाकडे सुपूर्त करील. या मालाच्या विक्रीतून खावटी कर्जाची वसूली करता येईल.

२. सभासदाला देण्यात येणारी खावटी वेळेत (जूनच्या पहिल्या आठवडयात) देण्यात यावी. सभासदाची गरज ओळखून व परवडणारी असावी. (सध्या गहू वाटप केले जाते. सभासदांच्या म्हणण्यानुसार त्याच रक्कमेत.दीड ते दोन क्विंटल बाजरी/ज्वारी मिळू शकेल.)

३. खावटी कर्ज मंजूर झालेल्या लाभधारकास शिधापत्रिका शिवाय खावटी देता येऊ नये. त्यातून नेमक्या व्यक्तीस लाभ दिला जाईल.

४. ज्या ठिकाणी धान्य वाहतूक ट्रकने करता येत नसेल त्याठिकाणी खटारा, बैलगाडीने वाहतूक करण्यात यावी व वाहतूकीचा प्रश्न सोडवावा.

५. खावटी कर्जापोटी देण्यात येणारे धान्य याचे वाटपाचे वेळी बाजारातील दराशी समतोल असावा.

६. संस्थांमध्ये धान्य साठवणुकीसाठी जागा नाही. हे धान्य खाजगी जागेत ठेऊन त्याचे भाडे संस्थेस मिळावे. कर्जवाटप झाल्यानंतर शिल्लक धान्य त्वरीत घेऊन जाण्याची व्यवस्था महामंडळाने करावी.

७. खावटी कर्ज वसूलीसाठी संस्थेकडून कर्जदार सभासदांच्या याद्या घेऊन महामंडळाने एकाधिकार खरेदीच्यावेळी सदर वसूल करावी. पर्यायाने वसूलीचे प्रमाण वाढेल

८. आदिवासींना पावसाळ्यातील ४ महिने कुपोषण व उपासमारीपासून संरक्षण व्हावे याकरिता 'धान्य बँका' (Grain Banks) स्थापन करण्यात याव्यात. या धान्य बँका राळेगणसिध्दी येथील धान्य बँक प्रकल्पाप्रमाणे असाव्यात. अथवा सहकारी तत्वावर चालविणयात याव्यात.

वरीलप्रमाणे खावटी कर्ज योजनेला काही बाबींमध्ये सुधारणा केल्यास ही योजना संस्थेला तारक व सभासदांना हितकारक ठरु शकेल.

संदर्भ :- १. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ , मर्यादित २१ वा वार्षिक अहवाल.

२. *Problems of consumption finance in tribal areas with special reference to Junnar reference to Junnar and Ambegaon Tribal Block- Shri.D.R.Ghode.*

स्वयंसेवी संस्था- विकासातील बरोबरीचा भागीदार -भूमिका विश्लेषण

श्री.सो.रा.शेवकरी *

प्रास्ताविक

सन १९९२ पासून आपल्या देशात नवीन आर्थिक धोरण अंगीकारण्यात आले आहे. त्या धोरणाची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी जागतिक बँकेने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने आपल्या देशाला दिलेले आहे. त्यावेळी जागतिक बँकेने ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत व कर्ज मंजूर करताना ज्या अटी घातल्या आहेत त्यादृष्टीने स्वयंसेवी संस्थाबाबत धोरणात्मक दृष्टीकोन स्विकारण्यास सांगितले आहे. समाजातील गरीब, गरजू व कमकुवत घटकांच्या विकास कार्यात शासनाने प्रत्यक्षपणे गुंतू नये तर त्या कामासाठी स्वयंसेवी संस्थाचा सहभाग व सहकार्य घ्यावे अशी सूचना जागतिक बँकेने विशेषत: अमेरिकेने भारतास केली आहे.

आर्थिक धोरणाच्या शिथिलीकरणामुळे विकास प्रक्रियेतील मागास, गरीब, कमकुवत लोकसंख्या घटकांकडे लक्ष वेधले गेले आहे. मानव साधन संपत्तीमधील काही घटक म्हणजे स्त्रिया व मुले (लहान) यांचेबाबतच्या दृष्टीकोनामध्ये बदल होऊन त्यांचेबाबत वाढीव जाणीव निर्माण झाली आहे. नव्या बदलत्या परिस्थितीमध्ये ज्या गरजा वाढल्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी केवळ शासन पुरे पडू शकत नाही. विकास कार्यक्रमाची फळे अत्यंत गरजू व मागासवर्गीयांपर्यंत पोहोचविण्याची असतील तर शासनाबरोबर इतर सामाजिक संस्थांनीही व संघटनानीही या कार्यास हातभार लावणे गरजेचे आहे. म्हणूनच यासाठी स्वयंसेवी संस्था/संघटनांनी विकासाच्या प्रक्रियेमध्ये मोलाची व महत्वपूर्ण भूमिका बजावयाची आहे. शासनाबरोबर विकास कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणीमध्ये एक समान भागीदार म्हणून भूमिका पार पाडावयाची आहे. ही एक काळाची गरज आहे,असे मला वाटते.

स्वयंसेवी संस्था म्हणजे काय ?

स्वयंसेवी संस्था म्हणजे बिगर शासकीय संस्था (Non Government Orgnisation)(NGO)) ही अशी एक संस्था अथवा संघटना की जिने आपणहून विकासाच्या कामामध्ये योगदान करण्याचे व त्यासाठी आवश्यक ते सर्वप्रकारचे काम करण्याचे अंगीकारले आहे. स्वयंसेवी संस्था हया निष्कामवृत्तीच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने कार्य करतात व संपूर्णपणे वैयक्तिक लाभाची अपेक्षा न धरता तसेच सेवानुवर्तीवृत्ती असलेल्या व्यक्तींच्या योगदानावर अवलंबून असतात. अर्थात त्यांनी अंगीकारलेल्या कार्यामध्ये व त्याच्या सिध्दीसाठी या संस्था शासन किंवा देणगीदार यांचेकडून आवश्यक तो निधी/अर्थसहाय्य मिळवू शकतात.

स्वयंसेवी संस्थांची महत्वपूर्ण भूमिका:-

एखादा विकास कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्या क्षेत्रामध्ये जनजागृती करणे व लोकांचा जाणीवपूर्वक सहभाग आवश्यक आहे. ,अशा ठिकाणी स्वयंसेवी/सेवाभावी प्रयत्नांची गरज विशेष भासते. स्वयंसेवी संस्था हया आकाराने लहान व नोकरशाहीपेक्षा वेगळे, स्वतंत्र स्वरुप असलेल्या संस्था, शासकीय निर्बंधापासून अलिप्त असल्याने त्यांचेकडील विचार, तंत्रज्ञान, संघटनात्मक कौशल्य तसेच इतर गोष्टीसाठी प्रयोग करणे त्यांना परवडते.

सर्वसाधारणपणे स्वयंसेवी संस्था हया त्यांच्या कार्यामध्ये अगदी वरच्या पातळीवरील लवचिकता (Flexibility) दर्शवितात. मानवी करुणा व त्याग भावना, समर्पणाची भावना ही त्यांची खरी साधने आहेत. त्या झटपट विनाविलंब कार्यवाही करु शकतात. कोणत्याही प्रकारच्या वरच्या आदेशाची वाट न पाहता योग्य परिस्थितीत योग्य निर्णय घेणे त्यांना जमते.बदलत्या ग्रामीण परिस्थितीतनुरुप त्या त्यांच्या कामाची पध्दती जुळवून घेऊ शकतात. आणखी असे की स्थानिक परिस्थितीची चांगली माहिती असलेल्या स्थानिक कार्यकर्त्यांचा, जाणकारांचया संच आपल्या कामासाठी वापरतात. म्हणूनच त्या ग्रामीण गरीबांना संघटीत करण्यास उत्तम संस्था आहेत. शिक्षण, आरोग्य की ज्या क्षेत्रामध्ये लोकांचा जाणीवपूर्वक सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे अशा क्षेत्रामध्ये त्या महत्वपूर्ण भूमिका पार पाडू शकतात.

स्वयंसेवी संस्था तीन प्रकारची अर्थपूर्ण भूमिका बजावू शकतात.

१. ग्रामीण जनतेला विकासात्मक दृष्टीकोन स्विकारण्यास प्रवृत्त करणे.

---

* संशोधन सहाय्यक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२. नवीन कार्यक्रमाव्दारे नवीन पध्दती, प्रयोग यांचा पाया घालून नाविन्यपूर्ण घटक म्हणून काम करणे.

३. स्थानिक लोकांच्या गरजा आणि अपेक्षा यांचेशी एकरुप होऊन त्या क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणे.

ग्रामीण दारिद्रय आणि बेरोजगार या समस्यांनी आपल्या देशात अनिष्ट सूचक असे स्वरुप धारण केले आहे. म्हणून आजचा प्रश्न हा स्वयंसेवी संस्थांचा विकास कार्यक्रमामध्ये सहभाग हवा किंवा नको हा नसून खरा प्रश्न स्वयंसेवी /सेवाभावी संस्थांचे ग्रामीण विकासाचे उदिष्टय गाठण्यासाठी सहकार्य कसे मिळवावयाचे हा आहे. आणखी असे की शासनाकडील साधने व मनुष्यबळ यांच्या काही अंगभूत मर्यादा पाहता स्वयंसेवी सेवाभावी संस्थांची ग्रामीण विकासातील भागीदारी अगदी गरजेची आहे.

ग्रामीण गरीबांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावण्यामध्ये स्वयंसेवी संस्था एक महत्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी समर्थ आहेत. त्यांना त्यांची इच्छाशक्ती व सामर्थ्यावर त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वत:ची साधने करण्यास उद्युक्त केले पाहिजे. या संबंधात श्री.स्टोन यांनी त्यांच्या 'विकासात्मक प्रशासनासाठी शिक्षण' या ग्रंथात म्हटले आहे की -

'कोणत्याही परिणामकारक विकास आराखडा किंवा कार्यक्रम शासनाकडून राबविला जाऊ शकत नाही. शक्य तितक्या विस्तृत पातळीवरील स्वयंसेवी संस्थांचे चलन वलन व सहभाग एक राष्ट्रीय समाज या दृष्टीकोनातून मिळवावयास पाहिजे.'

सध्याचा दृष्टीकोन हा स्वयंसेवी संस्थांना उद्युक्त करण्याचा एक पर्यायी दृष्टीकोन आहे. कारण ग्रामीण पुनर्रचनेसाठी त्यांना निर्णायक स्वरुपाची भूमिका त्यांना वठवावयाची आहे. दुसरा पर्याय असा की, स्वयंसेवी संस्था हया समाज शक्य तितक्या लवकर स्वयंपूर्ण व स्वतंत्र कसा होईल यासाठी प्रयत्नशील असतात.

स्वयंसेवी संस्थांचे वर्गीकरण:-

शासकीय धोरणात्मक दृष्टीकोनातून स्वयंसेवी संस्थांची वर्गवारी खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात आली आहे. ही वर्गवारी करतानां स्वयंसेवी संस्थांच्या कार्य उदिष्टांवर भर देण्यात आलेला आहे.

१. **फक्त सेवा देणाऱ्या संस्था** :-यामध्ये तांत्रिक व प्रोत्साहक मध्यस्थ संस्थांचा समावेश होतो. तसेच पथदर्शक संस्थांचाही अंतर्भाव होतो.

२. **संकल्पना व नवविचार यांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्था** :- विकास कार्यक्रमामध्ये नवीन संकल्पना व नव विचारावर भर देऊन कार्य यशस्वी करणाऱ्या संस्थांचा अंतर्भाव होतो.

३. **कर्मचारी संघटना/कामगार संघटना सहकारी संस्था** :- अशा संस्था कुठलीही सेवा देत नाहीत.

परंतु उपरोक्त वर्गीकरण एकांगी स्वरुपाचे वाटते. प्रत्यक्षात स्वयंसेवी संस्था सेवा देण्यापासून, लोकजागृतीपासून, लोक संघटनापर्यंत तसेच ग्रामीण विकासापासून आधुनिक विज्ञानापर्यंत विविध कामे पार पाडत असतात. तेव्हा स्वयंसेवी संस्थांची वर्गवारी करायची झाली तर (१) सेवा देणाऱ्या (२) विकास कार्य करणाऱ्या (३) लोक जागृती करुन संघटना कार्य करणाऱ्या अशी करायला हवी.

दुसरे असे की धार्मिक कार्य करणाऱ्या व राजकिय पक्ष कार्य करणाऱ्या संघटनांना स्वयंसेवी संस्थांमध्ये समाविष्ट करण्यात येऊ नये. कारण धार्मिक संघटनांचे कार्य हे विशिष्ट समाजाकरिता मर्यादित असते तर कर्मचारी संघटना, कामगार संघटना हया पक्ष राजकारणामध्ये गुंतलेल्या आढळतात.

स्वयंसेवी संस्थांबाबत धोरणात्मक दृष्टीकोन:-

स्वयंसेवी संस्थाकडे असलेली अव्यक्त व प्रचंड सामाजिक शक्ती यांचा उपयोग करुन घ्यायचा असेल तर अशा संस्थांच्या विकासाबाबत शासनाचा दृष्टीकोन ठाम असला पाहिजे याची जाणीव शासनास झाली आहे. त्यादृष्टीने औपचारिक धोरणात्मक दृष्टीकोनासंबंधीचे निवेदन केले तर शासन यंत्रणा व स्वयंसेवी संस्था यामध्ये पुरेसे सांमजस्य राहील व एकाच क्षेत्रात दोन्ही यंत्रणा काम करीत असतील तर पुनरावृत्ती टाळता येईल.

स्वयंसेवी संस्थांचा विकास कार्यामधील भरीव व वाढता सहभाग लक्षात घेता काही धोरणात्मक निवेदन करुन मार्गदर्शक तत्वे ठरवून देता येतील ज्या योगे मानवी व आर्थिक साधन संपत्तीचा सध्याचा उपयोग आणखी जास्तीत जास्त क्षेत्राकडे वळवून सामाजिक विकास जलदगतीने करणे शक्य होईल.

महाराष्ट्रामध्ये स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या कार्याची भरीव व तेजस्वी परंपरा आहे. प्रत्येक सामाजिक सुधारणांच्या चळवळी व संघटनात्मक भरीव कार्य या संस्थांनी मोठया आस्थेने केले आहे, असे इतिहास सांगतो.

विकासाच्या विविध योजना विशेषत: दारिद्रय निर्मुलनाच्या कार्यात शासनाने अंगीकारलेले कार्य लवचिक व लोकानुवर्ती व अपारंपारिक पध्दतीने समाजापर्यंत पोहोचवणे

आवश्यक आहे ते काम पंचायत राज्य, लोकशाही विकेंद्रीकरण या माध्यमातून करणे शक्य आहे. कारण यामुळे लोकांना त्यांच्या लाभाशी/फायद्याशी निगडीत बाबीमध्ये निर्णय घेण्याची संधी मिळू शकते. त्याचं धर्तीवर या क्षेत्रामध्ये स्वयंसेवी संस्था फार मोलाचे कार्य करु शकतील अशी शासनाची धारणा आहे.

नवी दिल्ली येथे भरलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या मेळाव्यात बोलताना पंतप्रधानांनी हेच स्पष्टपणे निदर्शनास आणून दिले की आपणाकडे असलेली मानवी, नैसर्गिक व संघटनात्मक साधने एकत्र आणली व त्यांची कार्य तत्परतेने ज्या क्षेत्राकडे व कार्यक्रमाकडे जास्त निकड आहे तेथे उपलब्धता केली नाही तर दारिद्रय निर्मूलनाचे उदिष्ट अल्पकाळात गाठणे शक्य होणार नाही.

अशा परिस्थितीत शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी व पंचायत राज्य यासारख्या लोक संस्थांनी हे उदिष्ट साध्य करण्यासाठी सहकारी भाव ठेवून व सामंजस्याने आपली शक्ती लावणे आवश्यक आहे. यासाठी स्त्रियांच्या प्रश्नांकडे सर्वप्रथम व संपूर्णपणे लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे.

या क्षेत्रामध्ये बाहेरील शक्तींची मदत न घेता लोकांनी स्वत:चे प्रश्न स्वत:च सोडवावेत, अशी परिस्थिती नजिकच्या भविष्यकाळात निर्माण होणे आवश्यक आहे. अंतिमत: लोकांनी आपले शासक बदलावयाचे नाहीत तर स्वत:चे स्वत: शासक व्हावयाचे आहे. जनताभिमुख विकासाचा हा खरा अर्थ आहे. एखाद्या स्वयंसेवी संस्थेने विकासासाठी एखादा भाग निवडला असेल व तेथील कार्यभाग पूर्ण झाल्यावर या संस्थेने त्या भागातून आपले आस्तित्व संपवून ज्या अविकसित भागामध्ये/क्षेत्रामध्ये अशा संस्थेची अधिक गरज आहे, अशा ठिकाणी जाऊन कार्य सुरु करावे, अशी अपेक्षा आहे.

विकासासाठी अग्रक्रम क्षेत्रे

विकासाची अशी काही अनेक क्षेत्रे आहेत की ज्यामध्ये विभाग/खात्याच्या कार्यक्रमापेक्षा स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न जास्त फायदेशीर ठरु शकतात. त्यामध्ये प्रामुख्याने खालील विकास क्षेत्रे नमूद करता येतील.

१. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची सोय, तसेच ग्रामीण स्त्रियामधील निरक्षरतेचे उच्चाटन
२. लोकसंख्या वाढीवर नियंत्रण
३. सर्वांगीण आरोग्य व्यवस्था
४. सर्वांसाठी किमान गरजा पूर्ती व्यवस्था
५. सर्वांना कामाची सुविधा
६. कास्तकारांना ते कसत असलेल्या जमिनीवरील वहिवाटीसंबंधी सुरक्षिततेची हमी
७. कायद्याने निर्धारित केलेले किमान वेतन निश्चिती
८. प्रादेशिक असमतोल कमी करणे आणि मागास क्षेत्रांचा जास्त जलद गतीने विकास घडवून आणणे.
९. एकात्मिक, विकसित व न्याय समाज स्थापनेसाठी प्रयत्न करणे.
१०. सर्व सामाजिक आणि आर्थिक पिळवणूक थांबविणे व तिचा शेवट करणे.
११. देशातील मागास/कमकुवत घटकांना समाजातील उर्वरित सुधारलेल्या घटकांच्या विकास पातळीवर आणणे.
१२. स्त्रिया तसेच लहान मुले यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेशा सेवा पुरेविणे.

डोंगराळ व पर्वतीय क्षेत्रामध्ये तसेच आदिवासी क्षेत्रामध्ये पर्यावरणाची जलद गतीने हानी होत आहे. लोकसंख्याचा प्रचंड दाब, जंगलाचा ऱ्हास आणि जमिनीची मोठ्या प्रमाणावरील धूप यांनी अपशकुनी प्रमाण गाठलेले आहे. अशा विपरित व प्रतिकूल परिस्थितीमध्ये दारिद्रय निर्मूलन व बेरोजगार हे कूटप्रश्न सोडविणे अगदी कठीण आहे. त्यासाठी जमीन, पाणी यांचे रक्षण, सामाजिक वनीकरण तसेच ऊर्जा निर्मितीची पर्यायी साधने व त्यांचा विकास या क्षेत्रामध्ये सध्या प्रश्न सोडविणयाची आत्यंतिक निकड आहे. भविष्यातील धोक्यासंबंधी लोकांना जागृत करण्याबाबत स्वयंसेवी संस्था भरीव कार्य करु शकतात. तसेच ग्रामपातळीवरील लोकांचे सहकार्य मिळवून नियोजनाची आर्थिक आणि सामाजिक उदिष्टये साध्य करु शकतात. तसेच विकास कार्यक्रमांच्या संनियंत्रणामध्ये त्यांना महत्वपूर्ण घटक म्हणून भूमिका निभावता येईल. अनिर्बंध औद्योगिक विकासाचा परिणाम म्हणून प्राथमिक नैसर्गिक साधन सामुग्रीचा होणारा विनाश/ऱ्हास टाळण्यास त्यांना योगदान करावयाचे आहे.

स्वयंसेवी संस्थांना येणाऱ्या अडचणी :-

स्वयंसेवी संस्थांना येणाऱ्या अडचणी ढोबळमानाने खालीलप्रमाणे नमूद करता येतील.

१. आर्थिक :- आर्थिक संस्थांकडून मदत निधी मिळण्याची शक्यता नाही. नोकरशाहीकडून होणारी अडवणूक, तसेच अनुदान देण्याच्या पध्दतीतील किचकटपणा, तांत्रिक व मूलभूत घटकाबाबत मदत

२. स्वयंसेवी संस्थाकडे संघटनात्मक मूलभूत घटकांचा अभाव असतो. उदा.कर्मचारी, कार्यालयीन जागा, व्यवस्थापकीय व तांत्रिक क्षेत्रातील अद्ययावत माहिती यामुळे या त्राची वाढ खुंटलेली आहे.त्यांचा प्रभाव कमी झाला आहे.

जर स्वयंसेवी संस्थांनी विकास कार्यात महत्वाची भूमिका बजवावी असे वाटत असेल तर वरील अडचणी दूर करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये स्वयंसेवी संस्थांचे परीक्षण:-

'सातव्या पंचवार्षिक योजनेचा दृष्टीकोन' या संबंधी सादर केलेल्या परिलेखामध्ये योग्य असे म्हटले आहे की 'स्वयंसेवी संस्थांना त्यांच्या आतापर्यंतच्या भूमिकेपेक्षा अधिक स्पष्टपणे व सक्रीय सहभाग नोंदवावा लागेल, ज्यामध्ये ग्रामीण दारिद्रय-निर्मुलनासाठी कार्यक्रम तसेच जीवनमान उंचावण्यासाठी लोकांना किमान गरजा पुरविण्याचे प्रयत्नावर भर राहील. गरीब आणि गरजू लोकांकरिता असलेल्या कार्यक्रमाच्या डावपेचात्मक उपाययोजनांचा तो एक अविभाज्य अंग असेल. तसेच ज्या लक्ष्य-घटकांचा (Target groups) करिता कार्यक्रम आहेत त्यांचा त्यांना किती प्रमाणात फायदा झाला आहे किंवा कसे याची माहिती खात्रीपूर्वक तपासणी करणारी यंत्रणा म्हणून पर्यायी यंत्रणेचा अंर्तभाव असेल.'

शासन व स्वयंसेवी संस्था यांची वैयक्तिक भूमिका:-

स्वयंसेवी संस्थाच्या संघटनेशी पूर्णपणे सल्लामसलत करुन विशिष्ट वेळेमध्ये उदिष्टये पूर्ण करण्याचा आदेश देऊन शासनाकडील योजना त्यांच्याकडे पूर्णपणे किंवा अंशत: सोपविल्यावर शासन निरीक्षकाची व समन्वयकाची भूमिका करील. अशी काही खालील विकास क्षेत्रे वानगी दाखल सांगता येईल.

अ. शिक्षण
१. साक्षरता चळवळ
२.साक्षरतेनंतरचे अभ्यासक्रम
३.अपरंपरागत शिक्षण

ब. आरोग्य
१.प्राथमिक आरोग्य केंद्रे
२.महिला केंद्रे
३.महिला सहयोगिनी केंद्रे

शासनाच्या प्रत्येक विभागाने दरवर्षी असा वर्ग करता येण्याजोग्या योजना बाजूला काढाव्यात व त्या किती टप्प्यापर्यंत वर्ग करता येतील, याचा आढावा घ्यावा. तसेच सदर योजनांच्यासाठी कोणती निरीक्षण पध्दती वापरता येईल, याबाबत निर्णय घ्यावा. आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वी बरेच अगोदर कोणत्या योजना स्वयंसेवी संस्थाकडे अंमलबजावणीसाठी सोपविता येतील/ वर्ग करता येतील याची यादी जाहीर करावी. या कामी एक 'स्वायत्त मंडळ' स्थापन करुन स्वतंत्र निधी त्यासाठी उपलब्ध करुन द्यायला हवा. अमेरिकेमध्ये अशाप्रकारचे फारमोठया प्रमाणावर विकास निधी आहेत. उदा. फोर्ड फाऊंडेशन, रॉकफेलर, कार्नेजी इ.नियमित व व्यवस्थित विकास कार्य करणाऱ्यां संस्थांना यामधून आर्थिक मदत दिली जाते. भारतात देखील अशाप्रकारचे काही खाजगी विश्वस्त निधी आहेत. परंतू त्यांची आर्थिक ताकद व व्याप सामाजिक विकास क्षेत्राची आवश्यकता भागविण्याइतपत मोठे नाहीत.

सध्या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) हाच एक गरीबी-निर्मुलन कार्यक्रमामधील महत्वपूर्ण व प्रमुख कार्यक्रम आहे. परंतू तो कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यामध्ये संघटित प्रयत्न व मन:पूर्वक सहभाग याची नितांत गरज आहे. त्यामध्ये सर्वसाधारणपणे, योग्य लाभार्थीची निवड, गुंतवणुकीकरिता योग्य क्षेत्र, घटक निवड, कर्जाची वेळेवर मंजूरी, बाजार-भावातील चढ उताराचा कल पाहून वाढीव व उत्पन्न मिळविणे यांचा समावेश करता येईल. त्यासाठी अत्यंतिक सामाजिक बांधिलकी असलेली संस्थाच लोकांचे शिक्षण, जाणीव जागृती करुन लाभार्थीना सामुहिक प्रयत्नासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करु शकेल. त्यासाठी 'संनियंत्रण करणारी संस्था' निर्माण करणे गरजेचे आहे व स्वयंसेवी संस्था हया अगदी योग्य संस्था आहेत यात शंका नाही.

ooo

संदर्भ :-

1. *Donald C.Stone "Education for Development Administrtion" (Micro) Graduate school of public & International affairs, Pittusburgh Unversity.*
2. *S.K.Shrma & S.L.Malhotra 1977 - P-90*
3. *I.S.Sundram : Voluntray agencies & Rural Development-P-160-167*
4. *प्रवाही- एप्रिल-मे, १९९५*

आदिवासी विकासाच्या योजना- पेण प्रकल्प

श्री.एच.आर.दरेकर *

सध्या आदिवासींच्या जलद उन्नतीसाठी शासन स्तरावरुन या प्रकल्पांतर्गत विविध योजनांची मंजूरी देण्यात येते. सन १९९३-९४ या वर्षात घरकूल योजना तर सन १९९४-९५ या वर्षी जमिन सुधारणा योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

१. घरकुल योजना-

सन १९९३-९४ मध्ये दांड कातकरवाडी व मुळशी कातकरवाडी येथे एकूण १८० घरकुलांचे बांधकामास शासनाने मंजूरी दिलेली होती व त्यासाठी रु.२४.०३ लाख रुपयांची तरतूद उपलब्ध केली होती. ही योजना टाटा इन्स्टिटयूट ऑफ सायन्सेस, चेंबूर यांचेमार्फत राबविली जात असून या योजनेवर फेब्रुवारी, ९४ अखेर १४.३९ खर्च झाला आहे. शासनाने उपलब्ध केलेली तरतूद या कामासाठी कमी पडत असल्याने चालूवर्षी उर्वरित कामासाठी रु.४.०१ लाख ची मागणी केली आहे. १८० घरकुलापैकी १०२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले असून ती आदिवासींचे ताब्यात देण्यात आलेली आहे.उर्वरित घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.

२. जमीन सुधारणा :-

आदिवासींना शासनाने बऱ्याच ठिकाणी सिलींग जमिनीचे वाटप केले आहे. भिलवले ता.खालापूर येथील आदिवासींना दिलेल्या सिलींग जमिनीची सुधारणा करुन त्यावर उपसाजलसिंचनाव्दारे पाण्याचा पुरवठा करुन आदिवासींना निविष्ठा संच पुरविणेसाठी शासनाने चालूवर्षी (सन १९९४-९५) रु.१०.१४ लाख निधी उपलब्ध करुन दिला आहे. सध्या जलसंधारण खात्यामार्फत जमीन सपाटीकरणाचे काम जोरात सुरु झालेले आहे. उर्वरित सर्व रक्कम प्रकल्प अधिकारी, यांचे अधिनस्त ठेवलेली आहे. प्रकल्प अधिकारी यांनी १.७० लाख रुपये निधी विभागीय मृद संधारण अधिकारी रायगड, अलिबगा यांचे नांवे मजगी सपाटीकरण व मृदसंधारणाची कामे ६.८८ लाख कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबगा यांचे नांवे वीज संचाव्दारे पाणीपुरवठा करण्यासाठी तसेच १.५६ लाख कृषी विकास अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांना सुधारीत औजारे, बि-बियाणे, खते, बैलजोडी,औषधे खरेदीसाठी सूपूर्त केले आहेत.

३. याच धर्तीवर सन १९९५-९६ या वर्षाकरिता शासनाने आदिवासींसाठी शेळीपालन योजना. गाईपालन योजना, नळपाणीपुरवठा योजना असे विविध योजनांचे प्रस्ताव अपर आयुक्त यांचेमार्फत मंजूरी करिता शासनाकडे पाठविलेले आहेत.

वरील कमांक १ च्या योजनेमुळे आदिवासींच्या निवासाची सोय झाली आहे. तर क्र.२ च्या योजनेमुळे त्यांना भाजीपाला, बागायत पीके, शेती इत्यादी स्वत:चे व्यवसाय सुरु करता येणे शक्य होईल व त्यातून त्यांची नक्की उन्नती होईल, यात शंका नाही.

ooo

*प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण, जि.रायगड

पुस्तक परिक्षण :-

भारतीय समाजगट : एक व्यापक अभ्यास

श्री.शरद कुलकर्णी *

प्रास्ताविक -

भारत हा प्रचंड लोकसंख्या असलेला देश म्हणून ओळखला जातो. पण लोकसंख्येत काही समान चालीरिती असणारे व आपण एक आहोत असे मानणारे शेकडो समाज गट आहेत, याची जाणीव अनेकांना नाही. काहींना तर अशा गटांचे आस्तित्व राष्ट्रीय एकात्मतेला धोकादायक वाटतें. मात्र अनेक समाजशास्त्रज्ञ या सर्वात विविधतेतील एकता शोधतात. यातील काही समाज गटाविषयी अनेक अभ्यास प्रसिध्द झाले आहेत.मात्र या सर्व गटांचा एकत्रित अभ्यास कधी झाला नाही. कारण हे काम दीर्घकालीन व अति खर्चिक होते.

सुदैवाने भारत मानवशास्त्र सर्वेक्षण संस्थेने (Anthropological Survey of India) असा एक प्रचंड प्रकल्प दहा वर्षे खपून पूरा केला आहे व त्या सर्व्हेक्षणावर आधारलेली माहिती प्रसिध्द होत आहे. या सर्व प्रकल्पाचे प्रमुख डॉ.कुमार सुरेश सिंग यांनी या प्रकल्पाची प्रस्तावना लिहून प्रकल्पाचे मुख्य निष्कर्ष प्रसिध्द केले आहेत. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांनी अभ्यासलाच पाहिजे असा हा ग्रंथ आहे. सर्वसामान्य नागरिकांनाही याची माहिती होणे इष्ट आहे. त्या दृष्टीने या लेखात (People of India: An Introduction) या ग्रंथांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र जिज्ञासू वाचकांनी हा ग्रंथ मूळातच वाचला पाहिजे.

भारतीय लोक प्रकल्प

भारतीय मानवशास्त्र सर्वेक्षण संस्थेने हा प्रकल्प २ ऑक्टोबर, १९८५ साली सुरु केला. भारतातील विविध समाज गटांची माहिती थोडक्यात एकत्रित करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता. त्यादृष्टीने किती वेगवेगळे समाजगट आहेत याचा शोध घेण्यात आला आणि एकूण ४६३५ समाज गटांचा अभ्यास करण्यात आला. या प्रकल्पांच्या कामात ५०० समाजशास्त्र अभ्यासकांनी भाग घेतला. त्यासाठी सुमारे १०० कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या व त्यात सुमारे ३००० अभ्यासकांनी भाग घेतला. माहिती संशोधकांनी (Investigetor) यात २६५१० दिवस काम केले आणि ४५९२ खेडयात अभ्यासासाठी २४९५१ प्रमुख लोकांच्या मुलाखती घेतल्या त्यासाठी सुंमारे ७ कोटी रुपये खर्च आला. ही माहिती ऑक्टोबर, १९९० पर्यंत एकत्रित झाली व संगणकाचा वापर करुन तिचे विश्लेषण झाले. त्यानंतर ही माहिती एकूण ७२ ग्रंथात प्रसिध्द करण्याचे ठरले व त्यापैकी १० ग्रंथ आजतागायत प्रसिध्द झाले आहे. त्यापैकी एक प्रमुख ग्रंथ या सर्व कामाची प्रस्तावना हा आहे. ही प्रस्तावना या प्रकल्पाचे प्रमुख संयोजक डॉ.कुमार सुरेश सिंग यांनी लिहिली आहे. डॉ.सिंग हे समाजवंश शास्त्रातील एक मोठे तज्ञ मानले जातात. आदिवासी प्रश्नासंबंधी त्यांची ४० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अनेक वर्षे ते भारत मानववंशशास्त्र संस्थेचे संचालक व नंतर काही वर्षे मुख्य संचालक (Director General) होते व अलिकडेच या पदावरुन निवृत्त झाले आहेत. या प्रकलपावर त्यांनी १० वर्षे निरंतर काम केले आहे व आपले सर्व मनोगत व निष्कर्ष त्यांनी या प्रस्तावनेत व्यक्त केले आहेत. या प्रकल्पात गोळा करण्यात आलेली माहिती व त्याचे संकलन भारताच्या सामाजिक, राजकिय व आर्थिक परिवर्तनात रस असणाऱ्या सर्वांना उपयुक्त ठरणार आहे. या संकलनाचा उपयोग पुढील अनेक वर्षे टिकणार आहे आणि म्हणूनच या प्रस्तावना ग्रंथाची ओळख करुन घेणे महत्वाचे आहे.

डॉ.श्रीनिवास यांचे प्रास्ताविक

या प्रस्तावनेला भारतातील अत्यंत जेष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी एक प्रास्ताविक लिहिले आहे. त्यात त्यांनी भाषा, राहणी, आहार,लोकगीते व कथा, परंपरागत चालीरिती, धर्माचा स्थानिक परिस्थितीनुसार व्यवहार यांच्याव्दारे व्यक्त होणारा भारताच्या विविध भागातील समाज गटांच्या आस्तित्वाची जाणीव यांचा खास उल्लेख केला आहे.या स्थानिक जाणीवा बळकट होत चाललेल्या आहेत. यात त्यांच्या स्वरुपात आर्थिक विकासाबरोबर बदल होत चालले आहेत. हेही स्पष्ट केले आहे. आज विशिष्ट ठिकाणी वास्तव्य करणारे अनेक समाजगट केव्हातरी दुसरीकडून आलेले आहेत. ही मोठया प्रमाणातील विविधता आणि विविधतेविषयी सहिष्णुता हे शास्त्राचे वैशिष्टय आहे. या विविधतेविषयी अभिमान बाळगला पाहिजे आणि त्याचवेळी विविध गट एकमेकांपासून काही ज्ञान, चालीरिती,आचारविचार होत आहेत व त्यामुळे या विविधेतेत एक एकतापण आहे, याची जाणीव ठेवली पाहिजे. शेकडो समाजगट अलग न राहता एकमेकांपासून काही स्विकारत आहेत. हे या सर्व अभ्यासाचे सार म्हणून सांगितले आहे.

*मयुरेश अपार्टमेंट, ब-३०, कस्तुरबावाडी, पुणे ४११ ०१५

राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न

प्रकल्पात ४६३५ समाज गटांविषयी माहिती जमविण्यात आलेली आहे. समाज गट निश्चित करताना भाषा गटांतच विवाह करण्याची पध्दत, आहार,विवाहपध्दती वगैरे गोष्टीचा विचार करण्यात आला. मात्र मुख्य लक्षण समाजगटातील व्यक्ती आपण एका गटाचे आहोत व इतर समाज गटांपासून काहीसे वेगळे आहोत असे मानतात हे समजले गेले.

मात्र या प्रकल्पामुळे राष्ट्रीय एकतेला बाधा येईल अशी शंका घेण्यात आली. पण प्रकल्पाच्या अखेरीला या सर्व गटांनी एकमेकांपासून अनेक गोष्टी स्विकारलेल्या आहेत आणि या सर्व विविधेत एक बळकट एकतेचे सूत्र आहे ही गोष्ट स्पष्ट झाली. समाज गट प्रामुख्याने आंतरविवाह, व्यवसाय, व विशेष करुन आपण एक गट आहोत. ही भावना यावरुन ठरविण्यात आली. जाती आणि जमाती या अनेक गटांच्या मिळून बनलेल्या आहेत, ही गोष्ट सुरवातीसच स्पष्ट झाली. एकच समाजगट वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया नांवाने ओळखला जातो. तर वेगवेगळे समाजगट वेगवेगळया ठिकाणी सारख्याच नांवाने ओळखले जातात. त्यामुळे माहिती जमविण्यासाठी गट निश्चित करण्यात अनेक अडचणी आल्या.

या एकूण माहिती जमा केलेल्या ४६३५ समाज गटापैकी ७५१ अनुसूचित जातीत ६३५ अनुसूचित जमातीत तर १०४६ इतर मागासवर्गीय जातीत मोडणारे होते. यात एक गट एका राज्यात अनुसूचित, दुसऱ्या राज्यात•अनुसूचित जमाती तर आणखी इतर राज्यात इतर मागासवर्गीयांत असेही प्रकार आढळून आले.

काही वैशिष्टयपूर्ण माहिती

या सर्व पाहणीत काही वैशिष्ठयपूर्ण गोष्टी आढळून आल्या. सर्वसाधारणपणे दूधासाठी गाई, म्हशी, मेंढया व शेळया पाळल्या जातात,डुकरे पाळली जातात. मात्र काही आदिवासी गट दूध काढत नाहीत व वापरत नाहीत.सर्वसाधारणपणे काही जमाती व जाती कनिष्ठ मानल्या जातातच. फक्त ९० टक्के समाजगट शाकाहारी आहेत. किमान २५ टक्के गट नियमितपणे मद्यपान करणारे आहेत. तर सुमारे ५५ टक्के अनियमितपणे मद्यपान करणारे आहेत. तांदूळ व गहू हे मुख्य आहार घटक आहेत. एकूण ३२५ भाषा बोलल्या जातात. तर २४ लिपित लिखाण होते. मात्र ६४.२ टक्के लोक एकापेक्षा अधिक भाषा जाणतात व वापरतात. जवळ जवळ ३६८० गटांत वडिलोपार्जित मालमत्ता मुलांमध्ये सारखी विभागली जाते, तर ५२० गटांत मालमत्ता फक्त मुलींमध्ये सारखी विभागली जाते. तर २७ गटात मालमत्ता मुलींमध्ये सारखी विभागली जाते. तर १३ गटात ती फक्त सर्वात लहान मुलीला मिळते. समाज गटांच्या सभासदांची इतर गटांविषयीची उच्चनियतेची कल्पना पाहिली तर समाजगटांची १२.८ उच्च, ४२.८ मध्यम ४३.६ टक्के कनिष्ट अशी विभागणी होते.धर्माविषयी गोळा झालेली माहिती बरीच धक्कादायक आहे. फक्त एकच धर्म पाळणारे गट हिंदू ७६.४ टक्के, मुस्लीमांमध्ये १२.६ टक्के, ख्रिश्चनामध्ये ७.३ टक्के, आदिवासी धर्मात ८.३ टक्के, जैनात २.२ टक्के, बुध्दात २ टक्के,शिखांत २.८ टक्के, ज्यूमध्ये ०.२ टक्के तर पारशांत ०.१९ टक्के आहेत. अनेक समाजगट असल्यामुळे एकापेक्षा अधिक धर्माचे अनुयायी आहेत. तर ११६ हिंदू आणि ख्रिश्चन या दोन्ही धर्माचे समजतात. ८७ टक्के समाजगट हिंदू व शीख या दोन्ही धर्माचे अनुयायी आहेत. ३५ गट हिंदू आणि मुस्लीम या दोन्ही धर्माचे आहेत. एकूण १६ समाजगट तर आपस्तर ३ धर्माचे अनुयायी मानतात. धर्माच्या नांवावर समाज संघटन करणाऱ्यांना यापासून बराच बोध घेता येईल.

समाज गटांचे पारंपारिक व्यवसाय झपाटयाने बदलत आहेत. एकाच समाजगटातील सर्वजण एकच व्यवसाय करीत आहेत, अशी स्थिती कोणत्याही समाजगटांच्या बाबतीत आढळली नाही. बहुसंख्य (३०१३) समाज गटात जमीन मूळ खाजगी मालकीची आहे. मात्र १७८ गटात जमीन समाजाच्या संयुक्त मालकीची असते. समाजगटांच्या आशा-आकांक्षा काय आहेत, याविषयी माहिती गोळा करण्यात आली. शिक्षणाच्या आवश्यकतेविषयी जाण मोठया प्रमाणावर आहे. मात्र मुलींच्या शिक्षणापेक्षा मुलांचे शिक्षण जास्त महत्वाचे आहे, असे अनेक गटांना वाटते. सर्वांना पाणी व जळाऊ लाकूड या महत्वाच्या गरजा वाटतात. नवलाची गोष्ट म्हणजे जवळ जवळ ९७ टक्के लोक रेडिओ ऐकतात तर ७० टक्के लोक टी.व्ही. पाहतात. ही माहिती काहीशी शंकास्पद वाटते. भारतात अनेक विभाग दुर्गम आहेत. अशावेळी ९७ टक्के लोकांना रेडिओ माहिती असेल, पण त्याचा ते वापर करीत असतील हे शंकास्पद आहे.

कुटुंब नियोजनाच्या बाबतीत सुमारे ५० टक्के समाज गटांना कुटुंबाला ३ मुले-मुली असावीत, असे वाटते. सुमारे ६५ टक्के समाज गट कुटुबनियोजनाचा अवलंब करतात. शेवटी या सर्व समाजगटात परस्परांच्या व्यवहारात भाग घेण्याची एकमेकांशी जवळचे संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा आहे आणि यातच भारतीय समाजाच्या एकतेचे सूत्र आहे आणि ही आकांक्षाच भारतीय राष्ट्रीय भावनेचा पाया आहे.

समारोप

ज्यांना शक्य आहे, त्यांनी ही प्रस्तावना मूळातूनच वाचली पाहिजे. हे जमले नाही तरी भारतीय समाजात विविधता असली तरी दृढ एकता आहे याचे भान ठेवले पाहिजे. विविधतेवर टीका करणाऱ्यांना या मूलभूत एकतेची जाणीव दिली पाहिजे. विविधता म्हणजे विभाजन नव्हे हाच या सर्व प्रकल्पांचा मुख्य निष्कर्ष आहे.

वृत्त विशेष

शांतीलाल बनसोडे *

नवीन बदल

महाराष्ट्र राज्यामध्ये नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी मा.ना.श्री.मनोहरपंत जोशी व उपमुख्यमंत्री पदी मा.ना.श्री.गोपीनाथ मुंडे यांचे सरकार स्थापन झाले. नवीन झालेल्या खातेवाटपानुसार आदिवासी विकास विभागाच्या मंत्रीपदी नवीन मान्यवर स्थानापन्न झालेले आहेत ते खालीलप्रमाणे-

(अ) मा.ना.श्री.गोविंदराव चौधरी, कॅबिनेट मंत्री, आदिवासी विकास

(आ) मा.ना.श्री.दिलीपरावजी कांबळे. राज्यमंत्री, आदिवासी विकास

२. आदिवासी विकास विभागाचे सचिव म्हणून श्री.राजेंद्रसिंह, भा.प्र.से. यांनी दिनांक २२ मे, १९९५ पासून कार्यभार हाती घेतला. डॉ.अरुणा बागची माजी सचिव, या आदिवासी विकास विभागात ४ वर्षे सेवा करुन त्या महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून रुजु झाल्या आहेत.

संस्थेला भेटी

३. दि.२२ जून, १९९५ रोजी मा.ना.श्री.दिलीपराव कांबळे, राज्यमंत्री, आदिवासी विकास, यांनी संस्थेस भेट दिली. त्या प्रसंगी त्यांचे शुभहस्ते **" An Overview of Tribal Research Studies"** या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पार पडला. सदरचे पुस्तक संचालक, डॉ.नवीनचंद्र जैन, व सहाय्यक अभिरक्षी डॉ.रॉबिन त्रिभुवन यांनी संपादित केलेले आहे. या समारंभाकरिता डॉ.मृदुला फडके, डीन, मेडिकल कॉलेज, श्री.शरद कुलकर्णी, श्री.बोधनकर, श्री.मुटाटकर व अनेक मान्यवर उपस्थित होते.

४. श्री.राजेंद्रसिंह , सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ता.२९ जून, १९९५ रोजी संस्थेस भेट दिली.

५. मा.श्री.मुन्शीलालजी गौतम, आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी संस्थेमध्ये दि.१५ जून,१९९५ रोजी भेट देऊन संस्थेच्या कामाबद्दलचा आढावा घेतला.

६. डॉ.ए.बी.हिरामणी, संचालक, कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी या संस्थेस दि.९.६.९५ रोजी भेट देऊन संस्थेतील विज्ञान शिक्षक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण सत्रात मार्गदर्शन केले.

७. मा.ना.ॲड.गोविंदराव चौधरी, मंत्री, आदिवासी विकास व मा.ना.श्री.दिलीपराव कांबळे, राज्यमंत्री, आदिवासी विकास यांनी दि.१३ सप्टेंबर,१९९५ ला संस्थेला भेट देऊन संस्थेच्या कामकाजाची पाहणी केली व कामाबद्दल आनंद व्यक्त केला. तसेच आदिवासी युवक प्रशिक्षणार्थींना स्पर्धापूर्व परीक्षेच्या तयारीच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

---

*उपसंचालक (सं.) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे १

प्रकाशित मूल्यमापन अहवाल

(१) An Evaluation study of state Exise scheme in Tribal Areas, 1995

(२) An Evaluation of Health and Nutritional Beliefs Practices and Facilities among the Tribals of Dharni and Chikhaldara, 1995

(३) सेवापूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाचे मूल्यमापन, १९९५

(४) सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राचा मूल्यमापन अहवाल,१९९५

(५) आदिवासी हस्तकलेच्या विकासात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचा सहभाग

(६) A Monograph on Primitive Tribes with Reference to the Chenchus, Sahariyas & Katkaris.

(7) Status Report on Health and Nutritional practices and facilities among the Tribals of Dhule District.

८. सन १९९५-९६ या वर्षासाठी प्रशिक्षणाचे महत्वाचे उपक्रम

सेवांतर्गत व सेवापूर्व प्रशिक्षण अशी दोन्ही मिळून एकूण ७० प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. एप्रिल, १९९५ पासून ऑगस्ट १९९५ अखेरपर्यंत खालील महत्वाची प्रशिक्षण सत्रे यशस्वीरित्या संपन्न झाली आहेत :-

(१) सहाय्यक प्रकल्प अधिकारी, यांचेकरिता विभागीय परीक्षासंबंधीचे व नियोजनासंबंधीचे प्रशिक्षण संपन्न झाले.

(२) शासकीय आश्रमशाळा मुख्याध्यापकांसाठी पुणे, नाशिक व अमरावती येथे महत्वपूर्ण उजळणी प्रशिक्षण नाशिक, पुणे येथे संपन्न झाले.

(३) शासकीय आश्रमशाळांच्या शिक्षकांसाठी इंग्रजी, विज्ञान, विषयक प्रशिक्षण नाशिक, पुणे येथे संपन्न झाले.

(४) आश्रमशाळा शिक्षकासांठी सांस्कृतिक कार्यक्रम विषयक खेळ विषयक प्रशिक्षण पुणे, नाशिक, अमरावती येथे संपन्न झाले.

(५) प्रकल्पस्तरीय संवर्गामधील विविध कर्मचाऱ्यांसाठी खालील सत्रे संपन्न झाली. भांडारपाल , कार्यालय अधीक्षक ,मुख्य लिपिक वरिष्ठ लिपिक, यांचेकरिताही रचना व कार्यपध्दती विषयांचे प्रशिक्षण संपन्न झाले

(६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीची ३ प्रशिक्षण सत्रे संपन्न झाली असून आदिवासी युवक नेतृत्व शिबिरेही धारणी, राजूर, घोडेगांव, पांढरकवडा, किनवट येथे संपन्न झाली आहेत. शिवाय दोन प्रकल्प मुख्यालयी व्यावसायिक प्रशिक्षण सत्रांचेही आयोजन संपन्न झाले आहे.

नाशिक येथील प्रशिक्षणाकरिता मा.डॉ.मुन्शीलालजी गौतम, आयुक्त, आदिवासी विकास यांचे विशेष मार्गदर्शन लाभलेले असून अपर आयुक्त, नाशिक, अपर आयुक्त, अमरावती यांचेही त्यांचे विभागातील प्रशिक्षणाकरिता प्रोत्साहन लाभले आहे.

९. संस्थेच्या प्रांगणात १ मे, १९९५ ला महाराष्ट्र दिनी व १५ ऑगस्ट, १९९५ ला स्वातंत्र्य दिनानिमित्त मा.डॉ.नवीनचंद्र जैन, संचालक यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला.

शासन निर्णय :-

आदिवासी विकास सेवेत सह आयुक्त, आदिवासी विकास ही पदे निर्माण करणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय कमांक : आस्था-१०९३/प्र.क्र.२६३/का.१५
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक ७ मार्च, १९९५

वाचा :- (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०८९/प्र.क्र.७९९/का.१५, दिनांक १५ जानेवारी, १९९२
(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/९३/का.१५, दि. ९ नोव्हेंबर १९९३

पस्तावना :- वर उल्लेखित दिनांक १५ जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयानुसार आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची पुनर्रचना करण्यात येऊन आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिपत्याखाली नाशिक. नागपूर, ठाणे आणि अमरावती येथे अपर आयुक्त, आदिवासी विकास, यांची कार्यालये स्थापन करण्यात येऊन पुनर्रचनेपूर्वी समांतररित्या कार्यरत असलेल्या आदिवासी विकास संचालनालय आणि प्रकल्प यंत्रणा यांचे विलीनीकरण करण्यात आले. पुनर्रचनेत पूर्वीच्या संचालनालया अंतर्गत उपलब्ध असलेल्या सहसंचालक, आदिवासी विकास या रुपये ३७००-५००० वेतनश्रेणीतील दोन पदांचा वापर अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे आणि अमरावती येथील कार्यालयासाठी करण्यात आला. उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद ३ (२) (ड) अनुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व अमरावती ही पदे आदिवासी विकास सेवेतून भरण्यात येतील. तथापि, आदिवासी विकास सेवेतून योग्य उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ही पदे भारतीय प्रशासनिक सेवेतून भरण्यात यावीत अशी तरतूद करण्यात आलेली होती.

२. १९९३ च्या पावसाळ्यात अमरावती जिल्हयाच्या मेळघाट परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे त्या परिसराचा मोठा भाग संपर्कविहिन झाला व शासकीय यंत्रणा वेळीच जाऊ न शकल्यामुळे रोगराईमुळे बऱ्याच प्रमाणात आदिवासी बालके मृत्युमुखी पडली. त्या पार्श्वभूमीवर आदिवासी क्षेत्रातील प्रशासन यंत्रणेचे बळकटीकरण करण्याच्या हेतूने शासनाने काही महत्वाचे निर्णय घेतले. त्यानुसार निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/९३/का.१५, दि. ९ नोव्हेंबर १९९३ अनुसार एकूण ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अतिसंवदेनशील म्हणून निवडण्यात आले व त्या प्रकल्पामध्ये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या पदावर भा.प्र.से./भा.व.से. मधील अधिकारी नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहितेखाली अपर जिल्हाधिकारी म्हणून तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियमाखाली जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी म्हणून घोषित करण्याचा तसेच प्रकल्प क्षेत्रातील संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा या प्रकल्प अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय व अनुशासकीय नियंत्रणाखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

३. दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३ च्या शासन निर्णयाव्दारे प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्यात आले. त्यामुळे अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे आणि अमरावती या पदावर भारतीय प्रशासनिक सेवेचा अधिकारी नेमण्याची गरज निर्माण झाली. कारण अपर आयुक्तांच्या नियंत्रणाखाली भा.प्र.से./भा.व.से. मधील काही प्रकल्प अधिकारी राहणार होते तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या विकास नियोजन आराखड्याविषयी वाढीव जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने अपर आयुक्तांना संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी तसेच इतर अंमलबजावणी अधिकाऱ्यांशी प्रभावी, परिणामकारक आणि उपयुक्त फलदायी समन्वय साधणे अपेक्षित आहे.

४. आदिवासी उपयोजनाविषयक संपूर्ण नियोजन विकासाची जबाबदारी आदिवासी विकास विभागाकडे सोपविण्यात आल्यामुळे क्षेत्रीय यंत्रणेचे प्रमुख नियंत्रक कार्यालय म्हणून आदिवासी विकास आयुक्तालयाची जबाबदारी वाढली होती. ही वाढीव जबाबदारी समर्थपणे पार पाडण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास यांना पुरेशा ज्येष्ठतेचे आणि जबाबदारीचे अधिकारी उपलब्ध करुन देणे आवश्यक झाले.

५. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे आणि अमरावती या पदावर भारतीय प्रशासनिक सेवेतील अधिकारी नेमणे आवश्यक झाल्यामुळे आदिवासी विकास सेवेच्या अधिकाऱ्यांना पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेली दोन वरिष्ठ श्रेणीतील पदे संपुष्टात आल्यामुळे अशी समकक्ष पदे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली.

६. वरील पार्श्वभूमीवर आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,नाशिक यांच्या कार्यालयात सह आयुक्त, आदिवासी विकास, असा संवर्ग निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या बाबींचा विचार करुन शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निणय :-(१-०) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या कार्यालयात सह आयुक्त, आदिवासी विकास या वेतनश्रेणी रुपये ३७००-१२५-४७००-१५०-५००० मधील संवर्गात दोन पदे निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे.

(१-१) सह आयुक्त, संवर्गातील ही दोन पदे दिनांक १५.१.१९९२ च्या शासन निर्णयाव्दारे आयुक्तालयास मंजूर करण्यात आलेल्या उप आयुक्त पदापैकी आदिवासी विकास सेवेतील अधिकाऱ्यांकरिता उपलब्ध असलेल्या चार पदांपैकी दोन पदे प्रत्यार्पित करुन त्यांच्याऐवजी मंजूर करण्यात येत आहेत. त्यामुळे इत:पर आयुक्तालयात उप आयुक्त या संवर्गात आदिवासी विकास सेवेतील अधिकाऱ्यांसाठी दोन पदे तर महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अधिकाऱ्यांसाठी एक अशी तीन पदे उपलब्ध राहतील.

(१-२) सह आयुक्त, आदिवासी विकास, या संवर्गातील अधिकारी आयुक्त, आदिवासी विकास यांनी त्यांना नेमून दिलेले काम आणि जबाबदाऱ्या पार पाडतील. तथापि, सह आयुक्तांनी पुढील प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळणे आवश्यक राहील.

(१) आयुक्त, आदिवासी विकास यांनी सह आयुक्तांना प्रदान केलेल्या वित्तीय, प्रशासनिक व अनुशासकीय अधिकारांच्या अनुषंगाने आवश्यक ती कर्तव्य करणे.

(२) आदिवासी उपयोजनेच्या नियोजनविषयक जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या अनुषंगाने सह आयुक्तांना विशिष्ट विकास क्षेत्रनिहाय विवक्षित जबाबदारी नेमून देण्यात यावी.

(३) क्षेत्रीय यंत्रणेतील सर्व वर्ग-३ चा संवर्ग प्रादेशिक संवर्ग आहे. या संवर्गाच्या राज्यस्तरीय नियंत्रणाविषयी विनिर्दिष्ट जबाबदारी सह आयुक्तांकडे सोपविण्यात यावी व सह आयुक्तांनी सर्व अपर आयुक्तांशी योग्य तो समन्वय साधून संनियंत्रण करावे.

(४) विनियोजन लेखे, लेखा परीक्षा आक्षेप यासारख्या महत्वाच्या बाबींची जबाबदारी सह आयुक्तांकडे सोपविण्यात यावी तसेच विधीमंडळविषयक बाबींचा समन्वय आणि पूर्तता यांची विवक्षित जबाबदारी सह आयुक्तांवर सोपविण्यात यावी.

(५) आदिवासी उपयोजनेअंतर्गत विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाच्या विविध विभाग प्रमुखांशी संपर्क आणि समन्वय ठेवण्याची जबाबदारी सह आयुक्त, पार पाडतील.

(१-३) सह आयुक्त, आदिवासी विकास या पदासाठी सेवा प्रवेशाची पध्दती पुढीलप्रमाणे राहील.

(क) महाराष्ट्र आदिवासी विकास सेवा, गट 'अ', श्रेणी १ मधील (उपआयुक्त,आदिवासी विकास/उपसंचालक आदिवासी , विकास,/प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प, श्रेणी-१ या) अधिकाऱ्यामधून निवड पध्दतीने पदोन्नतीने

(किंवा)

(ख) भारतीय प्रशासनिक सेवेच्या वरिष्ठ समय श्रेणीतील अधिकाऱ्यांची नेमणूक करुन (किंवा)

(ग) इतर विभागात समकक्ष पदावर काम करणाऱ्या पात्र अधिकाऱ्याला प्रतिनियुक्तीवर बदलीने नेमणूक देऊन.

वरीलपैकी क्र.(ख) व (ग) हे क्र.(क) चे पर्याय असून क्र. (क) अनुसार महाराष्ट्र आदिवासी विकास सेवेतील अधिकारी उपलब्ध न झाल्यास किंवा पात्र आढळून न आल्यास त्यांचा अवलंब करण्यात येईल.

वरीलप्रमाणे सुधारीत सेवा प्रवेश नियम जारी करण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येईल. शासन अधिसूचना, आदिवासी विकास विभाग क्रमांक टीडब्ल्यूई-१०८२/८१५/(१)/१५ , दिनांक ७ जून, १९९४ अन्वये प्रसृत करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील सह संचालक, आदिवासी विकास या पदांचा सेवाप्रवेश नियम (नियम -३) रद्द समजण्यात यावा, असेही आदेश शासन देत आहे.

२. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रआस्था-१०८९/प्र.क्र.७९९/का.१५, दिनांक १५ जानेवारी , १९९२ च्या परिच्छेद ३ (२) (ड) मधील अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व अमरावती या पदाविषयी असलेली तरतूद रद्द करण्यात येत आहे.

३. सह आयुक्त, आदिवासी विकास या संवर्गातील ही दोन पदे प्रारंभी २९ फेब्रुवारी, १९९६ पर्यंतच्या कालावधीत मंजूर करण्यात येत असून आयुक्त, आदिवासी विकास यांनी या पदांच्या सातत्याकरिता योग्य वेळी शासनास प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

४. सह आयुक्त आदिवासी विकास ही पदे तात्काळ अंमलात येणार असल्यामुळे आयुक्तालयातील उपआयुक्त या संवर्गातील जेष्ठ अधिकाऱ्यांची सह आयुक्त या पदाचा अतिरिक्त कार्यभार या पदावर रितसर व नियमित नियुक्ती होईपर्यंत सोपविण्याचे आदेश आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी काढावेत.

५. वरील पदांवर होणारा खर्च हा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांच्या वेतन व भत्ते याकरिता सन १९९५-९६ या वर्षापासून मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो संबंधित लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

६. हा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या आणि वित्त विभागाच्या (त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.: ५६३/९४/व्यय-११, दि.१९ नोव्हें.१९९४ अन्वये प्राप्त) सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.द.कुलकर्णी)
सहसचिव
महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय :-

आदिवासी क्षेत्रातील प्रशासन यंत्रणेचे बळकटीकरण व प्रशासकीय बदल

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्र. आस्था-०९३/प्र.क्र.२१२/९४/का.१५
मंत्रालयविस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक ३० मार्च, १९९५

वाचा :-

(१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक आस्था-१०८९/प्र.क्र.७९९/का.१५, दिनांक १५ जानेवारी, १९९२.

(२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक आस्था-१०८९/प्र.क्र.७९९/का.१५, दिनांक २२ एप्रिल, १९९२.

(३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/९३/का.१५, दिनांक ९ नोव्हेंबर १९९३.

(४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/ भाग-३/९३/का.१५, दिनांक ३० नोव्हेंबर १९९३

प्रस्तावना :- आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची पुनर्रचना करण्याचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आला. नंतर लगेचच जव्हार येथे स्वतंत्र प्रकल्प कार्यालय स्थापन करण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळे दिनांक २२ एप्रिल, १९९२ च्या शासन निर्णयानुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकलप, डहाणू व शहापूर या कार्यालयांतून तसेच अन्य काही कार्यालयातून काही पदे वेगळी काढून जव्हार कार्यालयाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे डहाणू व शहापूर येथील कार्यालयात तसेच जव्हार कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही, अशी अवस्था निर्माण झाली.

२. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रशासनाचे बळकटीकरण करण्याचा निर्णय दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३ च्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला. त्यानुसार ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प 'अतिसंवदेनशील' म्हणून निवडण्यात आले व तेथे भारतीय प्रशासनिक सेवा/भारतीय वन सेवांतील अधिकारी 'प्रकल्प अधिकारी ' म्हणून नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्प अधिकाऱ्यांना आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विविध योजनांच्या संनियंत्रणविषयक तसेच मंजूरी व कार्यान्वयन विषयक व्यापक अधिकार देण्यात आले असल्यामुळे त्यांना वाढीव पदे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू कर्मचारी वर्गांनी स्वतंत्र व नवीन पदे निर्माण न करता प्रकल्प अधिकाऱ्यांना आवश्यक तो कर्मचारी वर्ग पुर्नमाडणी करुन उपलब्ध करुन देण्यात यावा, असा निर्णय घेण्यात आला.

३. दिनांक ९.११.९३ च्या शासन निर्णयात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणीचे विभाजन करुन चिखलदरा येथे स्वतंत्र प्रकल्प कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयास कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने औरंगाबाद येथील प्रकल्प कार्यालयाचे चिखलदरा येथे स्थलांतर करण्याचे आणि औरंगाबाद येथे, प्रकल्प कार्यालय, अकोला अंतर्गत उपकार्यालय स्थापन करण्याचे आदेश वर उल्लेखित दिनांक ३०.११.९३ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आले. औरंगाबाद येथे उपकार्यालय सुरु करण्यासाठी इतर कार्यालयामधून आवश्यक पदे काढून घेऊन औरंगाबाद उप कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली होती. धारणी प्रकल्पाचे विभाजन केल्यामुळे निर्माण झालेले धारणी व चिखलदरा हे दोन्ही प्रकल्प आकाराने फारच लहान असून त्या दोन्ही प्रकल्पाचे काम एक प्रकल्प अधिकारी व्यवस्थितपणे सांभाळू शकतात. याकरिता चिखलदऱ्याचे कार्यालय औरंगाबाद येथे स्थलांतरीत करण्याची, चिखलदरा व धारणी या प्रकल्पाचे विलीनीकरण करण्याची आणि पांढरकवडा प्रकल्पाचे प्रशासन बळकटीकरणाखाली आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

४. दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३ च्या शासन निर्णयानुसार बळकटीकरणाची व्यवस्था योग्य प्रकारे कार्यान्वित होण्यासाठी जो अतिरिक्त कर्मचारी वर्ग पुर्नमाडंणीव्दारे उपलब्ध होणे आवश्यक होते, त्यामध्ये अडचण निर्माण झाल्यामुळे प्रकल्प कार्यालयाच्या आस्थापनांवर स्वतंत्रपणे पदे निर्माण करण्याची गरज भासू लागली.

५. आदिवासी विकास विभागाकडे आदिवासी उपयोजनेच्या नियोजनविषयक संपूर्ण जबाबदारी आल्यामुळे

अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या कार्यालयात तसेच प्रकल्प कार्यालयात नियोजनविषयक कामे करण्यासाठी योग्य तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याची आवश्यकताही निर्माण झाली.

६. वरील विविध कारणांकरिता आदिवासी विकास विभागाच्या विविध आस्थापनांवर अतिरिक्त कर्मचारी वर्गाची पदे मंजूर करण्याची आणि प्रशासकीय यंत्रणेत काही बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंबंधी मंत्री मंडळाच्या मान्यतेनंतर आता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :- आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेतील विविध कार्यालयाच्या आस्थापनांवर एकूण २५५ पूर्णवेळ व ४ अर्धवेळ पदे निर्माण करण्यास शासन याव्दारे मंजूरी देत आहे. या पदांचा तपशील आणि ती कोणत्या कार्यालयामध्ये व किती संख्येत मंजूर करण्यात आली आहेत, याचे विवरण सोबतच्या सहपत्र 'अ' मध्ये दर्शविण्यात आले आहे. सहपत्र 'आ' मध्ये निर्माण करण्यात आलेल्या पदांचे पदनाम/वर्ग/वेतनश्रेणी यांचा तपशील दर्शविण्यात आला आहे.

२. पुढे विनिर्दिष्टपणे नमूद करण्यात आलेल्या पदांव्यतिरिक्त अन्य सर्व पदे आदिवासी विकास सेवेतून आदिवासी विकास विभागाच्या विविध सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्यांव्दारे भरण्यात येतील.

(क) वरिष्ठ संशोधन अधिकारी, वर्ग-१, नियोजन अधिकारी, वर्ग-२ , आणि संशोधन सहाय्यक, वर्ग-३, या संवर्गातील पदे संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत भरण्यात येतील. ही पदे अर्थ व सांख्यिकी संचालनायाच्या संवर्गाचा एक भाग (केडर पोस्ट) अशी राहतील.

(ख) (१) लेखाधिकारी, वर्ग-२ आणि मुख्य लेखापाल, वर्ग-३ या संवर्गातील पदे संचालक, लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य, यांच्याकडून भरण्यात येतील. ही पदे लेखा व कोषागारे संचालनायाच्या संवर्गाचा एक भाग (केडर पोस्ट) अशी राहतील.

(२) उपलेखापाल, वर्ग-३ या संवर्गातील सर्व पदे आदिवासी विकास विभागाच्या वरिष्ठ लिपिकांकडून पदोन्नतीने भरण्यात येतील. मात्र अशा वरिष्ठ लिपिकांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्र.डीएटी-१७६४/५१८४/६४/बारा, दिनांक १.९.१९६४ अनुसार विहित करण्यात आलेली लेखालिपिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. जो वरिष्ठ लिपिक किंवा उपलेखापाल या पदावर काम करणारे कर्मचारी ही परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत त्यांना परीक्षेस बसून उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षाची मुदत देण्यात येत आहे. या मुदतीत ही परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास संबंधित कर्मचारी वरिष्ठ लिपिक या संवर्गात पदावनत होतील.

(ग) उप अभियंता आणि कनिष्ठ अभियंता या संवर्गातील पदे सार्वजानिक बांधकाम विभागामार्फत भरण्यात येतील व ती त्या विभागाच्या संवर्गाचा एक भाग म्हणून राहतील.

(घ) भूमापनासाठी निर्माण करण्यात आलेली भूमापक, वर्ग-३ ही पदे संचालक, भूमिअभिलेख व जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून भरण्यात येतील व ती भूमिअभिलेख संचालनालयाच्या संवर्गाचा एक भाग म्हणून राहतील.

३. ही २५९ पदे प्रारंभी २९ फेब्रुवारी, १९९६ पर्यंत मंजूर करण्यात येत आहे. या पदांच्या पुढील सातत्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,नाशिक यांनी योग्य वेळी प्रस्ताव शासनास सादर करावा.

४. वरीलप्रमाणे पद मंजूरीबरोबरच शासन, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या कार्यालयासाठी एक व प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई यांच्या कार्यालयासाठी एक अशा दोन जीप खरेदी करण्यासही मंजूरी देत आहेत. या जीप फायबर ग्लास बॉडी बंद, डिझेल इंजिन-४ स्पीड गिअर बॉक्स असलेल्या जीप्स असतील व शासनाच्या मान्यताप्राप्त दरकरारानूसार त्याची खरेदी करण्यात येईल. मुंबई कार्यालयासाठी आवश्यक असणारी जीप अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी तर आयुक्तालयाची जीप आयुक्त्र, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी खरेदी करावी. यासाठी प्रत्येकी रुपये ३.०० लाख पेक्षा जास्त नाही एवढया खर्चास शासन मंजूरी देत आहे.

५. शासन असेही आदेश देत आहे की, दिनांक ९.११.९३ व दिनांक ३०.११.९३ च्या शासन निर्णयानुसार नव्याने स्थापन करण्यात आलेल्या चिखलदरा प्रकल्पाचे धारणी प्रकल्पात विलीनीकरण करण्यात यावे. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा, जि.यवतमाळ बळकटीकरणाखालील योजनेखाली आणण्याचे शासन आदेश देत आहे. औरंगाबाद येथील प्रकल्प कार्यालय दिनांक ३०.११.९३ चे आदेश निर्गमित होण्यापूर्वी ज्या पध्दतीने कार्यरत होते, त्याचप्रकारे सर्व साधन-सामुग्रीसह स्थापन करण्यात यावे असेही शासनाचे आदेश आहेत. या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

(क) चिखलदरा येथील प्रकल्प कार्यालयाकरिता मंजूर असलेले प्रकल्प अधिकारी या भारतीय प्रशासनिक सेवेतील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदे औरंगाबाद येथे

स्थलांतरीत करण्यात यावी व औरंगाबाद येथे स्वतंत्र प्रकल्प कार्यालय सुरु करण्यात यावे.

(ख) चिखलदरा येथील भारतीय प्रशासनिक सेवेचे प्रकल्प अधिकाऱ्याचे पद पांढरकवडा , जि.यवतमाळ येथे स्थलांतरीत करण्यात यावे आणि पांढरकवडा येथील प्रकल्प अधिकारी, वर्ग-१ श्रेणी-२ (रु.२२००-४०००) हे पद औरंगाबाद कार्यालयाकरिता प्रकल्प अधिकारी म्हणून स्थलांतरीत करण्यात यावे.

(ग) याप्रमाणे पांढरकवडा प्रकल्प आता बळकटीकरणाखाली आणण्यात येत असून वर उल्लेखित दिनांक ९.११.९३ च्या शासन निर्णयातील सर्व आदेश त्याला लागू पडतील.

(घ) औरंगाबाद येथे उपकार्यालय स्थापन करण्यासाठी प्रकल्प कार्यालय, नागपूर (सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एक पद), प्रकल्प कार्यालय, अकोला (उपलेखापाल, एक पद), प्रकल्प कार्यालय, यावल (वरिष्ठ लिपिक एक पद व शिपाई एक पद), अपर आयुक्त कार्यालय, नाशिक (आदिवासी विकास निरीक्षक एक पद) आणि प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा (लिपिक तथा टंकलेखक एक पद) येथील कंसात दाखविलेली सर्व पदे मूळच्या कार्यालयांना परत जोडण्यात यावीत.

(च) वरील बदलानुसार धारणी, अकोला, नांदेड आणि औरंगाबाद यांची सुधारीत भौगोलिक अधिकारिता खालीलप्रमाणे राहील.

अ.क.	प्रकल्प कार्यालयाचे नांव	प्रकल्पाची भौगोलिक अधिकारिता
१.	धारणी, जि.अमरावती	संपूर्ण अमरावती जिल्हा
२.	अकोला	अकोला व बुलढाणा हे जिल्हे
३.	किनवट, जि.नांदेड	नांदेड व परभणी जिल्हे
४.	औरंगाबाद	औरंगाबाद, जालना, लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्हे

छ) आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी औरंगाबाद येथील प्रकल्प कार्यालय सुरु करण्याच्या तसेच वर म्हटल्याप्रमाणे पदे व साधनसामुग्री स्थलांतरीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही त्वरीत करावी.

६. या शासन निणयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या पदांचा आणि वाहन खरेदीचा खर्च प्रथमत: शासन ज्ञापन, वित्त विभाग आकनि-११९५/२२६/अर्थसंकल्प-१७, दिनांक १५.३.९५ (संगणक सांकेतांक क्रमांक-८०००-२२६-९) नुसार मंजूर आकस्मिकता निधी अग्रीम रुपये ११ लाख मधून करावा तसेच तो 'मागणी क्रमांक : टी-७,२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-०२ अनुसूचित जमातीचे कल्याणा-१०२ आर्थिक विकास (८) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (एक) अन्वये केंद्रीय सहाय्य' या व्ययशीर्षाखाली खर्ची टाकावा.

७. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी संबंधित 'आहरण व संनियंत्रण ' अधिकाऱ्यांकडे रक्कम सुर्पूद करण्यासंबंधीच्या आदेशात आकस्मिकता निधी अग्रिमातून खर्च करताना सादर करण्यात आलेल्या देयकांवर आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन, वित्त विभाग आकनि-११९५/२२६/अर्थसंकल्प-१७, दिनांक १५.३.९५ (संगणक सांकेतांक क्रमांक-८०००-२२६-९) अन्वये मंजूर झाले असे लालशाईने लिहावे, असे नमूद करावे तसेच अग्रीमातून प्रत्यक्ष मासिक खर्च केल्याची एकत्रित माहिती दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत वित्त विभाग व आदिवासी विकास विभागास न चुकता पाठवावी.

८. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी आस्मिकता निधीतून घेतलेल्या अग्रिमांचा परतावा करण्यासाठी तसेच वर्षाच्या उर्वरित काळासाठी खर्चाची तरतूद करण्यासाठी पावसाळी अधिवेशनात (जून-जुलै, १९९५) पुरवणी मागणी विधीमंडळाला सादर करण्यासाठी तात्काळ शासनास पाठवावी.

९. हा शासन निर्णय दताधिकारी समितीच्या ४.८.१९९४ रोजी झालेल्या बैठकीत दत्ताधिकार समितीने दिलेल्या निर्देशानुसार व वित्त विभागाचा, त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.९०६/९४/व्यय-११, दिनांक १७.२.१९९५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.द.कुलकर्णी)
सहसचिव,
आदिवासी विकास विभाग

सहपत्र 'अ'

अ. क.	मंजूर करण्यात आलेली पदे	कार्यालय											
		आदिवासी विकास आयुक्तालय	अपर आयुक्त				प्रकल्प						
			नाशिक	ठाणे	अमरावती	नागपूर	जव्हार	डहाणू	शहापूर	पेण	घोडेगांव	मुंबई	नाशिक
१.	प्रकल्प अधिकारी	-	-	-	-	-	-	-	-	-	-	१	-
२.	वरिष्ठ संशोधन अधिकारी	-	१	१	१	१	-	-	-	-	-	-	-
३.	सहाय्यक प्रकल्प अधिकारी	-	-	-	-	-	-	१	१	-	-	-	-
४.	नियोजन अधिकारी	-	-	-	-	-	१	१	-	-	-	-	१
५.	लेखाधिकारी	-	-	-	-	-	१	१	-	-	-	-	१
६.	उप अभियंता	-	-	-	-	-	१	१	-	-	-	-	१
७.	कार्यालय अधीक्षक	-	-	-	-	-	-	-	१	-	-	-	-
८.	संशोधन सहाय्यक	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
९.	मुख्य लेखापाल	-	-	-	-	-	-	-	-	-	-	१	-
१०.	निम्नश्रेणी लघुलेखक	-	-	-	-	-	१	१	-	-	-	-	१
११.	उप लेखापाल	-	-	-	-	-	२	१	-	-	-	-	१
१२.	कनिष्ठ अभियंता	-	-	-	-	-	२	२	-	-	-	-	२
१३.	आदिवासी विकास निरीक्षक	-	-	-	-	-	-	१	२	-	-	-	-
१४.	वरिष्ठ लिपिक	-	-	-	-	-	२	३	२	-	-	-	२
१५.	लघुटंकलेखक	-	-	-	-	-	-	-	१	-	-	-	-
१६.	सांख्यिकी सहाय्यक	-	१	१	१	१	१	१	१	१	१	-	१
१७.	लिपिक-टंकलेखक	-	१	१	१	१	५	५	४	२	२	-	४
१८.	वाहनचालक	१	-	-	-	-	-	-	-	-	-	१	-
१९.	भूमापक	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
२०.	पहारेकरी	-	-	-	-	-	-	-	-	-	-	१	-
२१.	शिपाई (भूमापनाकरिता)	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
२२.	अर्धवेळ सफाईगार	-	-	-	-	-	१	-	-	-	-	१	-
	एकूण	१	३	३	३	३	१७	१८	१२	३	३	५	१४

अ. क्र.	मंजूर करण्यात आलेली पदे (संक्षिप्त पदनाम)	प्रकल्प											
		कळवण	तळोदा	नंदूरबार	यावल	राजूर	धारणी	औरंगाबाद	पांढर कवडा	अकोला	किनवट	भामरागड	अहेरी
१.	प्रकल्प अधिकारी	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
२.	वरिष्ठ संशोधन अधिकारी	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
३.	सहाय्यक प्रकल्प अधिकारी	-	-	-	-	-	-	-	-	१	-	-	-
४.	नियोजन अधिकारी	१	१	-	-	-	१	-	१	-	१	१	१
५.	लेखाधिकारी	१	१	-	-	-	१	-	१	-	१	१	१
६.	उप अभियंता	१	१	-	-	-	१	-	१	-	१	१	१
७.	कार्यालय अधीक्षक	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
८.	संशोधन सहाय्यक	-	-	-	-	-	-	१	-	१	-	-	-
९.	मुख्य लेखापाल	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
१०.	निम्नश्रेणी लघुलेखक	१	१	-	-	-	१	-	१	-	१	१	१
११.	उप लेखापाल	१	१	-	-	-	१	-	१	-	१	१	१
१२.	कनिष्ठ अभियंता	२	२	-	-	-	२	-	२	-	२	२	२
१३	आदिवासी विकास निरीक्षक	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
१४.	वरिष्ठ लिपिक	२	२	-	-	-	२	-	२	-	२	२	२
१५.	लघुटंकलेखक	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
१६.	सांख्यिकी सहाय्यक	१	१	१	१	१	१	१	१	१	१	१	१
१७.	लिपिक-टंकलेखक	४	४	२	२	२	४	२	४	२	४	४	४
१८.	वाहनचालक	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
१९.	भूमापक	-	-	-	-	-	५	-	-	-	-	४	३
२०.	पहारेकरी	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
	शिपाई (भूमापनाकरिता)	-	-	-	-	-	५	-	-	-	-	४	३
२२.	अर्धवेळ सफाईगार	-	-	-	-	-	-	१	-	१	-	-	-
	एकूण	१४	१४	३	३	३	२४	५	१४	६	१४	२२	२०

अ.क्र.	मंजूर करण्यात आलेली पदे (संक्षिप्त पदनाम)	प्रकल्प					
		गडचिरोली	नागपूर	देवरी	चिमूर	चंद्रपूर	एकूण (३ ते ३१)
१.	प्रकल्प अधिकारी	-	-	-	-	-	१
२.	वरिष्ठ संशोधन अधिकारी	-	-	-	-	-	४
३.	सहाय्यक प्रकल्प अधिकारी	-	-	-	-	-	३
४.	नियोजन अधिकारी	१	-	-	-	-	११
५.	लेखाधिकारी	१	-	-	-	-	११
६.	उप अभियंता	१	-	-	-	-	११
७.	कार्यालय अधीक्षक	-	-	-	-	-	१
८.	संशोधन सहाय्यक	-	-	-	-	-	२
९.	मुख्य लेखापाल	-	-	-	-	-	१
१०.	निम्नश्रेणी लघुलेखक	१	-	-	-	-	११
११.	उप लेखापाल	१	-	-	-	-	१२
१२.	कनिष्ठ अभियंता	२	-	-	-	-	२२
१३.	आदिवासी विकास निरीक्षक	-	-	-	-	-	३
१४.	वरिष्ठ लिपिक	२	-	-	-	-	२५
१५.	लघुटंकलेखक	-	-	-	-	-	१
१६.	सांख्यिकी सहाय्यक	१	१	१	१	१	२७
१७.	लिपिक-टंकलेखक	४	२	२	२	२	७६
१८.	वाहनचालक	-	-	-	-	-	२
१९.	भूमापक	३	-	-	-	-	१५
२०.	पहारेकरी	-	-	-	-	-	१
२१.	शिपाई (भूमापनाकरिता)	३	-	-	-	-	१५
२२.	अर्धवेळ सफाईगार	-	-	-	-	-	४
	एकूण	२०	३	३	३	३	२५९

सहपत्र 'आ'

अ.क्र.	पदाचे नांव	वर्ग/गट	पदाची वेतनश्रेणी
१.	प्रकल्प अधिकारी	१/अ	२२००-७५-२८००-द.रो.१००-४०००
२.	वरिष्ठ संशोधन अधिकारी	१/अ	२२००-७५-२८००-द.रो.१००-४०००
३.	सहाय्यक प्रकल्प अधिकारी	२/ब	२०००-६०-२३००-द.रो.७५-३२००-१००-३५००
४.	नियोजन अधिकारी	२/ब	२०००-६०-२३००-द.रो.७५-३२००-१००-३५००
५.	लेखाधिकारी	२/ब	२०००-६०-२३००-द.रो.७५-३२००-१००-३५००
६.	उप अभियंता	२/ब	२०००-६०-२३००-द.रो.७५-३२००-१००-३५००
७.	कार्यालय अधीक्षक	३/क	१६४०-६०-२६००-द.रो.७५-२९००
८.	संशोधन सहाय्यक	३/क	१६००-६०-२६००-द.रो.७५-२९००
९.	मुख्य लेखापाल	३/क	१६००-६०-२६००-द.रो.७५-२९००
१०.	निम्नश्रेणी लघुलेखक	३/क	१६४०-६०-२६००-द.रो.७५-२९००
११.	उप लेखापाल	३/क	१४००-४०-१६००-५०-२३००-द.रो.६०-२६००
१२.	कनिष्ठ अभियंता	३/क	१४००-४०-१८००-द.रो.५०-२३००
१३.	आदिवासी विकास निरीक्षक	३/क	१४००-४०-१८००-द.रो.५०-२३००
१४.	वरिष्ठ लिपिक	३/क	१२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४०
१५.	लघुटंकलेखक	३/क	१२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४०
१६.	सांख्यिकी सहाय्यक	३/क	१२००-३०-१५६०-द.रो.४०-२०४०
१७.	लिपिक-टंकलेखक	३/क	९५०-२०-११५०-द.रो.२५-१५००
१८.	वाहनचालक	३/क	९५०-२०-११५०-द.रो.२५-१५००
१९.	भूमापक	३/क	९५०-२०-११५०-द.रो.२५-१५००
२०.	पहारेकरी	३/क	७५०-१२-८७०-द.रो.१४-९४०
२१.	शिपाई (भूमापनाकरिता)	४/ड	७५०-१२-८७०-द.रो.१४-९४०
२२.	अधवेळ सफाईगार	४/ड	दरमहा रुपये १४०/- प्रमाणे कायम वेतन
	एकूण		

शासन निर्णय:-

विशेष मागास प्रवर्गाकरिता शासकीय, निमशासकीय सेवेत आरक्षण

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क..बीसीसी/प्र.क्र.६८/९४/१६ ब,
दिनांक ८ डिसेंबर, १९९४.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जून,१९९५

पहा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी- १०९४/प्र.क.६८/९४/१६ ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९४/प्र.क.६८/९४/१६ ब, दिनांक २ जानेवारी १९९५
३. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्र.सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दि. ७ डिसेंबर १९९४
४. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग क्र.सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दि.१३ जून, १९९५

शासन निर्णय :- राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेला जनसमुदाय वगळता अन्य काही जाती-जमातींकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेपणाच्या कारणावरुन विशेष सवलती देण्याची मागणी लक्षात घेता समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व . क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क.सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दि. ७ डिसेंबर १९९४ अन्वये खाली नमूद केलेल्या जातींचा 'विशेष मागास प्रवर्ग' घोषित केला होता.

अ.क्र.	जातीचे नांव
१.	गोवारी जात
२.	माना जात
३.	१. कोष्टी २. हलबा कोष्टी ३. हलबा जात ४. साळी ५. लाडकोष्टी ६. गढेवाल कोष्टी ७. देशकर ८. सालेवार ९. पद्मशाली १०. देवांग ११. काची बंधे १२. पटवीस १३. सतसाले १४. साडे १५. जैन कोष्टी
४.	१. कोळी, तत्सम जाती २. मच्छिमार कोळी ३. अहिर कोळी, ४. खानदेशी कोळी, ५. पानकोळी, ६. खिश्चन कोळी ७. चुंबळे कोळी ८. पानभरे कोळी ९. सूर्यवंशी कोळी १०. मांगेला कोळी ११. सोनकोळी १२. वैती कोळी १३. खारवी १४. नाशिक व धुळे जिल्हयातील डांगर शेती करणारे कोळी
५.	१. मुन्नेरवार २. मुन्नुरवार ३. मुन्नुर ४. तेलगू मुन्नुर ५. मुन्नुरवार तेलगू ६. मुन्नरकापू ७. कापेवार ८. तेलगू कापेवार ९. मुन्नुरवाड १०. तेलगू फुलमाळी या जाती.

२. त्यास अनुलक्षून या विभागाच्या शासन निर्णय क्र.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ ब, दिनांक ८ डिसेंबर, १९९४ अन्वये या 'विशेष मागास प्रवर्गा' करिता दोन टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. त्याप्रमाणे हे आदेश शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सेवेत देखील लागू राहील, असे आदेश या निर्णयाव्दारे देण्यात आले होते. या निर्णयास शासन निर्णय सा.प्र.वि.क.बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६ ब, दि.२ जानेवारी, १९९५ अन्वये स्थगिती देण्यात आली होती.

३. आता वरील दि.२ जानेवारी, १९९५ च्या शासन निर्णयाव्दारे देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येत आहे. तसेच वरील क्र.४ (१४) येथे उल्लेख केलेल्या 'नाशिक,धुळे, व जळगांव जिल्हयातील डांगर शेती करणारे कोळी' या ऐवजी 'अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी' अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

४. वर उल्लेखलेल्या 'विशेष मागास प्रवर्गास' देण्यात आलेले आरक्षण हे सरळ सेवा भरतीसाठी पदोन्नतीसाठी अनुज्ञेय राहील. तसेच या प्रवर्गाला किमिलेअरचे तत्व लागू राहणार नाही. या प्रवर्गातील ज्या व्यक्तींना या आधी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे, शासकीय,निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे, त्यांना पदावनत किंवा सेवेत काढून टाकण्यात येऊ नये.

५. शासन सेवेतील भरती संदर्भात विहित करण्यात आलेल्या २०० बिंदू नामावलीमध्ये 'विशेष मागास प्रवर्गासाठी' २ टक्के आरक्षण दर्शवून सुधारीत २०० बिंदू नामावली स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.

६. हे आदेश मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुखांच्या व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श.गं.काळे)
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन

ꕥꕥꕥ

शासन निर्णय :-

आदिवासींसाठी नवसंजीवन योजना

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक टीएसपी-१०९५/प्र.क्र.६/कार्यासन ६,
मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जून, १९९५

वाचा :- १. शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग क्र. एमआयएस-१०९४/प्र.क्र.६०/कार्यासन-५ दिनांक २०.४.१९९४
२.शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्र. एमआयएस-१०९४/प्र.क्र.६०/कार्यासन-५ दिनांक २६.५.९४
३ शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग. क. टीएसपी-१०९५/प्र.क्र.६/कार्यासन ६, दिनांक २६.४.१९९५
४.शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. टीडीसी-१६९२/प्र.क्र.४०७७/का.३, दिनांक २१.६.९५

प्रस्तावना:- महाराष्ट्रातील डोंगराळ व वन प्रदेशात विविध जमातींच्या आदिवासीची लोकसंख्या बऱ्याच मोठया प्रमाणात आहे. पुढारलेल्या समाज घटकांशी संपर्क ठेवण्यातील बुजरेपणा, मागासलेपणा, अंधश्रध्दा, दारिद्रय, अशिक्षितपणा इत्यादी बाबी आदिवासींमध्ये आढळून येतात. परिणामी, शिक्षण, पौष्टीक आहार, आरोग्यविषयक सेवा, वर्षभर पुरेल एवढा रोजगार इत्यादी जीवनावश्यक गोष्टी त्यांना वेळीच उपलब्ध होत नाहीत म्हणून आदिवासींचे जीवनमान निकृष्ट पातळीवर राहिलेले आहे. तसेच स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासींना स्थलांतर करण्याशिवाय पर्याय नसतो. अशा गंभीर बाबींचे प्रमाण कमी व्हावे किंबहुना टाळता यावे याकरिता शासनामार्फत अनेक योजना कार्यरत आहे. परंतू या सर्व योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रीपणा व प्रभावीपणा येण्याकरिता सर्व घटक कार्यक्रमानां एकत्र करुन एक विशेष कृती कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. हा सर्वव्यापी कार्यक्रम नवसंजीवन योजना या नांवाने अंमलात आणावा, असे शासनाने ठरविले आहे.

शासन निर्णय :- प्रस्तावनेत नमूद करण्यात आलेल्या बाबींच्या पार्श्वभूमीवर शासनाने नवसंजीवन योजना राबविण्याचे ठरविले असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(१) योजनेचा उद्देश :- आदिवासींच्या आरोग्यात सुधारणा करणे, त्यांना आरोग्यविषायक सुविधा पुरविणे, विविध रोजगार कार्यक्रमांतर्गत वर्षभर पुरेल एवढा रोजगार उपलब्ध करुन देणे, आदिवासींना पिण्याचे शुध्द व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणे, अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करुन पूरक आहार देणे आणि या सर्व उपाययोजनांव्दारे आदिवासींचे क्रियाशील आयुष्य वाढविणे, हा या नवसंजीवन योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

(२) योजनेची व्याप्ती :- ही योजना महाराष्ट्र राज्याच्या संपूर्ण आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये राबविण्यात येईल. यामध्ये अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा व मिनीमाडा क्षेत्रांचा समावेश आहे.

(३) योजनेची अंमलबजावणी :- नवसंजीवन योजना राज्यात दिनांक १ मे, १९९५ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

(४) योजनेचे स्वरुप :- नवसंजीवन योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या घटक योजना पुढीलप्रमाणे आहेत.

१) **रोजगार विषयक कार्यक्रम**
(अ) रोजगार हमी योजना
(ब) जवाहर रोजगार योजना (पहिला उद्भव)
(इ) जवाहर रोजगार योजना (दुसरा उद्भव)
(ई) आश्वासित रोजगार योजना

२) **आरोग्य सेवा**
(अ) प्राथमिक आरोग्य सेवा पुरविणे
(आ) शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

३) **पोषण विषयक कार्यक्रम**
(अ) एकात्मिक बालविकास योजना
(आ) शालेय पोषण आहार योजना

४) **धान्य पुरवठा**
(अ) स्वस्त धान्य दुकानामार्फत शिधावाटप
(आ) बळकटीकृत सार्वजानिक वितरण व्यवस्था (रिव्हॅम्प्ड पब्लिक डिस्ट्रीब्युशन सिस्टीम)
(इ) पर्जन्यपूर्व साठवण (प्रि मान्सून स्टॉकिंग)
(ई) व्दार वितरण व्यवस्था

५) **खावटी कर्ज योजना**

६) **धान्य कोष योजना**

(५) **योजनेची कार्यपध्दती** :- आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हयांचे जिल्हाधिकारी हे नवसंजीवन योजनेचे मुख्य अंमलबजावणी अधिकारी म्हणून काम पाहतील. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अपर आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिकआदिवासी विकास प्रकल्प या सर्व अधिकाऱ्यांचा ही योजना राबविण्यामध्ये सक्रीय सहभाग राहील व ते ही योजना यशस्वी होण्यासाठी जबाबदार राहतील.

(६) **संवेदनशील क्षेत्र निवडण्याचे निकष** :- ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा अधिकारी यांनी खालील निकषांवर आधारीत आपल्या जिल्हयातील संवेदनशील क्षेत्र निवडावे.

(अ) अति दुर्गम म्हणून यापूर्वी घोषित करण्यात आलेली गांवे
(आ) ज्या गांवात, पाडयात अथवा क्षेत्रात या आधी कुपोषणाचे दुर्धर प्रसंग ओढविलेले आहेत अशी गांवे, पाडे अथवा क्षेत्रे
(इ) पावसाळ्यात ज्यांची संपर्क व्यवस्था विस्कळीत होते, अशी गांवे
(ई) ज्या गांवी शुध्द व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही, अशी गांवे
(उ) प्राथमिक आरोग्य केंद्रे व किंवा उपकेंद्रे यापासून दूर अंतरावर असलेली गांवे
(ऊ) ज्या गांवातील स्वस्त धान्य दुकाने कार्यरत नाहीत अथवा असे दुकान दूर अंतरावर आहे, अशी गांवे
(ए) ज्या गांवात पावसाळ्यात रोजगार पुरविणे दुरापास्त होऊन बसते, अशी गांवे
(ऐ) ज्या गांवात अंगणवाडयाची/मिनी अंगणवाडयाची सोय नाही, अशी गांवे

(७) **कृति नियोजन आराखडा** - वरील निकषानुसार क्षेत्र निश्चित केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्हयातील सर्व आदिवासी क्षेत्रात सध्या कार्यरत असलेले सर्व घटक कार्यक्रम समन्वित तऱ्हेने राबविणे सहज साध्य होण्यासाठी सविस्तर कृती नियोजन आराखडा तात्काळ तयार करावा आणि त्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा प्रत्येक महिन्याला त्यांनी सविस्तर आढावा घ्यावा. कृति नियोजन आराखडा तयार करतांना जिल्हाधिकाऱ्यांनी पुढील मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) **रोजगार कार्यक्रम**

(एक) आदिवासींचे उन्हाळी दिवसांत होणारे स्थलांतर टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर पुरेसा रोजगार उपलब्ध करुन द्यावा.

किंवा आवश्यकतेनुसार नवीन रोजगाराची कामे मंजूर करण्याची दक्षता घ्यावी.

(दोन) रोजगारविषयक कार्यक्रमाखाली आदिवासी क्षेत्रात पुरेसा निधी उपलब्ध आहे किंवा कसे याची खात्री करण्यात यावी व प्रत्येक निवडक क्षेत्रात आवश्यक तेवढी कामे मंजूर केली जातील, याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

(तीन) आदिवासी मजूरांना द्यावयाची मजूरी ही १० दिवसात देण्यात यावी व कोठेही देयके प्रलंबित राहणार नाहीत, याची खात्री करावी.

२) **आरोग्यविषयक कार्यक्रम**

(एक) आरोग्य सेवेअंतर्गत आता आदिवासी भागात आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व फिरती आरोग्य पथके स्थापन करण्यात आलेलीआहेत. त्यामधील वैद्यकिय अधिकारी आणि कर्मचारी यांची सर्व मंजूर पदे भरली आहेत किंवा कसे याची तात्काळ पाहणी करण्यात यावी. काही रिक्त पदे आढळून आल्यास ती त्वरीत भरली जातील याची दक्षता घेण्यात यावी. आवश्यकता भासल्यास बिगर आदिवासी क्षेत्रामधून वैद्यकिय अधिकारी अथवा कर्मचारी यांना प्रतिनियुक्तीवर आदिवासी क्षेत्रात नेमणूका द्याव्यात.नियुक्त केलेले वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी नियुक्त जागी कार्यरत राहतील याची दक्षता घेण्यात यावी. तसेच आरोग्य संस्थाकडे वाहने (जीप, रुग्णवाहिका इ.) उपलब्ध आहेत व सुस्थितीत आहेत याविषयी आढावा घेऊन खात्री करण्यात यावी. प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये औषधांचा साठा, वैद्यकिय उपकरणांचा गरजेनुसार साठा उपलब्ध आहे याची देखील खात्री करण्यात यावी. पावसाळ्याआधी सर्व वैद्यकिय अधिकाऱ्यांनी आदिवासी गांवे, पाडे इत्यादींना प्रत्यक्ष भेटी देऊन आदिवासींची आरोग्य तपासणी केली पाहिजे. तपासणीअंती प्रतिबंधक तसेच उपचारात्मक औषध योजना त्वरीत केली पाहिजे.

(दोन) आदिवासी क्षेत्रात उपलब्ध असलेल्या पिण्याच्या पाण्याचा साठा निर्जुतूक करण्यासाठी पावडरचा वापर करुन पिण्याचे पाणी स्वच्छ व निर्जुतूंक करणे आवश्यक आहे. ही जबाबदारी प्रामुख्याने ग्रामपंचायतीची असली तरीही या संबंधात सार्वजानिक आरोग्य विभागाने संपूर्ण काळजी घ्यावी. दूषित पाण्याची तात्काळ तपासणी करुन त्यांचे नमुने लवकरात लवकर तपासण्यात यावे. हे काम वेळच्या वेळी केले जात आहे किंवा कसे याबद्दल जिल्हाधिकारी यांनी सतर्क असणे अत्यंत गरजेचे आहे.

३) **पोषण आहार**

(एक) आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक शाळांमधून वर्ग १ ते ४ मधील विद्यार्थ्यांना दूध किंवा स्थानिक पूरक आहाराचा पुरेसा पुरवठा करण्यात येतो, याबाबत काटेकोरपणे संनियंत्रण ठेवण्यात यावे.

(दोन) प्रत्येक अंगणवाडी/मिनी अंगणवाडीवर पूरक आहाराचा पुरवठा नियमितपणे व्हावा, तसेच आहाराचा साठा कमी पडत असल्यास, आवश्यक तेवढा साठा वेळीच उपलब्ध करुन द्यावा अथवा स्थानिक पूरक आहार त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावा.

(तीन) अंगणवाडयांना वैद्यकिय अधिकाऱ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे नियमित भेटी देऊन सर्व मुलांची तसेच गर्भवती महिला व नुकत्याच बाळंत झालेल्या महिलांची आरोग्य तपासणी करावी.

४) आदिवासी क्षेत्रात धान्य पुरवठा

(एक) आदिवासी क्षेत्रातील सर्व स्वस्त धान्य दुकाने कार्यरत आहेत आणि त्यामध्ये पुरेसा धान्याचा साठा आहे याची खात्री करुन घेण्यात यावी.

(दोन) भारत सरकारच्या बळकटीकृत सार्वजानिक वितरण व्यवस्थेअंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात धान्य पुरवठा सुरळीपणे पोहोचविणे महत्वाचे आहे. याकरिता आवश्यक ती काळजी घेण्यात यावी.

(तीन) धान्याचा साठा गोडाऊन मधून उचलून तो परस्पर बाजारात विकण्याच्या स्वस्त धान्य दुकानदाराच्या अपप्रवृत्तीस आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाच्या सहकार्याने व्दार वितरण व्यवस्था राबविली जाते. ही व्दार वितरण व्यवस्था प्रभावीपणे आदिवासी क्षेत्रात राबविण्यात यावी.

(चार) पावसाळयात दळण-वळणाची व्यवस्था विस्कळीत होते अशा आदिवासी गांवासाठी पावसाळयापूर्वीच पुरेसा धान्य साठा (प्रि मान्सून स्टॉकिंग) ठेवण्यात आलेला आहे, याची खात्री करुन घेण्यात यावी.

५) खावटी कर्ज योजना

शासन परिपत्रक, दिनांक २० एप्रिल, १९९४ अनुसार ज्या आदिवासी कुटुंबातील मुले कुपोषणाच्या ग्रेड-३ किंवा ४ मध्ये असतील अशा कुटुंबाची खावटी कर्जाची थकबाकी असली तरीसुध्दा त्या कुटुबांना त्यांची थकबाकी माफ करुन त्यांना पुन्हा थकबाकीच्या प्रमाणात खावटी कर्ज मंजूर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. अशी कुटुंबे आदिवासी सहकारी संस्थेचे सदस्य नसतील तर त्यांना अशा संस्थांचे सदस्य करुन घेण्यात यावे. त्यासाठी आवश्यक असलेली नोंदणी फी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी न्युक्लिअस बजेट निधीतून भरावी. शासनाच्या दि.२० एप्रिल, १९९४ च्या परिपत्रकातील आदेश यापुढेही तंतोंतंत अंमलात राहतील.

६) धान्य कोष योजना

सध्या राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात 'खावटी कर्ज' योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत रुपये ४००/- या मर्यादेपर्यंत धान्यरुपाने आदिवासी शेतकरी/शेतमजूर यांस कर्ज देण्यात येते. परंतू त्याची वसूली होत नाही किवां वसूलीचे प्रमाण नगण्य आहे. ही बाब दृष्टीसमोर ठेऊन तिला पर्याय म्हणून धान्य कोष योजना प्रस्तावित आहे. गांवातील आदिवासी शेतकरी व इतर गांवकरी अन्नधान्याच्या संदर्भात आत्मनिर्भर व्हावेत हा धान्यकोष योजनेचा उद्देश आहे. या योजने अंतर्गत गांव पातळीवर सेवाभावी संस्थेमार्फत धान्य कोष योजना राबविली जाईल. धान्य कोष योजनेसंबंधी आवश्यक त्या सूचना/आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

७) वित्तीय व्यवस्था

(अ) नवसंजीवन योजना ही अनेक घटक कार्यक्रम समाविष्ट असलेली योजना आहे. अशा घटक कार्यक्रमांना दरवर्षीआदिवासी उपयोजनेमधून निधी मंजूर करण्यात येतो. हाच निधी नवसंजीवन योजनेखाली समाविष्ट असलेल्या घटक कार्यक्रमासाठी वापरण्यात यावा. केवळ नवसंजीवन योजनेच्या नांवाखाली स्वतंत्र निधी मंजूर करण्यात येणार नाही.

(आ) नवसंजीवन योजनेखाली होणारा खर्च वर उल्लेखिलेल्या घटकनिहाय मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा आणि सर्व संबंधित अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या कार्यालयांनी मंजूर निधी व झालेल्या खर्चाचा हिशेब तसेच योजनेचा प्रगतीविषयक अहवाल इत्यादीबाबतची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत निश्चितरित्या पाठवावी.

जिल्हाधिकाऱ्यांनी सदर योजनानिहाय माहिती संबंधित विभागाचे महसूल आयुक्त आणि आयुक्त, (आदिवासी विकास), नाशिक यांना १५ तारखेपर्यंत पाठवावी. तसेच महसूल आयुक्त आणि आयुक्त (आदिवासी विकास). नाशिक यांनी एकत्रित अहवाल दरमहा आदिवासी विकास विभागाकडे २० तारखेपर्यंत निश्चितरित्या सादर करावा.

८) नवसंजीवन योजनेचे संनियंत्रण

(एक) नवसंजीवन योजनेचे संनियंत्रण या संज्ञेमध्ये पुढील बाबी समाविष्ट राहतील.

(क) घटक कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कृती नियोजन आराखडा तयार करणे.

(ख) घटक कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना उद्भवणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्वरीत उपाययोजना करणे

(ग) वेळावेळी सर्व स्तरावर आढावा बैठकी आयोजित करणे, त्याचे इतिवृत्त तयार करणे व संबंधितांकडे पाठविणे

(घ) महत्वाच्या बाबींचे नियोजन करणे, उदा.पुरेशी तरतूद प्राप्त करुन घेणे,आवश्यतेनुसार योग्य ते आदेश घेऊन नियम, अटी, मानके इत्यादी बाबी शिथिल करणे.

(च) नवसंजीवन योजनेची अंमलबजावणी होत असलेल्या गांवी/स्थळी वेळोवेळी भेटी देऊन स्थानिक अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

(दोन) नवसंजीवन योजनेचे संनियंत्रण स्तरनिहाय खालीलप्रमाणे करण्यात यावे.

(१) घटक कार्यक्रमाची अंमलबावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकक्षेत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत संनियंत्रण ठेवावे.

(२) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व घटक कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय ठेवावा व त्याबाबत संनियंत्रण ठेवावे.

(३) संबंधित जिल्हाधिकारी त्यांच्या जिल्हयातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हयाचे इतर संबंधितअधिकारी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवतील आणि संबंधितांना योग्य ते मार्गदर्शन करतील.अशारितीने जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे नवसंजीवन योजनेबाबत मुख्य अंमलबजावणी अधिकारी म्हणून काम पाहतील.

(४) अपर आयुक्त, आदिवासी विकास हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांबाबत संनियंत्रण ठेवतील व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवतील तसेच संबंधित विभागीय आयुक्त आणि आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक यांचेशी ते सतत संपर्कात राहतील.

(५) विभागीय आयुक्त, हे त्यांच्या कार्यक्षेत्राचे मुख्य संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील व जिल्हयातील सर्व अंमलबजावणी अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करतील.

(६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे सर्व मुख्य संनियंत्रण अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करतील आणि घटक कार्यक्रमांशी निगडीत असलेल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांचेशी समन्वय ठेवतील.

(तीन) नवसंजीवन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या संदर्भात शासनाने शासन परिपंत्रक दिनांक २६ एप्रिल , १९९५ अन्वये राज्यपातळीवर आदिवासी विकास विभागात विशेष कक्ष उघडला आहे. त्याप्रमाणे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या कार्यालयात सुध्दा स्वतंत्र कक्ष उघडण्यात आला आहे. सर्व संबंधितांनी या दोन्ही विशेष कक्षाशी सातत्याने संपर्क ठेवावयाचा आहे.

(चार) नवसंजीवन योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या सर्व घटक कार्यक्रमांची अंमलबजावणी , संनियंत्रण आणि योग्य तो समन्वय प्रभावीपणे व्हावा. या योजनेची अंमलबजावणी करत असताना पावसाळ्यापूर्वी करावयाच्या उपाययोजनासंबंधी शासनाने यापूर्वीच निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक दिनांक २० एप्रिल, १९९४ व २६ मे, १९९४ मधील सर्व सूचना तंतोंतंत पाळल्या जाव्यात.

(पाच) सचिव, आदिवासी विकास, सार्वजानिक आरोग्य, अन्न व नागरी पुरवठा, ग्राम विकास व ग्राम विकास व जलसंधारण (रो.ह.यो.) विभाग हे राज्यामध्ये वेळावेळी दौरा करुन स्थानिक अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील. आवश्यकता वाटल्यास, नवसंजीवन योजना चालू असलेल्या गांवी प्रत्यक्ष भेटी देतील व कामाची पाहणी करतील.

(९) नवसंजीवन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या संदर्भात सेवाभावी संघटना व उद्योजक यांनी तयारी दर्शविल्यास शासन त्यांचा सहभाग घेईल. म्हणून आदिवासी क्षेत्रात नावाजलेल्या सेवाभावी संस्थांचा व उद्योजकांचा या योजनेमध्ये सहभाग प्राप्त करुन धेण्याकरिता खास प्रयत्न करण्यात यावे.

(१०) नवसंजीवन योजना राज्यामध्ये अत्यंत प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व अंमलबजावणी अधिकारी व समन्वय अधिकारी यांनी आपआपली कामे जबाबदारीने पार पाडावीत व ही योजना यशस्वी होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तत्परतेने करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(राजेंद्र सिंह)
सचिव
आदिवासी विकास विभाग

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-४११ ००१.

TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune - 411 001.

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

Guidelines for Contributors :

The manuscripts to be published in this Bulletin should be type written in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and correctred for any typing errors. The matter should be organised under suitable headings. Tables should be preferrably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the editor is not responsible for the views expressed by the authors.

Apart from the honorarium, the contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondence should be addressed to the *Director, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune - 411 001.*

Registration No.RN-37/438/79

FORM IV

(See Rule 80)

1. Place of Publication	: 28, Queen's Garden Pune 411 001.
2. Periodicity of Publication	: Bi-annual
3. Printers Name	: Manager Photozinco Press, Pune 411 001.
Nationality	: Indian
Address	: Photozinco Press, Pune 411 001.
4. Publishers Name	: Dr.Navinchandra Jain, I.A.S.
Nationality	: Indian
Address	: 28, Queen's Garden Pune 411 001.
5. Editors Name	: Dr.Navinchandra Jain, I.A.S.
Nationality	: Indian
Address	: 28, Queen's Garden Pune 411 001.

I Navinchandra S. Jain, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dr.Navinchandra Jain
(Signature of Publisher)

30th September, 1995.

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs. 50/-

PROCESSED & PRINTED AT GOVT. PHOTOZINCO PRESS, PUNE-1995